**( अध्यक्षस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषा दराडे )**

**पृ.शी.**: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
**मु.शी.**: सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा
( चर्चा पुढे चालू.... )

**तालिका सभापती** : सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेचा आज शेवटचा दिवस आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी माननीय वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षातील सदस्यांसाठी, निम्मा वेळ विरोधी पक्षाच्या सदस्यांसाठी व स्वतंत्र सदस्यांना देण्यात येईल. आज या चर्चेमध्ये ज्या सन्माननीय सदस्यांना भाग घ्यावयाचा आहे त्यांची नावे माझ्याकडे आलेली आहेत. या नावांपैकी प्रथम सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांचे नाव आहे. त्यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

श्री.पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय वित्त मंत्र्यांच्या भाषणामध्ये कर्जमाफीसाठी केंद्राकडे आम्ही सातत्याने पाठपुरावा केला म्हणून महाराष्ट्रातील शेतक-यांना 10,246 कोटी रुपये मिळाले, असा उल्लेख केलेला आहे. हा पाठपुरावा कधी करण्यात आला ? ज्यावेळी देशामध्ये, राज्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्यांची संख्या वाढल्यानंतर, लोकसभेमध्ये सुध्दा त्याची चर्चा होऊ लागली आणि संपूर्ण देशात 1 लाख 70 हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्याची माहिती समोर आल्यावर केंद्र सरकार व राज्य सरकार खडबडून जागे झाले आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. शेतक-यांच्या आत्महत्याचे कारण हे कर्जमाफीशी आहे आणि कर्जमाफ केल्याशिवाय देशातील वा राज्यातील शेतकरी आता वाचू शकत नाही अशाप्रकारची भावना निर्माण झाली. संपूर्ण देशात 1.70 लाख शेतक-यांचा बळी गेला. एवढया मोठया संख्येने आत्महत्या होण्यापूर्वी हा निर्णय आवश्यक होते पण तसे झाले नाही. या देशामध्ये शेती करणे परवडत नाही म्हणून



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.पाशा पटेल....

शेतक-यांनी वेळोवेळी आंदोलने केली असता त्या आंदोलनांमध्ये पोलिसांच्या गोळया खाऊन शेतक-यांचा बळी गेला आहे. मी ज्या शेतकरी चळवळीमध्ये काम करतो त्या चळवळीतील 40-50 कार्यकर्त्यांनी पोलिसांच्या गोळया खाल्ल्या आहेत. त्यावेळी सरकारला जाग आली नाही. पण ज्यावेळेस खूर्ची डगमगू लागली, खूर्ची हातातून निसटून जात आहे असे वाटल्यावर सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला आहे. शेती परवडत नाही हे टाहो फोडून शेतक-यांनी सांगितले त्यावेळी कर्जमाफी जाहीर केली नाही. पण खुर्ची जाण्याची भीती निर्माण झाली, 10-10 लाख शेतक-यांच्या सभा होऊ लागल्या त्यावेळेस केंद्राकडे पाठपुरावा सुरु झाला. आता आमचे काही खरे नाही, आता आमची सत्ता रहात नाही असे वाटल्यावर सरकारच्या डोक्यात प्रकाश पडला आहे. सरकारला ख-या अर्थाने शेतक-यांचे कल्याण व्हावे असे वाटत असेल तर केवळ कर्जमाफी करुन त्यांचे कल्याण होणार नाही. सभापती महोदया, माझ्या भावाने सुध्दा 30 हजाराचे कर्ज घेतले आहे. त्याबद्दल मी सांगणार नाही. पण नांदेडमधील एक उदाहरण सांगतो. एका माणसाने बँकेकडून 90 हजाराचे कर्ज घेतले होते. त्याने बँकेत दीड लाख भरले आणि 7.35 लाख इतक्या रकमेची बँकेने त्याला नोटीस पाठविली आहे. अशी स्थिती असेल तर शेतकरी कसा वाचू शकेल ? शेतक-यांवर कर्जाचा डोंगर कोणकोणत्या गोष्टीमुळे वाढला त्याच्या खोलामध्ये सरकारने जाण्याची आवश्यकता आहे. एक तर शेती खर्चावर आधारित त्याच्या उत्पादनाला भाव मिळत नाही म्हणून कर्ज वाढत आहे. कर्ज फेडता येत नाही म्हणून लोक मेले आहेत. शेती परवडत नाही, शेतीला हमी भाव मिळत नाही म्हणून आत्महत्या झाल्या. त्याच्यावर तोडगा कर्जमाफीचा काढण्यात आला. पण हा तोडगा निवडणुका जिंकण्यासाठी काढण्यात आला आहे, असे माझे ठाम मत आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 10:05

(श्री. पाशा पटेल...)

शेतक-यांनी जे पीक कर्ज घेतले होते त्या पीक कर्जाबाबत असे आहे की, प्रत्येक जिल्हा बँकेचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक यांनी शंभर टक्के वसुली करण्याच्या नावाखाली शेतक-याला 25 रुपयाचा फेटा आणि 5-5 रुपयाची शाल अंगावर घालून जुने कर्ज नवीन दाखवून 100 टक्के वसुली झाल्याचे दाखविले. मग ज्या गावातील चेअरमनने 100 टक्के कर्जाची वसुली केली त्या गावतील सभासद म्हणाले की तुमच्यामुळे आमचे कर्ज माफ व्हायचे राहिले. गावागावातील चेअरमनला मार खाऊ द्यावयाचा नसेल तर तारखा बदलण्याच्या बाबतीत पाठपुरवा करा. तारखा बदलण्याचा पाठपुरवा केला तर हे लोक वाचतील आणि शेतक-यांचा कर्ज माफीवर विश्वास राहील. आम्ही कर्ज भरले म्हणून ते माफ झाले नाही, म्हणून कर्जच भरायचे नाही अशी लोकांची भावना तयार झाली तर तुमची सिस्टिम कोलॅप्स होईल. म्हणून कर्जमुक्ती देताना भेदभाव करता कामा नये हे मला आवर्जून सांगावयाचे आहे. आपण सर्वजण शेतक-यांचे प्रश्न जाणणारे आहात. सभापती महोदया, ज्या काळामध्ये शेतक-यांची 80 टक्के मुले या सभागृहामध्ये निवडून येत होती त्या काळात शेतक-याला न्याय मिळाला नाही. आता तीन जिल्हयातून 81 लोक निवडून यावयास लागले आहेत आणि 30 जिल्ह्यातून उर्वरित लोक निवडून येत आहेत. शेतक-याला तेव्हा देखील न्याय मिळाला नाही आणि आता देखील न्याय मिळण्याची शक्यता वाटत नाही.

सभापती महोदया, या ठिकाणी सूरत बदलनी है, अशा प्रकारची चर्चा झाली. पण ही सूरत कशी बदलणार ? 1981 मध्ये 80 टक्के लोक गावामध्ये आणि 20 टक्के लोक शहरात राहात होते. देशपातळीवर गावात राहाणाच्या लोकांचे प्रमाण 72 टक्के आणि शहरात राहाणा-या लोकांचे प्रमाण 28 टक्के होते. महाराष्ट्राचे चित्र पाहिले तर 1981 साली शहरात राहाणा-या लोकांची संख्या जी 20 टक्के होती ती आता 42 टक्के झालेली आहे आणि गावात राहाणा-या लोकांची संख्या जी 1981 साली 80 टक्के होती ती आता 58 टक्के झालेली आहे.म्हणजे गावामध्ये आणि शहरामध्ये राहाणा-या लोकांच्या टक्केवारीमध्ये फक्त 16 टक्क्याचा फरक राहिलेला आहे. आता या मुंबईच्या प्रश्नावरुन राजकारण व्हायला लागले आहे. मुंबईमध्ये जागा शिल्लक राहिलेली नाही, बाहेरच्या राज्यातील लोक मुंबईमध्ये येऊन राहातात इत्यादी प्रश्न उपस्थित व्हायला लागले आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पाशा पटेल...)

परंतु मूळ रोग हा वेगळाच आहे. हा मूळ रोग नष्ट कसा होईल याचा विचार न करता आता तात्कालिक प्रश्नांचा विचार करुन लोक देशाचे आणि राज्याचे नेते व्हायला लागले आहेत. ज्यांना या देशाच्या प्रश्नांशी काही देणेघेणे नाही असे लोक राजकारण करु लागले आहेत. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की या राज्याचा चेहरा ख-या अर्थाने बदलायचा असेल, गावातील शेतक-याचे जीवनमान सुखी आणि समृध्द करावयाचे असेल तर गावातील माणूस गावात कसा राहील, त्याला शेती कशी परवडेल याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदया, सन्माननीय अर्थमंत्री या सदनामध्ये उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, मूळ कर्जापेक्षा व्याज वसूल करावयाचे नाही या संदर्भात दामदुपटीसंबंधी 44(अ) कलम होते. परंतु त्यावेळी या कायद्याची अंमलबजावणी करणे जमले नाही. आता असे झाले आहे की कलम 44(अ) हे रद्द करण्यात आलेले आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे शेतक-याने 90 हजार रु. कर्ज घेतले होते आणि त्याला सव्याज 7 लाख 35 हजार रु.ची नोटीस आली. हे सगळेच्या सगळे कर्ज वसूल करता येऊ शकेल. हे कशामुळे झाले. अर्थसंकल्पीय पुस्तिकेच्या पृ.क्र.12 वर वैद्यनाथन समितीच्या अहवालाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. वैद्यनाथन समितीच्या शिफारशी स्वीकारलेल्या आहेत असे सरकारने सांगितलेले आहे. यामध्ये सर्वात महत्वाची गोम अशी आहे की, जिल्हा बँकांमध्ये ज्या लोकांनी घोटाळे केले, ज्या लोकांनी बँका बुडविल्या ते सगळे पैसे आता केन्द्र सरकार भरुन देणार आहे.

..नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

त्यांनी अशी अट घालून दिली आहे की, कलम 44 (अ) काढून टाका. जे धनदांडगे आहेत, जे बुडवे आहेत, जे चार आहेत , बदमाश आहेत, जे देशद्रोही आहेत, या लोकांनी सहकारी बँकामध्ये लफडी केलेली आहेत. त्यांच्या लफडयांतले पैसे भरुन काढण्यासाठी केंद्र सरकार मदत करणार आहे. परंतु यात बळी मात्र शेतक-यांचाच जातो आहे. दामदुपटीपेक्षा जास्त कर्ज शेतक-यांकडून वसूल करता येते अशा प्रकारच्या निर्णयाचे कायद्यात रुपांतर झालेले आहे. एका बाजुला सांगितले जाते आहे की, आम्ही शेतक-यांचे कर्ज माफ केले आहे. शेतकरी हा या देशाचा कणा आहे. दुस-या बाजुला चोर माणसांना वाचविण्यासाठी गरीबांचा बळी देण्याचे पाप शासनामार्फत होत आहे. म्हणून या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, काल ऊसाच्या प्रश्नावर बरीच चर्चा झाली. मी आज "सकाळ" हे वृत्तपत्र सोबत आणले आहे. "सकाळ" वृत्तपत्र हे कोणाच्या मालकीचे आहे ही गोष्ट सगळया जगाला माहिती आहे. या वृत्तपत्रात असे म्हटले आहे की, 300 ते 400 रुपये एकरकमी भाव देऊन पुन्हा दुस-या हप्त्याची मागणी करणार नाही, असे हमीपत्र लिहून घेऊन ऊस गाळपासाठी घेऊन जात आहेत. आता मला सांगा की, आम्ही जाणते म्हणतो तर तुम्हाला राग येतो. नेते म्हणतो तर राग येतो, आम्हाला कळत म्हटले तर त्याचा देखील राग येतो. हे वृत्तपत्र तुमचे आहे. मंत्रालय तुमचे आहे. माणसे तुमची आहेत, अधिकारी तुमचे आहेत. परंतु या राज्यात ऊसाचा प्रश्न गंभीर निर्माण झालेला आहे. आमचे तुम्ही या ठिकाणी तोंड बंद करु शकता. परंतु राज्यातील जनतेचे तोंड तुम्ही बंद करु शकत नाही. लोकांची तोंडे बंद व्हावीत आणि तुमच्यात सुधारणा व्हावी म्हणून आम्ही या ठिकाणी बोलत असतो. परंतु आमची संख्या सभागृहात कमी आहे म्हणून आमच्या अंगावर येतात. समजा नियतीने ठरविले तर आमची संख्या वाढू शकते आणि तुमची संख्या कमी होऊ शकते. अशी परिस्थिती ज्या दिवशी निर्माण होईल, त्या दिवशी मात्र तुम्हाला अडचणीला तोंड द्यावे लागेल. ऊसाचा प्रश्न अतिशय भयानक झालेला आहे. शेती कळण्यासंबंधीचा मक्ता ज्या लोकांनी घेतला आहे. 1931मध्ये ब्राझील देशामध्ये इथेनॉलचा शोध लागला. आपल्या देशात इथेनॉल येण्यास जवळपास 70 वर्षे लागली. 2001 मध्ये माननीय श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील एन.डी.ए.च्या सरकारने इथेनॉल पदार्थ पेट्रोलमध्ये वापरण्याची परवानगी दिली. माननीय श्री.अटलबिहारी यांचे सरकार गेले आणि शेतीची चांगली माहिती असलेल्या व्यक्ती सत्तेत आल्या

2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल...

त्यांनी इथेनॉल बंद केले. आता इथेनॉलचे प्रॉडक्ट बंद आहे. इथेनॉलच्या व्यवसायात लोकांनी जवळपास 500 कोटी रुपये गुंतविले आहेत. केंद्रात कॉंग्रेसचे सरकार आल्यापासून इथेनॉलाचा एक लिटरचा व्यवहार झालेला नाही. या व्यवसायात अनेकांचे पैसे गुंतून पडलेले आहेत, त्यांच्या मशिनरी खराब होत आहेत. इथेनॉलचा वापर पुन्हा सुरु करण्याबाबत या शासनाकडून विचार का केला जात नाही ? या गोष्टीचा खुलासा केंद्राच्या वतीने राज्य शासनाने केला पाहिजे अशी माझी मागणी आहे. अर्थसंकल्पातील पृष्ठ क्रमांक-7 वर नमूद केले आहे की, आता 8 जिल्हयात गहू, 6 जिल्हयात भात आणि 18 जिल्हयात कडधान्य पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी योजना राबविण्यात येणार आहे. येथे बसून योजना सांगितली तर ती कोण राबविल हा खरा प्रश्न आहे. त्या योजना राबविण्यासाठी प्रलोभन पाहिजे, आकर्षण पाहिजे, काही तरी मिळाले पाहिजे तरच योजना खालच्या पातळीवर राबविल्या जातील. मी या निमित्ताने एक गोष्ट शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, एक लहान मुलगा न्हाणी घरात अडकला. त्याला बाहेर कसे काढावयाचे असा प्रश्न निर्माण झाला. तेथील एका म्हाता-याने सांगितले की, त्याला चिल्लर पैसे त्या मुलासमोर खूळ-खूळ वाजवा, तो मुलगा लगेच बाहेर येईल. त्या मुलाच्या घरातील माणसाने त्या मुलाच्या समोर चिल्लर वाजविली आणि तो मुलगा बाहेर आला. मुलाला जे कळते ते शहाण्या माणसाला कळत नाही. ग्रामीण भागातील शेतक-यांनी भात आणि गहूचा पेरा जास्त करावा म्हणून प्रयत्न करणार असाल तर त्या शेतक-यांना चांगल्या प्रतीचे बियाणे उपलब्ध करुन दिले पाहिजे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे उदाहरण दिले ते मला कळले नाही. लहान मूल बाहेर येणे आणि शेतकरी याचा काय संबंध येतो हे अधिक स्पष्ट जर झाले तर बरे होईल आणि सन्माननीय सदस्यांची कल्पना अतिशय विशाल पध्दतीने पण थोडक्यात मांडली. त्याचा जर अर्थसंकल्पाशी काही संबंध असेल मला ऐकण्यास आनंद होईल. अर्थसंकल्पाशी संबंध येत नसेल तर सन्माननीय सदस्यांनी सभागृहाचा वेळ घेऊ नये.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, मी याचा अर्थ समजावून सांगतो. ज्यावेळी सूर्यफुलाला 1400 रुपयांचा भाव दिला त्यावेळी शेतकरी डोक्यावरील फेटा काढून सूर्यफू झाकून ठेवत होता. तो फुलाला झाकत नव्हता तर त्यातील जे बी होते त्याची निगा ठेवत होता कारण त्यातून त्याला पैसा मिळणार होता. लहान मुलाला सुध्दा पैसा दाखविला तर ते बाहेर येते म्हणून मी मोरीतल्या मुलाचे उदाहरण दिले होते. थोडक्यात शेतकऱ्याला काही तरी पैशाचे आमिष दाखविले तरच तो शेती करील. केवळ शेती पिकवा असे सांगून शेतकरी पिकविणार नाही तर त्याने उत्पादन केलेल्या मालाला शासनाने योग्य तो भाव दिला तरच तो शेती करील. यावर्षाच्या सुरुवातीला भात आणि गहू लोकांनी का पेरले नाहीत याचा विचार केला तर 2007-08 मध्ये केंद्र शासनाने 865 रुपयांचा भाव देण्याची शिफारस केली होती. प्रत्यक्षात 600 रुपये भाव जाहीर केला. 865 रुपये देताना 13 दिवसांची बैलाची मजुरी आणि मजुराची 66 रुपये मजुरी असे एकूण 600 रुपये मिळाले. म्हणजे प्रत्यक्षात शेतकऱ्याला पैसे कमीच मिळाले. केवळ सल्ला देण्यापेक्षा शेतकऱ्याला पैसे कसे मिळतील हे शासनाने सांगावे. सहा जिल्हयात केवळ भाताचे पीक येते. पाऊस पडला तर नांगरट होते. पीक निघते. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, केवळ धान्य पेरण्यापेक्षा येणाऱ्या पिकाला जर योग्य भाव दिला पैसे वाढवून दिले तर शेतकरी शेती करील. आपण पाहिले तर असे दिसून येईल की माळावर सुध्दा शेतकरी ऊसाची शेती करु लागला आहे. 200 फूट खोल जाऊन पाण्याचा उपसा करुन तो शेती करु लागला आहे. ज्याठिकाणी हुलगा (कुळीथ) सुध्दा होत नाही त्याठिकाणी शेतकरी ऊसाचे पीक घेऊ लागला आहे. अन्नधान्याच्या बाबतीत जर आपल्याला स्वयंपूर्ण व्हावयाचे असेल तर धान्याला भाव दिला पाहिजे. यासंबंधी शासनाने विचार करावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भात मला एक-दोन मुद्दे उपस्थित करावयाचे आहेत. शासन नेहमी असे सांगत असते की आम्ही इतकी युनिट वीज निर्माण करीत आहोत, तितकी युनिट वीज निर्माण करीत आहोत पण प्रत्यक्षात तसे होत नाही. दवाखान्यांची तीच परिस्थिती आहे. या सरकारी सेवा आहेत त्यांची अखेर सुरु झालेली आहे. तुम्ही नव्याने वीज निर्मिती प्रकल्प राबविणार आहात. परंतु सध्याची जी वीज निर्मिती केंद्रे आहेत त्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी आणि त्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी टेंडर काढली जातात, पुन्हा मशीनरीमध्ये बिघाड होतो, पुन्हा टेंडर काढली जातात आणि त्यामध्ये कमिशन घेतले जाते. अशीच परिस्थिती चालू राहणार असेल तर राज्यामध्ये 100 टक्के वीज मिळण्याची सुतराम शक्यता नाही. आरोग्याच्या बाबतीत तीच परिस्थिती

.......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

आहे. परदेशामध्ये आम्ही असे ऐकले आहे की 100 टक्क्यांपैकी 95 टक्के कारखाने चालू स्थितीत आहेत. आपल्या देशामध्ये 60 टक्के कारखाने चालू आहेत. असे नेमके का होऊ लागले आहे याचा शोध घेणे आवश्यक आहे. याबाबत काही उपाययोजना केल्याशिवाय प्रगती होणार नाही.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात सर्वात कमी पैसा आदिवासी लोकांसाठी दिला गेला आहे. सुकथनकर समितीने जो अहवाल दिला होता त्याच्यापेक्षा जवळपास 348 कोटी रुपये कमी देण्यात आलेले आहेत.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

त्याचबरोबर ज्या अल्पसंख्याक समाजाच्या जिवावर तुमची सदस्य संख्या वाढली त्या लोकांसाठी यावर्षी 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. 25 हजार कोटी रुपयांच्या बजेटमध्ये 100 कोटी रुपये अल्पसंख्यांक समाजासाठी देण्यात आले. या अल्पसंख्याक समाजामध्ये चार-पाच धर्मांचा समावेश होतो. म्हणजे प्रत्येकाच्या वाट्याला अंदाजे 0.4 टक्के रक्कम येणार आहे. आतापर्यंत हे चित्र स्पष्ट झाले नव्हते. आता हे चित्र बाहेर गेल्यानंतर, लोकांना तुमचा चेहरा कळल्यानंतर काय होते ते बघा. तुमची सदस्य संख्या किती होईल हे आज मला सांगता येत नाही. अल्पसंख्याक समाजामध्ये चार-पाच धर्माचा समावेश होतो. त्यांना प्रत्येकी 0.4 टक्के तरतूद उपलब्ध होणार आहे. ही तरतूद कशी वाढवून देता येईल याचा विचार व्हावा.

सभापती महोदया, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची यावर्षी जन्मशताब्दी साजरी होत आहे. आता नेतेमंडळींचे नाव घेऊन काही होत नाही म्हणून देवदेवतांची नावे घेतली जात आहेत. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे खरे तर स्वातंत्र्य सेनानी होते. त्यांना मध्यप्रदेशमध्ये अटक झाली होती. मध्यप्रदेश सरकारकडून मी माहिती मागविली असता त्यांना अटक झाल्याबाबतच्या प्रमाणपत्राची प्रत मला देण्यात आली आहे. परंतु महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य सेनानींच्या यादीमध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या नावाचा समावेश झालेला नाही. ज्या महनीय व्यक्तिच्या नावाने तुम्ही गावा-गावांमध्ये बदल करु इच्छित आहात, तो बदल करुन शासनाचा चेहरा उजळावयास निघाला आहात, त्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांना मध्यप्रदेशच्या रायपूर जेलमध्ये 21.9.1942 ते 2.12.1942 या काळात अटकेत ठेवण्यात आले होते. म्हणजे खऱ्या अर्थाने ते स्वातंत्र्य सेनानी होते. त्यामुळे त्यांचे नाव महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य सेनानींच्या यादीमध्ये समाविष्ट झाले पाहिजे. त्याचबरोबर त्यांचे साहित्य, भजन, राष्ट्रवंदना यांचा शालेय अभ्यासक्रमामध्ये समावेश करण्यात यावा. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी, मजुरांना वाचविण्यासाठी पावले उचलत असताना सहावा वेतन आयोग लागू करण्याचा प्रयत्न सुरु आहे. या सहाव्या वेतन आयोगामुळे सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनात 40 टक्के वाढ मिळणार आहे. परंतु महाराष्ट्रातील शेतमजूराला 66 रुपये जी मजुरी मिळते त्यामध्ये वाढ होणार आहे की नाही? ही दरी दूर झाली नाही तर रशियामध्ये ज्याप्रमाणे ब्रेडसाठी खून पाडण्यात आले तसे प्रकार या राज्यात घडणे अशक्य नाही. जळगाव जिल्हयातील एका आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांने मरणापूर्वी जे पत्र लिहून ठेवले त्यात म्हटले होते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल..........

की, नांगर जमिनीमध्ये चालविणारे बळकट हात पुढाऱ्यांचे नरडे फाडल्याशिवाय राहणार नाहीत. या बजेटमध्ये त्यादृष्टीने काही बदल करता येतो का याचा विचार सन्माननीय अर्थमंत्र्यांनी करावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. जय हिंद.

---------

(नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) :सभापती महोदया, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करुन अर्थसंकल्पावरील माझ्या पहिल्या भाषणाला मी सुरुवात करतो.

महोदया, तरुण, तडफदार सन्माननीय अर्थमंत्र्यांनी या राज्याचा कोणतीही करवाढ नसलेला, सर्वसामान्यांना दिलासा देणारा आणि राज्याच्या विकासाचा वेग वाढविणारा 10 वा विक्रमी अर्थसंकल्प सभागृहाला सादर केला, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय या विभागाला भरीव निधी शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे, त्यामुळे मी मनापासून माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करतो. सन 2002-03 या वर्षासाठी 840.79 कोटी निधी उपलब्ध केला होता. गतवर्षी तो आकडा सन 2007-08 या वर्षासाठी 2295.35 कोटी विक्रमी वाढ झालेली आहे. या निधीतून या शासनाने खालीलप्रमाणे असंख्य योजना राबविल्या आहेत. त्यात समाजातील मुलींना शिष्यवृत्ती, मागासवर्गीयांना वसतिगृहे, सुविधा, निवासी शाळा व शिष्यवृत्ती, फी माफी, अन्न, निवारा, गृहनिर्माण योजना, आश्रमशाळा, उच्च शिक्षणासाठी, पायलट होण्यासाठी, परदेशात जाणाऱ्या मुलांना भरीव शिष्यवृत्ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला वाघिणीचे दूध म्हटले आहे. शिक्षणासाठी या समाजाला भरीव तरतूद केलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य योजना, फुले-शाहू पारितोषिक प्राविण्य, राजश्री शाहू महाराज प्राविण्य पारितोषिक योजना, या माध्यमातून मोफत शिक्षण, विद्या वेतन. मागासवर्गीय सर्व महामंडळांना भरीव अनुदान, दारिद्र्यरेषेखालील अनुसूचित जाती व नवबौध्द भूमिहीन, शेतमजूर यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी चार एकर कोरडवाहू जमीन, दोन एकर ओलिताखालील जमीन मोफत अशा प्रकारे जमीन वाटप करण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र जमीन वाटपाची योजना आखली असली तरी गेली दोन वर्षे एक एकरही जमीन वाटप झाले नसल्याचे निदर्शनास आणून देत आहे. अशा अनेक योजना असल्या तरी वरील निधीचा विनियोग शासन यंत्रणेकडून समाधानकारक होत नाही.

महोदया, केंद्रशासनाने विशेष घट योजनेत दिलेल्या निधीचा वापरच होत नाही, त्यामुळे राज्य शासनाकडून हा निधी परत जातो. अतिशय खेदाने सांगावे लागते की, मागासवर्गीयांचा निधी सिंचन प्रकल्पासाठी वापरण्यात आला. यावर्षीही निधी वळविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र राज्य हे फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचे पुरोगामी राज्य आहे. या समाजाने अनंत वेदना सहन

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ......

केल्या आहेत. त्यामुळे सन्माननीय सभापतींच्या मार्फत मी शासनाला कळकळीची विनम्र विनंती करतो की, कृपया या निधीला स्पर्श करु नका. अन्य विभागाला वळवू नका. राज्याचा अर्थसंकल्प हा शासन व दलित मागासवर्गीय यांचे धोरण ठरविणारा प्रमुख दस्तऐवज आहे. म्हणूनच ज्या समाजाने दु:ख, दारिद्र्य, वेदना सहन केल्या आहेत. त्या असंख्य जाती-जमातींचा सन 2003-04 च्या अर्थसंकल्पात कायमस्वरुपी नोंदी आल्या आहेत. त्या अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व त्या अंतर्गत असंख्य जाती व उपजाती, गट व उपगट, गावोगावी हिंडणारे गावमागते, वासुदेव, भराडी, वैदू, कोल्हाटी, चित्रकथी, गोपाळ, गोंधळी, भोपे, भुते, मरगम्मावाले, किंप्रीवाले, जोगी, मसणाजोगी, कुडमुडेजोशी, माकडवाले, अस्वलवाले, दरवेशी, सापवाले, मरीआईवाले, झापटोपल्या वळणारे कैकाडी, माती उचलणारे, वडार, गावपारधी टकारी, कांजाराभाट, रामोशी, छप्परबंद, अशा कितीतरी लोकांना पिढयांन्पिढया समाजाच्या मुख्य प्रवाहात घेता आले नाही. त्यांना शासनाच्या कोणत्याही सवलतीचा फायदा झालेला नाही. अशा समाजाचा विचार हे फक्त आमचेच शासन करु शकते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जर या महाराष्ट्रत जन्माला आले नसते तर या राज्याचा दलित मुख्यमंत्री कदापि झाला नसता. मुख्यमंत्री होण्याचा पहिला मान सन्माननीय श्री. सुशीलकुमारजी शिंदे यांच्या माध्यमातून कॉंग्रेस पक्षाने दिलेला आहे, याची नोंद इतिहासात झालेली आहे.

अर्थसंकल्पात मागासवर्गीय महामंडळाना भरीव अर्थसहाय्य झालेले आहे. महात्मा फले विकास महामंडळासाठी 100 कोटी, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळास 60 कोटी रुपये, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळास 16 कोटी रुपये, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ, शेळी व मेंढी विकास महामंडळ इत्यादी महामंडळाना भरीव तरतूद उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच रोहिदास चर्चोद्योग विकास महामंडळास 60 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाचे यापूर्वीचे नाव चर्मोद्योग विकास महामंडळ असे होते व या महामंडळाची स्थापना कै. वसंतराव नाईक हे मुख्यमंत्री असतांना झाली होती. विधानसभेच्या सभागृहात चर्मकार समाजाचे नेते सन्माननीय सदस्य कै. रा.अ. खैरे होते. कै. बाबू जगजीवनराम, माजी उपपंतप्रधान व चर्मकार या समाजाचे नेते यांच्या प्रेरणेने या महामंडळाची स्थापना झाली. या महामंडळाचे स्थापनेचे अधिकृत भाग भांडवल फक्त 5 लक्ष होते ते आज रु. 60 कोटी झालेले आहे. हे महामंडळ पहिली पंधरा वर्षे तोटयात होते. आज नफ्यात आहे. या समाजाची औद्योगिक सामाजिक क्रान्ति झाल्याशिवाय जातियता, विषमता नष्ट होणार नाही, हे स्पष्ट आहे.

सभापती महोदय, या राज्यात औद्योगिक क्षेत्रात झपाटयाने वाढ होत आहे. गत कालावधीत निदेशांक मधील वाढ 9.6 टक्के झालेली आहे. समाजाच्या औद्योगिक उन्नतीसाठी राज्याचा "जागतिक चर्मोद्योग प्रकल्प" अंबरनाथ येथे सुरु झालेला आहे. त्यावेळी हे महामंडळ "उद्योग" खात्यामध्ये समाविष्ट होते, आज समाजकल्याण विभागाला समाविष्ट आहे. विद्यमान मुख्यमंत्री व त्यावेळचे उद्योग मंत्री सन्माननीय श्री. विलासरावजी देशमुख व सन्माननीय श्री. सुशीलकुमारजी शिंदे व अन्य 3 मंत्र्यांच्या प्रयत्नाने हा "जागतिक अंबरनाथ चर्मोद्योग प्रकल्प" उभा राहिला आहे. या महामंडळाच्या प्रस्थापनेचा मी एक साक्षीदार होतो.

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, आमच्या सर्वेसर्वा राष्ट्रीय अध्यक्षा सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी, प्रान्ताध्यक्षा श्रीमती प्रभाताई राव, दिल्लीतील माझे नेते सन्माननीय श्री. सुशीलकुमारजी शिंदे, राजयाचे मुख्यमंत्री सन्माननीय श्री. विलासरावजी देशमुख, प्रभारी सन्माननीय श्रीमती मार्गारेट अल्वा यांचा मी शतश: आभारी आहे. मी आता एकाच समाजाच्या मर्यादेत नसून समाजातील दलित, पददलित, मागासवर्गीय, बौध्द या सर्वांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे, हे माझे आद्यकर्तव्य राहणार आहे. या उद्योगात आज इतर उच्चवर्णीय उद्योगपतीही आहे. श्री. गायतोंडे, श्री. देशपांडे इत्यादी महाराष्ट्रीयन नावे आहेत. हा धंदा आज कोणा एका जातीचा राहिलेला नाही. त्याचा फायदा इतरानांही झाला पाहिजे. त्यामुळे या महामंडळासाठी चालू अर्थसंकल्पात "संत रोहिदास चर्मोद्योग" विकास महामंडळाचे अधिकृत भागभांडवल रु. 100 कोटी करावे, अशी मी या सभागृहामार्फत शासनाला विनंती करतो.

या मागणीसाठी गेली सुमारे एक वर्ष महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीच्या मार्फत आमच्या प्रान्ताध्यक्षा सन्माननीय प्रभाताई राव यांच्या नेतृत्वाखाली एक आराखडा तयार करण्यात आला होता त्याचा पाठपुरावा पक्षाच्या माध्यमातून आम्ही व व राज्य शासनाने केला आहे. संयुक्त लोकशाही आघाडी सरकारने देशातील शेतक-यांचे 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केलेले आहे. केंद्रीय अर्थसंकल्पाच्या अगोदर पंधरा दिवस आधी आम्ही प्रान्ताध्यक्षांच्या नेतृत्वाखाली सर्व पदाधिकारी दिल्लीत तळ ठोकून होतो. माननीय पंतप्रधांनाशी सविस्तर चर्चा केली. शेतक-यांचे शिष्टमंडळ घेऊन सन्माननीय श्रीमती सोनियाजी गांधी यांना भूमिका समाजावून दिली. देशातील शेतक-यांचे 60 हजार कोटी रुपये कर्ज माफ करण्यामध्ये सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांचा सुध्दा मोठा हात आहे.

मी आता विरोधी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सन 2003-2004 मध्ये राज्यात प्रचंड दुष्काळ पडला होता. जनावरांना चारा-पाणी नव्हते. जनावरे मरत होती. शासनाने छावण्या उभ्या केल्या होत्या, टॅंकरने पाणीपुरवठा केला जात होता. प्रतिदिनी दिवशी अंदाजे 3.5 कोटी रुपये खर्च होत होते. त्यावेळेस केंद्रात तुमचे सरकार होते, तुमच्याच सर्वांच्या विनंतीनुसार पक्षाच्या

....3

अशुद्धप्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सर्व नेत्यांना त्यावेळचे राज्याचे मुख्यमंत्री सन्माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे दिल्लीत सर्वांना घेऊन गेले. माननीय पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांची भेट घेतली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्याचे कौतुक केले परंतु त्यांना रिकाम्या हाताने परत यावे लागले. म्हणजे राजा उदार झाला अन् हाती भोपळा दिला असेच त्यावेळी आम्हाला म्हणावे लागले. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी दुष्काळग्रस्तांसाठी 452 कोटी रुपयांचे विशेष पॅकेज घोषित केले. त्यावेळेस केंद्रात तुमचे सरकार होते परंतु त्यावेळी महाराष्ट्रातील दुष्काळी भागासाठी त्यांनी काहीही निधी दिला नाही. त्यामुळे जे चांगले आहे त्याला चांगले म्हटले पाहिजे. तुम्हाला टीका करण्याचा काही एक अधिकार राहिलेला नाही.

सभापती महोदया, मला शेवटी एकच सांगावयाचे आहे की, दलित साहित्यिक बाबुराव बागुल यांचे नुकतेच निधन झालेले असल्यामुळे त्यासंबंधीचा शोक प्रस्ताव या सभागृहात यावा, अशी मी सभागृहास विनंती करतो.

आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी (वर्धा -चंद्रपूर -गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था ):सभापती महोदया,माननीय अर्थमंत्र्यांनी 2008-2009 सालचा अर्थसंकल्प सादर केलेला असून या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी आणि शासनाचे अभिनंदन करण्यासाठी मी येथे उभा आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्र राज्यात अनेक मागास भागात तसेच ग्रामीण भागात दळणवळण, रस्ते, पाणी आणि वीज यांच्या काही प्रमाणात समस्या असल्यामुळे त्या समस्या सोडविण्याकडे शासनाने प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे. ग्रामीण आणि मागासलेल्या भागात मुलभूत सुविधा पुरविण्याची आवश्यकता असल्यामुळे मी त्याकडे शासनाचे लक्ष वेधत आहे.सभापती महोदया, सर्व प्रथम मी गडचिरोली, वर्धा, चंद्रपूर या तीन जिल्हयाच्या संदर्भात प्रामुख्याने येथे बोलणार आहे. गडचिरोली , चंद्रपूर आणि वर्धा या जिल्हयात मोठया प्रमाणावर वन क्षेत्र आहे. गडचिरोली जिल्हा 66 टक्के आणि चंद्रपूर जिल्हा 45 टक्के वन क्षेत्राने व्याप्त आहे. त्या जिल्हयातील लोकांनी वनाचे संवर्धन आणि संरक्षण केले परंतु त्या वनाचा फायदा त्या जिल्हयातील लोकांना मिळत नाही असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे. त्या भागातील जंगल वाचविण्याचा मोठया प्रमाणावर प्रयत्न केला जातो. परंतु त्या ठिकाणच्या वन जमिनीचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या संदर्भात हायकोर्टाने एक आदेश दिलेला आहे अशी वर्तमानपत्रात बातमी प्रसिध्द झाली होती. चंद्रपूर, बल्लारशहा आणि राजूरा या सारख्या शहरी भागात वन विभागाच्या जमिनीत काही लोकांनी अतिक्रमण केले आहे. त्यांच्या जमिनी नियमित करण्याच्या प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी 40 - 50 वर्षा पासून सातत्याने शासनाकडे पाठपुरावा केलेला आहे आणि सरकारचे लक्ष वेधले आहे परंतु सरकार त्याकडे लक्ष देत नाही. प्रत्येक वेळी शासनाकडून असे उत्तर देण्यात येते की, ही वन विभागाची जमीन असल्यामुळे आम्ही त्या बाबतीत काही करु शकत नाही. सभापती महोदया, आमच्या भागात अनेक उद्योग येत आहेत. त्या उद्योगासाठी जमिनीची आवश्यकता असते. मोठया उद्योगासाठी एक एक हजार एकर जमिनीची आवश्यकता आहे. मी उद्योगाच्या जमिनीच्या संदर्भात आपल्याला उदाहरण सांगतो की,.या उद्योगासाठी राज्य शासनाकडून किंवा केन्द्र सरकारकडून जो क्लिअरन्स घ्यावा लागतो तो सहा सहा महिन्यात मिळत असतो. वन विभागाने काही नियम तयार केलेले आहेत. एक हजार एकर वन जमीन उद्योगासाठी घेण्यात आली असेल तर अडीच एकर जमीन द्यावी लागते, त्या जमिनीवर जे जंगल असते त्याचे पैसे द्यावे लागतात. त्याप्रमाणे उद्योजकाला उद्योगासाठी जमीन हवी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी ....

असते तो उद्योजक हे पैसे देत असतो. त्याचप्रमाणे मुंबई, गडचिरोली, चन्द्रपूर शहराला लागून जी जमीन असते त्या जमिनीवर अनेक ठिकाणी गरीब लोकांनी घरे बांधलेली आहेत. आमच्या बल्लारपूर शहरामध्ये मी 30 वर्षापासून नगरपरिषदेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत आहे. त्याठिकाणी गेल्या तीस वर्षात बरीच डेव्हलपमेन्ट झाली असून तेथे रस्ते, वीज, पाणी इत्यादी नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तेथील लोकप्रतिनिधींनी त्या भागाचा विकास व्हावा म्हणून प्रयत्न केला असून वन विभागाने बल्लारशहा नगरपालिकेच्या अध्यक्षांच्या विरुध्द तसेच नगरसेवकाच्या विरुध्द पोलीस कारवाई केलेली आहे. ही कारवाई मागे घेण्याच्याा दृष्टीने शासन आम्हाला कोणतीही मदत करीत नाही. या अर्थसंकल्पावरील चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती करावयाची आहे की या प्रकरणी त्यांनी लक्ष द्यावे व गरीब लोकांना कायम स्वरुपी राहण्यासाठी जागा मिळावी या दृष्टीने विचार करावा. एखादा उद्योग सुरु करावयाचा असेल तर त्या उद्योगासाठी देखील जागा लागते . वन विभागाची जमीन उद्योगपती पैसे भरुन मिळवत असतात त्या नियमा प्रमाणेच सरकारने देखील गरीब लोकांना राहण्यासाठी या वन जमिनी उपलब्ध करुन द्याव्यात असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, यानंतर मला दुसरा मुद्दा येथे मांडावयाचा आहे. चंन्द्रपूर, गडचिरोली, वर्धा या भागात पैनगंगा , वैनगंगा, वर्धा या मोठया नद्या वाहतात. हा संपूर्ण पहाडी भाग आहे तेथे मोठया प्रमाणावर जंगल आहे. संपूर्ण राज्यात जेवढे वाघ नसतील एवढे वाघ चंद्रपूर व ताडोबा या भागात आहे. वन विभागामार्फत वाघांचे चांगल्या प्रकारे संरक्षण केले जात नाही. त्यांच्याकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही. .माणसांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही परंतु या जंगलात राहणा-या प्राण्यांना देखील पाणी मिळत नाही. त्यामुळे अनेक गावामध्ये वाघ येत असतात यासंबंधीची चर्चा या सभागृहात आणि खालच्या सभागृहात होत असते. आमच्या जिल्हयातील काही भागामध्ये 100-150 किलोमिटर्स क्षेत्रफळाचे जंगल आहे. काही ठिकाणी तर 400 किलोमिटर्स क्षेत्राचे जंगल आहे. एका वाघासाठी दहा किलोमिटर्स एवढे क्षेत्र असले पाहिजे असा वन विभागाचा नियम आहे. त्या वाघांना पाणी पिण्यासाठी टॅन्क बांधण्यात येत असतात परंतु त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी टॅन्क बांधण्यात आला असल्याचे व तेथे पाण्याची व्यवस्था करण्यात आल्याचे कागदपत्रावर दाखविण्यात येते परंतु प्रत्यक्षात तेथे टॅन्क बांधलेला नसतो किंवा त्या ठिकाणी पाण्याची सोय

3...



VTG/ KTG/ SBT/ प्रथम श्री.जुन्नरे 10.35

श्री.जैनुद्दीन जव्हेरी .................

केली जात नाही. याकामासाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जाते त्यानुसार निधी मिळतो परंतु तो कोठे खर्च केला जातो हे समजत नाही तेव्हा जंगालात राहणा-या प्राण्यांच्या पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात यावी असे मला या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे.

सभापती महोदया, पर्यावरणाच्या बाबतीत आणि जंगलातील प्राण्यांच्या सदर्भात नेहमीच चर्चा केली जाते.गडचिरोली आणि चंद्रपूर या भागातील जंगलामध्ये अनेक प्राणी आहेत तेव्हा त्यांच्या पाण्याची सोय प्रत्यक्षात होत नाही तेव्हा या सोयी करण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करण्यात आली पाहिजे व त्यानुसार प्रत्यक्षात खर्च करुन टॅन्क बांधण्यात आले पाहिजेत. यानंतर मला पर्यटनासंबंधी बोलावयाचे आहे. संपूर्ण राज्यात पर्यटनाच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जव्हेरी ....

सभापती महोदया, मी आमदार होऊन आता दीड वर्षे झाले. या ठिकाणी या संदर्भात मला एक गोष्ट सांगाविशी वाटते की, प्रत्येक लोकप्रतिनिधी आपापल्या विभागातील काम झाले पाहिजे, आपल्या भागाचा विकास झाला पाहिजे असे म्हणत असतात. परंतु महाराष्ट्राचा विकास म्हणजे मुंबईचा विकास असाच जणू काही सर्वांचा समज झालेला आहे. तसेच विदर्भाचा विकास म्हणजे नागपूरचा विकास असेही गृहीत धरले जाते. नागपूर चांगले झाले म्हणजे विदर्भ चांगला आणि सुंदर झाला असेही म्हटले जाते. आता मी चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशा येथे राहतो. गेली 16 वर्षे मी डीपीडीसीमध्ये होतो. त्यातील अनुभवातून मीही असेच म्हणतो आहे की, चंद्रपूर-बल्लारशा शहराचा विकास म्हणजे चंद्रपूर जिल्ह्याचा विकास असाच समाज साऱ्या शासनाच्या अधिकाऱ्यांचा आणि अगदी मंत्र्यांचा देखील झालेला आहे. मध्यंतरी आमचे अर्थमंत्री माननीय श्री.जयंत पाटील साहेब आमच्याकडे आले होते त्यांनी 20 कोटी रूपये चंद्रपूर शहरासाठी दिले, जिल्ह्यासाठी म्हणून दिले नाहीत तर शहरासाठी दिले. आपण असे का करता ? आपली अर्थव्यवस्था अशी कशी राबविली जाते ? माझे म्हणणे असे आहे की, आपणास जे काही बजेट द्यायचे आहे ते आपण साऱ्यांना वाटून द्या. अशा प्रकारे जिल्ह्याचे हेडक्वार्टर आहे त्याचा विकास म्हणजे साऱ्या जिल्ह्याचा विकास असे आपण कृपा करून समजू नका. नागपूरचा विकास झाला म्हणजे विदर्भाचा विकास झाला आहे असे नव्हे. तसेच मुंबईचा विकास म्हणजे साऱ्या महाराष्ट्राचा विकास झाला असे होत नाही हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ही जी आपली अर्थव्यवस्था आहे ती बरोबर नाही. आपल्याला महाराष्ट्र राज्याचा विकास करावयाचा आहे तर मग प्रत्येक ग्रामपंचायती, प्रत्येक तालुक्याचा विकास झाला पाहिजे. त्यादृष्टीने आपण आपले बजेट राबविले पाहिजे. आमच्याकडे अनेक मोठमोठ्या नद्या आहेत ही बाब लक्षात घेऊन पर्यटनाच्या दृष्टिकोनातून आपण चंद्रपूर जिल्ह्याकडे लक्ष द्यावे अशी मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे. आज महाराष्ट्राचा एकूण महसूल पाहिला, विशेष करून चंद्रपूरचा महसूल पाहिला तर आपल्या लक्षात येईल की, चंद्रपूर जिल्ह्यात अनेक मोठे उद्योग आहेत पण त्यांच्याकडून तेवढ्या मोठ्या प्रमाणात महसूल मिळत नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील उद्योगांमधून जो महसूल राज्याला मिळतो त्यातून आपण चंद्रपूर जिल्ह्याला काय देता हेही आपण पहावे. सभापती महोदया, आमच्याकडे पोल्यूशनचा प्रश्न मोठा आहे, आमच्याकडे मोठे

..... आय 2 ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जव्हेरी ...

उद्योग असल्याने हे पोल्यूशन होत असते. परंतु याबाबत कितीही तक्रारी केल्या तरी त्याबाबत काहीही कारवाई होत नाही. जिल्ह्यात होणारे पोल्यूशन पाहण्यासाठी अनेक शासकीय अधिकारी आणि मंत्री देखील त्यांच्या गाड्यांमधून येतात. खरे तर हे पोल्यूशन दूर करण्यासाठी आपण शेकडोंनी पैसे खर्च करीत असतो, पण त्यातून पोल्यूशन दूर होते काय ? मी तीस वर्षे तेथे नगर परिषदेमध्ये होतो. तेथे एक फॅक्टरी आहे, त्यातून मोठ्या प्रमाणात पोल्यूशन होते. आमच्या गावातून वर्धा नदी जाते, ही मोठी नदी आहे. त्यामध्ये या फॅक्टरीतून होणाऱ्या पोल्यूशनबद्दल आम्ही अनेक तक्रारी सरकारकडे केल्या आहेत. आमदार, खासदारांनी देखील तक्रारी केल्या आहेत. परंतु तरीही तेथील पोल्यूशन जात नाही वा कमी होत नाही. पोल्यूशन तपासण्यासाठी जे अधिकारी येतात त्यांना मात्र तेथील पोल्यूशन दिसत नाही. अगदी कलेक्टर, मंत्री देखील येतात पण त्यांनाही हे पोल्यूशन दिसत नाही. ते त्यांच्या गाड्यांच्या काचा खाली न करताच येतात आणि जातात. मध्यंतरी आमचे कृषी मंत्री देखील आमच्या भागात आले होते. मात्र त्यांचा अनुभव चांगला आहे. असेच एकदा एक मंत्री महोदय आले होते, त्यांनी मला विचारले हे येथे मोठे हिमालयाचे पहाड आहेत काय ? मी त्यांना सांगितले की, ते हिमालयाचे पहाड नाहीत तर चुन्याचे डोंगर आहेत आणि त्यातून मोठे पोल्यूशन आमच्याकडे होते. सभापती महोदय, आमच्याकडील पोल्यूशन तपासण्यासाठी जी सरकारी टीम येते ती तेथे नेमके काय तपासते ते समजत नाही. मात्र जाताना योग्यतेचे प्रमाणपत्र देऊन जाते. तेव्हा या पोल्यूशनच्या प्रश्नाकडे शासनाने लक्ष द्यावे अशी मी विनंती करतो. दुसरे मला असे सांगावयाचे आहे की, आपण तेथे उद्योगांनाही परवानगी देता आहात तर जरूर द्या, महाराष्ट्रात उद्योग आले पाहिजेत. पण त्यांच्याकडून आपण काय घेतो ते तरी पहा. याचे एक उदाहरण मी सांगतो. कुंभार मटका बनवितो, तो गरीब माणूस आहे. तसेच विटा बनविणाराही गरीब माणूस आहे, रेती आणणाराही गरीब माणूसच आहे, तो काही मोठा उद्योगपती नाही, केवळ त्याच्याकडे 1-2 ट्रक्स असतात इतकेच. परंतु जे उद्योगपती आहेत, जे लाईमस्टोन, कोल वगैरे काढून घेतात, त्यावर मोठी कमाई करतात. त्यासाठी खाजगी जागा असेल तर ती 25-30 हजार एकर, जास्तीत जास्त 2 लाख रूपये एकर या भावाने जमीन घेतात. एका एकरातून 15 कोटी रूपयांचे खनिज निघते आणि ते काढण्यासाठी 25-30 लाख रूपये खर्च येतो. पण गरीब कुंभाराला तो बनवित असलेल्या मटक्याच्या निर्मितीतून 50 रूपये रॉयल्टी द्यावी लागते

..... आय 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जव्हेरी ....

आणि विटा बनविणाऱ्याला जास्तीत जास्त 60 रूपये द्यावी लागते. मात्र 40 हजार टन सिमेंट बनवून विकणाऱ्या उद्योगपतीकडूनही तेवढीच म्हणजे 50 रूपयेच रॉयल्टी लावली जाते. ...

( यानंतर श्री. सरफरे .... जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुध्दीन जव्हेरी....

लोखंड 48 हजार रुपये टन भावाने घेऊन जातात आणि ते भट्टीमध्ये टाकतात, त्यालाही 50 रुपये भाव. देता. तुमचा कुंभार आणि टाटा-बिरला या दोघांचे रेट सारखे देता. तर मग तुमचे बजेट कसे चालणार ? तुम्ही व्हॅल्युएशनवर रॉयल्टी घ्या, नाहीतर तो ठेका बी.ओ.टी. तत्वावर करण्यास मला दया. तुम्हाला जेवढी रॉयल्टी मिळते त्याच्या दुपटीने देण्याबाबत मी करार करतो. अशाप्रकारची अर्थव्यवस्था चालणार नाही. सभापती महोदया, आमच्या चंद्रपूर जिल्हयात एकदा आंदोलन करण्यात आले. 15 रुपयांची रॉयल्टी असतांना शासनाने ती वाढवून 50 रुपये केली. माझे कुंभार बंधू आले आणि म्हणाले की, सरकारने हे चांगले केले नाही. मी याबाबत आंदोलन केल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी मला बोलावून सांगितले की, रेती, विटा इत्यादीची तुमची रॉयल्टी 50 हजार रुपये झाली नाही तर 50 रुपये झाली आहे. आम्ही एल. अँड टी. ला 18 कोटींची नोटीस दिली असून आता भाव कमी होतील. त्यामुळे 18 कोटीवरुन डायरेक्ट दीड कोटीवर भाव येतील. आम्ही आंदोलन केल्यानंतर त्यांचे 18 कोटींचे भाव कमी झाले. शासनाच्या हे लक्षात आले नाही परंतु बिरला आणि कुंभार यांच्या लक्षात आले की, आपण दोघे जण भाऊ भाऊ आहोत. साखर कारखानदार आणि कास्तकार हे दोघेही भाऊ भाऊ नाहीत. त्यामुळे आपण हे भाऊ भाऊ करावयाचे सोडून द्या.

सभापती महोदया, खनिजच्या विषयावर शासनाने लक्ष द्यावे अशी मागणी करतो. आपल्या भारतामध्ये त्रिस्तरीय पध्दत राजकीय जीवनामध्ये आहे. म्हणजे केंद्र शासन, राज्य शासन आणि लोकल सेल्फ गव्हर्नमेंट म्हणजे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अशी आहे. आपल्याला यामध्ये लोकशाही पहावयास मिळते. लोकशाहीमध्ये "लोक" म्हणजे "जनता" आणि "शहा" म्हणजे बादशहा. आपण आम्हाला 5 वर्षाकरिता निवडून दिल्यानंतर पुन्हा किती दिवसात परत जाऊ याची खात्री देता येत नाही. मी नगरपरिषद, जिल्हा परिषदेवर सदस्य होतो. तेथील प्रत्येक कामाचे ऑडिट होत असते. आता विधानसभेने नवीन कायदा करुन नवीन ऑडिट करण्यात आले आहे की, नगरपरिषदेमध्ये कुणीही भ्रष्टाचार केला तरी त्याची रिकव्हरी सदस्यांकडून केली जाते. या वसूलीबाबत मला देखील नोटीस आली होती. जर त्यांनी हे पैसे भरले नाही तर त्याच्या मालमत्तेची विल्हेवाट केली जात नाही. परंतु या ऑडिटचा फायदा आम्हाला न होता त्याचा आम्हाला त्रास झाला. सभापती महोदया, त्याठिकाणी नगरपालिका, जिल्हा परिषदेला लागणाऱ्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

श्री. जैनुध्दीन जव्हेरी....

सर्व वस्तूंची खरेदी मुंबईहून केली जाते. आम्हाला लागणाऱ्या सर्व वस्तूंची खरेदी मुंबईहून येते. आम्ही पंचायत राज व्यवस्थेबाबत कै. राजीव गांधी यांचे नाव घेतो. तर मग याबाबत नगरपालिका आणि जिल्हा परिषद यांना त्यांचे अधिकार बहाल केले पाहिजेत. आज त्या नगरपालिकेच्या नगराध्यक्षाला आपण शासन व्यवस्थेमध्ये सहभागी आहोत असे माहीत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, ग्रामपंचायत, नगरपरिषद आणि जिल्हा परिषदांना त्यांचे सर्व मूलभूत अधिकार मिळाले पाहिजेत.

सभापती महोदया, केंद्र शासनाने सच्चर आयोगाचा अहवाल मंजूर केल्यानंतर आपल्या सभागृहामध्ये हा अहवाल ठेवण्यात आला. तो अहवाल शासनाने मान्य करुन अल्पसंख्य समाजाकरिता 100 कोटींची तरतूद करण्यात आली आहे. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल म्हणतात की,अल्पसंख्य समाजासाठी आपण काय केले आहे? असे म्हणणे वेगळे असते. ज्यावेळी ठराव सभागृहामध्ये चर्चेकरिता मांडण्यात येतो त्यावेळी आपण त्यावर न बोलता निघून जाता. अल्पसंख्य समाजासंबंधी ज्यावेळी चर्चा उपस्थित करण्यात येते त्याबाबत माझी आपणास विनंती आहे की, आपण जे बोलता तसे करा, आणि तुम्ही जे करीत आहात ते दाखविण्यासाठी याठिकाणी हात वर करुन आमच्या ठरावाला आपण समर्थन ध्यावे. याठिकाणी पक्षाचा काहीही संबंध नाही. आपल्या पक्षाने आक्षेप जरी घेतला तरी आपल्या मनामध्ये असलेली व्यथा याठिकाणी सांगण्यास हरकत नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जैनुद्दीन जव्हेरी . . . .

तुम्ही व्यथा सांगता आणि मग पळून जाता. नंतर असा बोर्ड लावला जातो की, "सच्चर आयोग किसने लाया ? हमने लाया" परंतु असे म्हणू नका. हे सभागृह म्हणजे लोकशाहीचे मंदिर आहे. माझ ो असे म्हणणे आहे की, तुम्ही जे काही सांगत आहात, त्यावर ठाम रहावे. तसेच अल्पसंख्यांकांसाठी 100 कोटी रुपये नाही तर 500 कोटी रुपयांपर्यंत अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले पाहिजे अशी सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर त्यांनी तसा ठराव द्यावा, आम्ही सर्वजण त्याच्या पाठिशी राहू. माझी अशी विनंती आहे की, शासनाने अल्पसंख्याकांसाठी 100 कोटी रुपयांचा निधी देण्यात आला आहे, तो वाढवून 500 कोटी रुपये देण्यात यावा. एवढेच सांगू इच्छितो. सभापती महोदया, आपण मला भाषण करण्यासाठी संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

------

. . . .के-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनावणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदया, याठिकाणी सुरु असलेल्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदया, माननीय अर्थमंत्री श्री.जयंतराव पाटील यांनी विधानसभेमध्ये आणि माननीय अर्थ राज्यमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी विधान परिषदेमध्ये अर्थसंकल्प मांडलेला आहे. हा अर्थसंकल्प सर्वसामान्य लोकांना न्याय देणारा, शेवटच्या माणसापासून व्यापाऱ्यांपर्यंत सर्वांना दिलासा देणारा आहे. त्यांनी 25 हजार कोटी रुपयांचे शिलकी अंदाजपत्रक मांडले आहे. हा अर्थसंकल्प विकासाभिमुख तसेच सामाजिक न्याय देणारा आहे आणि अशा प्रकारचा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्री, माननीय राज्यमंत्री यांचे अभिनंदन करतो, त्यांचे आभार मानतो आणि या अर्थसंकल्पाचे समर्थनही करतो.

सभापती महोदया, या अर्थसंकल्पामध्ये दोन महत्वाचे गौरवपूर्ण निर्णय घेण्यात आलेले आहेत. एक म्हणजे संगणकीकरण करण्याचा निर्णय आणि त्यातून डिजीटल महाराष्ट्राची संकल्पना निश्चितच साकार होईल. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे जिल्हा नियोजनासाठी अर्थसंकल्पात दुप्पटीने म्हणजे जवळजवळ 2000 कोटी रुपयापर्यंत वाढ केलेली आहे. त्यामुळे जिल्हया-जिल्हयामध्ये विकासाला निश्चितच संधी मिळेल. जिल्हा नियोजनासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करीत असताना पूर्वीच्या नियोजनाला फाटा देऊन वितरण आणि प्रशासकीय मान्यता देण्याच्या बाबतीत जिल्हाधिकारी यांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे वेळेचा अपव्यय टाळून ठराविक वेळेमध्ये अंमलबजावणी होईल आणि जलद गतीने, निश्चित कालावधीमध्ये 100 टक्के कामे पूर्ण होतील असे मला वाटते आणि त्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे आभार मानतो.

सभापती महोदया, यानंतर कृषी आणि कृषी क्षेत्राशी निगडीत असलेल्या क्षेत्रामध्ये 4.4 टक्के दराने वार्षिक वाढ करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे आणि ते चांगले आहे. त्याकरता शेतकऱ्यांसाठी निरनिराळया योजना आखल्या असून कर्ज माफीचे धोरण अंगिकारले आहे. परंतु शेतीतील विकास दर वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. विकास दर वाढविण्यासाठी उत्पादनामध्ये वाढ करणे, अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्णता आणणे, सिंचन क्षमता वाढविणे आणि शेतीमध्ये सार्वजनिक गुंतवणुकीचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. माननीय नेते श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांनी शेतकऱ्यांची असलेली हलाखीची स्थिती, कर्जबाजारीपणा आणि या सर्व प्रश्नातून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या इ.बाबींचा विचार करुन केंद्र शासनाच्या माध्यमातून

. . . .के-3



श्री.दिलीपराव सोनावणे . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्ज माफीची योजना मंजूर करुन घेतली. ते करीत असताना 5 एकर जमीन असलेल्या शेतकऱ्यांना 60 हजार कोटी रुपयांची कर्ज माफी देण्यात आली. हा खरोखरच ऐतिहासिक निर्णय म्हणावा लागेल. महाराष्ट्रातील लाखो शेतकऱ्यांना याचा फायदा होणार आहे, मी त्यांचे आभार मानतो. परंतु त्याचबरोबर विदर्भ, मराठवाडा विभागातील शेतकऱ्यांना अल्पसा फायदा होणार आहे. त्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्याची आणि पुरेशी तरतूद करण्याची गरज आहे असे वाटते. तसेच पाच एकरापेक्षा जास्त जमीन असलेल्या शेतकऱ्यांसाठी देखील तरतूद होणे गरजेचे आहे. अनेक शेतकऱ्यांकडे 5 एकरापेक्षा जास्त जमीन असल्याने, ते देखील कर्जबाजारी आहेत. त्यांना देखील शासनाने स्वत:पुढे येऊन मदत करावी. तसेच शासनाने आपल्या स्तरावर कर्ज माफीची योजना राबवावी. यासाठी माननीय वित्तमंत्र्यांनी, शासनाने ठोस पावले उचलण्याची आवश्यकता आहे. परंतु ज्या शेतकऱ्यांनी अतिशय नियमितपणे, प्रामाणिकपणे कर्जाची परतफेड केली आहे, त्यांच्या बाबतीत काय करणार आहात ? असा माझा प्रश्न आहे आणि तो अनुत्तरीत असल्याचे दिसत आहे.यासाठी शासनाने निश्चितपणे विचार केला पाहिजे. 25 हजारापर्यंतच्या पीक कर्जासाठी चार टक्के व्याज दर आणि 25 हजार ते 3 लाखापर्यंतच्या पीक कर्जासाठी दोन टक्के व्याज दर अशी योजना सुचविण्यात आली असून त्यासाठी जवळपास 62.64 कोटी रुपयांची भरीव तरतूद केली आहे, त्याबद्दल मी निश्चितपणे आभार मानतो. तसेच सुक्ष्म सिंचनासाठी 1 लाख 30 हजार हेक्टर जमिनीचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्यासाठी 15.46 कोटी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यासाठी जास्त निधी द्यावा आणि सुक्ष्म सिंचनासाठी जास्त प्रयत्न करण्यात यावेत असे मला सांगावयाचे आहे. तसेच कृषी पंपानां वीज कनेक्शन देण्याची आवश्यकता असून यातील अनुशेष दूर करण्यासाठी 372 कोटी रुपये देण्यात आलेले आहेत. पण त्यासाठी शासनाने अधिक निधी देऊन कृषी क्षेत्रातील शेतकऱ्यांना जास्तीतजास्त वीज कनेक्शन देण्याच्या दृष्टीने जास्त भर द्यावा असे मला वाटते.

यानंतर श्री.बरवड . . . .



श्री. दिलीपराव सोनवणे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

फलोत्पादन तसेच सुधारित बी-बियाणे, व्याजात भव्य सूट, उत्पादित मालाला हमी भाव आणि शेती पूरक व्यवसायावर जास्तीतजास्त भर देणे व त्यासाठी जास्तीत जास्त तरतूदी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांची कोणत्याही प्रकारची सुधारणा होणार नाही असे मला वाटते.

सभापती महोदया, शिक्षणाच्या संदर्भात अर्थसंकल्पामध्ये फार कमी तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. कारण शिक्षणाची उपेक्षा संपविण्यासाठी जास्तीत जास्त प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी जास्तीत जास्त निधी अपेक्षित असताना त्यासाठी फारच कमी म्हणजे फक्त 722 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. यामध्ये निश्चितपणे आपल्या अपेक्षा पूर्ण होणार नाहीत. मी या निमित्ताने सूचवू इच्छितो की, यासाठी एकूण अर्थसंकल्पाच्या 8 ते 9 टक्के रक्कम उपलब्ध करुन द्यावी जेणेकरुन शिक्षणाच्या सर्व प्रकारच्या सोयीसुविधा आपल्याला तयार करता येतील. या ठिकाणी सर्वशिक्षा अभियानांतर्गत केंद्र सरकारचा वाटा उपलब्ध होतो परंतु त्याबरोबरच राज्य शासनाचा वाटा उपलब्ध झाला तर निश्चितपणे त्याचा फायदा सर्व विद्यार्थ्यांना होईल.

सभापती महोदया, व्ही.जे.एन.टी., ओ.बी.सी., विशेष मागास प्रवर्ग, आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी शिक्षण कर्जावर व्याजमुक्त योजना ही अत्यंत स्तुत्य आहे त्याबद्दल मी शासनाला धन्यवाद देतो. त्यासाठी बँकांकडून कर्ज मिळण्याच्या बाबतीत नियोजन करावे लागणार आहे. कारण ज्या पध्दतीने विद्यार्थ्यांना आणि पालकांना पैसे मिळविण्यासाठी त्रास होतो त्यासाठी आपल्याला अधिक लक्ष द्यावे लागेल. विद्यार्थीनींच्या शिक्षणाच्या संदर्भात इयत्ता आठवीच्या विद्यार्थीनींना, बी.पी.एल. कार्डधारक असलेल्या विद्यार्थीनींना मोफत सायकली पुरवण्यासाठी 20 कोटी रुपयापंची तरतूद केलेली असली तरी माझ्या मते याबाबतीत आणखी काही सुविधा विद्यार्थी आणि विद्यार्थीनींना देता येतील काय याबाबतीत विचार होणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, पायाभूत पदांचा प्रश्न आहे. त्यासाठी आर्थिक तरतूद, तुकड्या जाहीर होणे, तुकड्या जाहीर होऊनही अनुदान न मिळणे, तुकड्या कमीजास्त होणे, आदिवासी भागातील शाळांच्या थकीत वेतनाचा प्रश्न, असे प्रश्न आहेत. सन 2007-08 या वर्षातील 120 तुकड्यांची

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

मान्यता यासाठी आर्थिक तरतूद होणे गरजेचे होते. मात्र ती तरतूद झालेली दिसत नाही. ती तरतूद व्हावी. कायम विना अनुदानित तत्व तसेच विना अनुदानित तत्व कायमचे बंद करुन त्या ठिकाणी यासंदर्भात एक मास्टर प्लॅन तयार केला पाहिजे आणि त्यासाठी भरीव तरतूद केली पाहिजे. वेतन देखील नियमित झाले पाहिजे. केंद्राप्रमाणे जाहीर झालेला 6 टक्के महागाई भत्ता असेल, मेडिकल बिल असेल, शिक्षक पाल्य नि:शुल्क शिक्षणासाठी या ठिकाणी अतिशय तुटपुंजी तरतूद केलेली आहे. ही तरतूद जास्त प्रमाणात होण्याची आवश्यकता आहे. वेतनेतर अनुदानाचा प्रश्न आहे. 2003-04 पर्यंतचे वेतनेतर अनुदान दिले असले तरी त्याच्या पुढचे काय असा प्रश्न आहे. राहिलेल्या वर्षांच्या बाबतीत आणि यापुढे काय याबाबत अधिक प्रयत्न होणे गरजेचे आहे. वेतनेतर अनुदान आणि पगार नियमित होण्याच्या संदर्भात यात तरतूद करण्यात यावी. गुणवत्ता विकासाच्या वाढीसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे. त्यासाठी नवीन योजना तयार करावी. त्यासाठी शिक्षक संघटना, शिक्षक प्रतिनिधी, तज्ज्ञ शिक्षक यांच्या बैठका बोलवून त्यातून निर्णय घेणे आवश्यक आहे. हे सर्व करीत असताना या विभागातील महत्वाची त्रुटी आढळून येते ती म्हणजे अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता. एका एका अधिकाऱ्याकडे चार पाच चार्ज असल्यानंतर तो खऱ्या अर्थाने न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे अनेक प्रश्न निर्णयाविना लोंबकळत पडलेले असतात. कोणत्याही प्रकारची यंत्रणा त्या ठिकाणी दिसून येत नाही. म्हणून अधिकारी व कर्मचाऱ्यांची कमतरता भरुन काढण्याचे काम या निमित्ताने झाले पाहिजे. उच्च व तंत्र विभागाच्या संदर्भात सांगावयाचे तर तांत्रिक शिक्षणाचा अभाव, कुशल कामगारांचा तुटवडा मात्र सुशिक्षित बेरोजगारांची फौज अशा पध्दतीचे वातावरण आहे म्हणून यासाठी सुशिक्षित बेरोजगारांसाठी व्यवसाय व तंत्र शिक्षणाचे कोर्सेस वाढविण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी क्रीडा साहित्य अनुदानाच्या स्वरुपात प्रत्येक शाळेपर्यंत कसे जाईल यासाठी देखील योजना आखणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, सिंचनाच्या बाबतीत सांगावयाचे तर या ठिकाणी सिंचनावर भर देणे ही काळाची गरज आहे. 41 हजार कोटी रुपयांची गरज असताना केवळ 6 हजार कोटी रुपये म्हणजे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे .....

अत्यंत कमी निधी यासाठी दिलेला आहे. यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. खानदेशातील 7 उपसा सिंचन योजना यासाठी पैसा आणि पाणी याची तरतूद होणे आवश्यक आहे. मला सांगताना खेद होतो की, या 7 उपसा सिंचन योजना तापी पाटबंधारे महामंडळांतर्गत कार्यान्वित असताना आणि दोन्ही सभागृहांची मान्यता असताना त्या ठिकाणी एक चुकीचा निर्णय घेतला गेला. 12 जानेवारी, 2007 रोजी नवीन मास्टर प्लॅन तयार करुन केंद्रीय जल आयोगाकडे सादर करताना त्यामध्ये या 7 उपसा सिंचन योजना वगळण्यात आल्या. वास्तविक त्या ठिकाणी काम पूर्ण झाले आहे. 100 कोटी रुपये खर्च झाला आहे. फक्त पाणी अडविण्याचे काम बाकी आहे. अशा वेळी पाण्याची आणि पैशाची तरतूद मात्र केलेली नाही. उलट 23.67 अब्ज घनफूट पाणी भविष्यकालीन व प्रशासकीय मान्यताप्राप्त योजनांसाठी दाखविल्यामुळे या उपसा सिंचन योजनांवर परिणाम झालेला होऊन त्या योजना बंद पडलेल्या आहेत. त्या ठिकाणी पाणी अडविणे आवश्यक आहे. आपल्या डोळ्यादेखत पाणी वाहून जात आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ SBT/ MMP/ श्री.बरवडनंतर 11:00

श्री.दिलीपराव सोनावणे.....

महाराष्ट्राच्या हद्दीतून पावसाचे बरेच पाणी वाहून जाते. हे पाणी आपण अडवू शकत नाही. या योजना केल्या तर गुजरातकडे वाहून जाणारे हे पाणी अडविले जाईल. उपलब्ध असलेले पाणी अडविण्यासाठी पैसा उपलब्ध करुन दिल्यास पाणी अडवू शकू. ही एक नाविन्यपूर्ण योजना आहे. महाराष्ट्रात कोठेही नसावी. चार महिने ही योजना अपेक्षित आहे. जर पाणी अडविले तर त्या भागासाठी ते वापरता येईल. खानदेशची भूमी सपाट असल्यामुळे तापी नदीवर धरण बांधणे शक्य आहे. म्हणून अशाप्रकारच्या उपसा सिंचन योजना करणे आवश्यक आहे. ग्रामीण पाणीपुरवठा योजनेवर जास्त लक्ष देणे आवश्यक आहे.

सभापती महोदया, आरोग्य विभागासंबंधी मी सांगेन की, डॉक्टरांची रिक्त पदे भरली पाहिजेत. सध्या जे डॉक्टर्स आहेत त्यांनी मुख्यालयी राहिले पाहिजे. रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध करुन देण्यासाठी मोठया प्रमाणावर निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. बेरोजगार युवक व युवतींसाठी तांत्रिक शिक्षण उपलब्ध होण्यासाठी जास्तीत जास्त कोर्सेस दिले पाहिजेत. ग्रामीण स्वच्छता अभियान, बचत गट योजना, आदिवासी मुलामुलींची वसतिगृहे, ठक्कर बाप्पा आदिवासी सैनिकी शाळांमध्ये आदिवासी मुलांची शिक्षणाची सोय ,मोठया व मध्यम सिंचन प्रकल्पासाठी तरतूद अशाप्रकारच्या चांगल्या योजना या अर्थसंकल्पात घेतल्या आहेत. त्याबद्दल मी सरकारचे निश्चितपणे आभार मानतो. जाता जाता मला एक गोष्ट सुचवावयाची आहे की, शिक्षक आमदारांना स्थानिक विकास निधी पुरेशा प्रमाणात मिळाला पाहिजे. त्यामधून शिक्षणाच्या चांगल्या योजना करता येतील. आम्हाला जिल्हा नियोजन विकास समितीच्या बैठकीला बोलविले जात नाही असे दुर्दैवाने सांगावे लागते. त्या समितीच्या बैठकीला आम्हाला बोलवावे. शिक्षकांना स्थानिक विकास निधीसाठी 5 जिल्हयांचा मतदार संघ असतो. इतरांशी तुलना करुन मी असे म्हणेन की, एखाद्या तालुक्याचे प्रतिनिधीत्व करणा-या आमदारास जेवढा निधी मिळतो तेवढाच निधी 5 जिल्हयांतील 60 तालुक्यांचे प्रतिनिधीत्व करणा-या शिक्षक आमदारांना मिळतो. त्याचा विचार करुन आमच्या मतदार संघासाठी वाढीव तरतूद करावी अशी विनंती करतो. मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले मानून येथेच थांबतो, जय हिंद, जय महाराष्ट्र

-------

2....

28-03-2008 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) M-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/ SBT/ MMP/

श्री.मुझफ्फर हुसेन (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन 2008-09 च्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदया, यंदाचा अर्थसंकल्प सुरेख असून त्यामधून राज्यातील प्रत्येक कुटुंबाला काही ना काही तरी देण्याचा प्रयत्न शासनाने केला आहे. त्यामुळे शासन अभिनंदनास पात्र आहे. सातत्याने दोन वर्षे शिलकी अर्थसंकल्प सादर करण्याचा शासनाने प्रयत्न केलेला आहे. सभापती महोदया, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत अकराव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत राष्ट्रीय कृषी विकास योजना ठरविण्याचा निर्णय घेतला आहे. या अनुषंगाने राज्याने कृषी व कृषीशी निगडीत क्षेत्रासाठी 4.4 टक्के दराने विकासाचे उद्दिष्टय निश्चित केले आहे. ही गोष्ट चांगली आहे की, 4.4 टक्के दराने वार्षिक वाढ करण्याचे उद्दिष्टय निश्चित केलेले आहे. हा विकासाचा दर कशाप्रकारे गाठणार आहे, त्यासाठी सरकारने कोणत्या प्रकारची योजना किंवा कोणत्या प्रकारचा आराखडा निश्चित केला आहे त्याचा खुलासा होणे आवश्यक आहे. 4.4 टक्के दराने ऊस उत्पादनामध्ये वाढ होणार आहे की भात शेतीमध्ये वाढ होणार आहे की आणखी कोणत्या मार्गाने वाढ होणार आहे ते समजलेले नाही. त्याबाबतचा आराखडा कसा तयार होणार आहे आणि तो राज्यासमोर कधी येणार आहे ते सांगितले पाहिजे.

सभापती महोदया, राज्यातील कृषी विद्यापीठाद्वारे संशोधन व विकासाचे काम केले जाते. परंतु कृषी विद्यापीठांसाठी या अर्थसंकल्पात काहीच तरतूद केल्याचे दिसत नाही. राज्यातील कृषी विद्यापीठांचा राज्याच्या विकासात मोठा सहभाग असून या विद्यापीठांसाठी कोणत्या योजना हाती घेतल्या जाणार आहेत त्याचाही खुलासा करण्यात यावा. या कृषी विद्यापीठांसाठी भरीव तरतूद करावी अशी विनंती करतो. जोपर्यंत कृषी विद्यापीठांचा विकास करण्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करीत नाही तोपर्यंत निश्चित केलेला 4.4 टक्के विकासाचा दर गाठण्यामध्ये यश मिळेल असे मला वाटत नाही. राज्यातील कृषी विद्यापीठांसाठी केंद्र सरकारकडून 128 कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. परंतु राज्य सरकारने या कामासाठी मात्र काहीच तरतूद केलेली नाही हे मोठया खेदाने मला नमूद करावेसे वाटते. केंद्र सरकारने शेतक-यांचे 60 हजार कोटींचे कर्ज माफ केलेले आहे. त्याबद्दल केंद्र सरकार व राज्य सरकार अभिनंदनास पात्र आहे.

नंतर श्री.शिगम

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 11:05

(श्री. मुझफ्फर हुसेन...)

त्याचबरोबर अडीच हेक्टर पर्यन्त शेतक-याला या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे असे चित्र आज तरी आपल्याला पहायला मिळते. महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा या भागातील शेतक-याला या कर्जमाफीचा कमी फायदा होणार आहे अशा प्रकारचे चित्र राज्यासमोर आहे. म्हणून ही अडीच हेक्टरची मर्यादा वाढविण्यासाठी केन्द्र शासनाकडे पाठपुरावा करावा अशी माझी राज्य शासनाला विनंती आहे. यामुळे विदर्भ आणि मराठवाड्यातील कर्जबाजारी शेतक-याला कर्जमाफीचा लाभ मिळेल. राज्य शासनाने शेतक-यांच्या कर्जमाफीचा प्रस्ताव सादर केलेला आहे. परंतु शेतमजुरांच्या बाबतीत कोणतीही तरतूद किंवा विचार शासनाने केलेला दिसत नाही. तेव्हा शेतमजुरांच्या बाबतीत देखील शासनाने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदया, सागरी मत्स्यव्यवसाय बंदर व जेट्टी विकास या मूलभूत सुविधा मच्छिमार बंदरांवर पुरविण्यासाठी मागील वर्षी 92 कामे हाती घेण्यात आली होती. राज्याच्या सागरी किना-यावर 94 मासळी उतरविण्यांच्या केंद्रापैकी 51 ठिकाणी बंदरे व जेट्टी विकास कार्यक्रम हाती घेण्याचे ठरविले आहे. या कामामध्ये ठाणे जिल्ह्यातील बंदरे देखील समाविष्ट करावित अशी माझी शासनाला विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी कर्जमाफीच्या संदर्भात जो उल्लेख या ठिकाणी केला तो आमच्या आणि शेतक-यांच्यादृष्टीने स्वागतार्ह आहे. परंतु त्यांच्या पक्षाचे आदरणीय श्री. राहूल गांधी यांनी असे निवेदन केलेले आहे की, यापुढे कर्जमुक्ती देणे व्यवहार्य होणार नाही, शक्य होणार नाही. या निवेदनाची नोंद सन्माननीय सदस्यांनी घेतलेली दिसत नाही, एवढेच मला त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदया, मागील वर्षी भाईंदर येथील उत्तन, वसई, पालघर व डहाणू ही बंदरे विकास कार्यक्रमामध्ये घेतली होती. परंतु त्यांचा कोणत्याही प्रकारे विकास करण्यात आला नाही. तेव्हा या ठाणे जिल्ह्यातील बंदरांचा व जेट्टींचा विकास करण्याचे काम हाती घेऊन त्यासाठी भरीव तरतूद उपलब्ध करावी अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2..

(श्री. मुझफ्फर हुसेन....)

सभापती महोदया, राज्य शासनाने बृहन्मुंबईसाठी राज्य माहिती आयोग कार्यालयाची स्थापना केली आहे. मुंबईलाच लागून ठाणे हे देखील मोठे शहर उभे राहिलेले आहे. या ठाणे शहराची लोकसंख्या जवळपास एक ते सव्वा कोटी इतकी झालेली आहे. म्हणून ठाणे येथे देखील आणखी एक माहिती आयोग कार्यालय सुरु करावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदया, राज्य शासनाने दिनांक 23 जुलै 2007 रोजी गृहनिर्माण विषयक धोरण जाहीर केले. वाढते शहरीकरण विचारात घेता हे धोरण अतिशय महत्वाचे आहे. परंतु सदरहू धोरण अद्यापि राज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या डी.सी.रुल्समध्ये समाविष्ट करण्यात आलेले नाही. त्यामुळे या धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे झालेली नाही. राज्याच्या शहरातील घरांच्या किंमतीला जे उधाण आलेले आहे त्यावर कसलेही निर्बंध राहिलेले नाहीत. म्हणून राज्य शासनाने गृहनिर्माण विषयक धोरणाचा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या डी.सी.रुल्समध्ये लवकरात लवकर समावेश करावा अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदया, पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी शासनाने 179.20 कोटीची भरीव तरतूद केलेली आहे त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. तसेच पोलीस बलासाठी, कार्यालयीन व निवासी इमारतींचे बांधकाम करण्यासाठी 195 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. देशात आणि राज्यात वाढत असलेला नक्षलवाद आणि दहशतवाद त्याच बरोबर वाढत्या शहरीकरणामुळे पोलीस दलावर मोठी जबाबदारी पडत आहे. अशा परिस्थितीत पोलीस दल अधिकाधिक सक्षम आणि शक्तिशाली करण्याची गरज आहे. सभापती महोदया, महाराष्ट्र राज्यामध्ये झालेल्या नक्षलवादी कारवाया आणि त्यामध्ये बळी पडलेल्या आणि जखमी झालेल्यांची माहिती मी देऊ इच्छितो. सन 2003-04 मध्ये राज्यात 51 नक्षलवादी हल्ले झाले, त्यामध्ये 28 लोक मृत्यूमुखी पडले आणि 26 लोक जखमी झाले. 2003-04मध्ये 51 नक्षलवादी हल्ले झाले, त्यामध्ये 34 लोक मृत्यूमुखी पडले आणि 12 लोक जखमी झाले. 2004-05मध्ये 61 नक्षलवादी हल्ले झाले, त्यामध्ये 16 लोक मृत्यूमुखी पडले आणि 43 लोक जखमी झाले.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन...

2004-05 या वर्षी नक्षली हल्ले 61 झाले आहेत, त्यात 16 लोक मृत्यूमुखी पडले आणि 43 लोक जखमी झाले आहेत. 2005-06 या वर्षी 68 हल्ले झाले आहेत, त्यात 52 लोक मृत्यूमुखी पडले आणि 47 लोक जखमी झाले आहेत. 2006-07 या वर्षी 103 हल्ले झाले आहेत, त्यात 55 लोक मृत्यूमुखी पडले आहेत आणि 107 लोक जखमी झाले आहेत. या हल्ल्यांमध्ये नुसते नागरिकच नव्हे तर शासकीय अधिकारी देखील मृत्यूमुखी आणि जखमी पडलेले आहेत. नक्षलवादी हल्ल्यांना आळा घालण्यासाठी केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध होतो. परंतु त्या निधीचा योग्यपणे वापर होत नाही. या गोष्टींचा वारंवार केंद्र शासनाने उल्लेख केलेला आहे. याबाबतीत केंद्र शासनाने तसेच राज्य शासनाने नक्षलवादी हल्ले थांबविण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले पाहिजेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदया, पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी व पोलीस गृहनिर्माणासाठी दिलेला निधी अपुर्ण आहे. या निधीमध्ये मोठया प्रमाणात वाढ करण्याची गरज आहे.

सभापती महोदया, गावठाण फीडर सेप्रेशन संदर्भामध्ये योजनातंर्गत पहिल्या टप्प्यामध्ये 15 हजार पेक्षा जास्त गावांचा समावेश करण्यात येतील अशा प्रकारचे शासनाचे धोरण आहे. दुस-या टप्प्यात 12 हजार 600 गावांचा समावेश करण्यात येणार आहे असाही शासनाने निर्णय घेतलेला आहे. या दोन्ही निर्णयांचे मी स्वागत करतो. या योजनेतंर्गत गावांचा समावेश न करता लहान शहरांचा देखील समावेश करण्यात यावा अशी माझी सूचना आहे, त्या सूचनेची शासनाने गंभीर दखल घ्यावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदया,जलदगती न्यायालये व न्यायालये निर्माण करणे यासंबंधीचा अर्थसंकल्पात उल्ल्ेख करण्यात आला आहे. डिसेंबर, 2007 पर्यंत 3.93 लक्ष प्रकरणांपैकी 2.60 लक्ष प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. या कामात आणखी गती येण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठी नव्याने न्यायालये निर्माण करण्याची आवश्यकता आहे. विशेषत: ठाणे जिल्हयात ब-याचशा ठिकाणी नव्याने न्यायालय निर्माण करण्याचा प्रस्ताव दर वर्षी करण्यात येतो. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. मिरा-भाईंदर, पालघर, भिवंडी, वसई या ठिकाणी न्यायालये सुरु करण्यासंदर्भात तरतूद करण्यात आली होती. परंतु त्याची अंमलबजावणी आजपर्यंत झाली नाही. या वर्षी त्या ठिकाणी न्यायालये निर्माण करण्यासाठी तरतूद करण्यात यावी अशी माझी शासनास विनंती आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन....

सभापती महोदया, ग्राहक न्यायालयाच्या संदर्भात मी एक मुद्दा उपस्थित करु इच्छितो. मुंबईतच अतिरिक्त ग्राहक न्यायालय स्थापन करण्याचे शासनाने प्रस्तावित केले आहे. ठाणे जिल्हयात एकही अतिरिक्त ग्राहक न्यायालय स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले नाही. ठाणे येथे देखील अतिरिक्त ग्राहक न्यायालये स्थापन करण्यासंबंधी शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदया, सांस्कृतिक कार्य विभागाच्या योजनांतर्गत ऊर्दू साहित्य ॲकॅडमीच्या बोर्डातील सभासदांच्या नेमणूका उशिरा का होईना शासनाने केलेल्या आहेत. ऊर्दू साहित्य ॲकॅडमीला कोणत्याही प्रकारची तरतूद शासनाने केलेली दिसून येत नाही. ऊर्दू भाषेसाठी या बोर्डाची रचना करण्यात आलेली आहे. ऊर्दू भवन निर्माण करण्यासाठी शासनाने माहीम येथे जागा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु या जागेवर मोठया प्रमाणात स्लम आहे. परंतु त्या जागेवरील स्लम काढण्यासंदर्भात शासनाकडून कोणत्याही प्रकारचा प्रयत्न केला गेलेला नाही. भाषा ही देशाची संस्कृती आहे. 19 पेक्षा अधिकृत भाषा या देशात बोलल्या जातात. ऊर्दू भाषेला देखील शासनाने तेवढेच महत्व दिलेले आहे. कालिना येथील विद्यापीठाच्या परिसरात ऊर्दू भवन निर्माण करण्यासाठी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारची माझी विनंती आहे. त्याच बरोबर मुंबई, नागपूर, नांदेड, औरंगाबाद आणिपुणे येथे ऊर्दू भवनासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी माझी शासनास विनंती आहे.

सभापती महोदया, मुंबई आणि ठाणे एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून 2.25 कोटी रुपयांचा आराखडा तयार केलेला आहे. या तरतुदीतून स्कॉय बस, मेट्रो ट्रेन, ट्रान्सपोर्टेशन, इंटरल ट्रान्सपोर्टेशन अशी विविध योजना हाती घेतलेल्या आहेत. 2001ची जणनगना बघितली तर मुंबई आणि उपनगरे या परिसरात मायग्रेटींग पॉप्युलेशन 90 टक्के एवढे आहे. ठाणे येथील वसई, विरार पट्टा आहे त्या ठिकाणी एक नव्याने एअर पोर्ट तयार करण्याची गरज आहे. माझ्या या मागणीचा देखील शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदया, राज्य शासनाने अल्पसंख्याकांचा विकास करण्यासाठी अल्पसंख्यांक विभागाची निर्मिती केली त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री. कानडे....





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसेन ...

सभापती महोदया, केंद्र आणि राज्य शासनाने सच्चर समितीच्या अहवालाची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सुरु केलेला आहे. यामुळे अल्पसंख्यांकाचे प्रश्न सुटण्यासाठी निश्चितच मदत होणार आहे. यासाठी शासनाने 100 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये केलेली आहे. परंतु हे 100 कोटी रुपये अल्पसंख्याकांच्या विकासासाठी कशा प्रकारे वाटण्यात येणार आहेत याचा एक सविस्तर आराखडा तयार करण्याची गरज आहे, जेणेकरुन हा पैसा लॅप्स् होणार नाही. अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद केली पण प्रत्यक्षात 50 कोटी रुपयेच खर्च झाले असे होऊ नये यासाठी निश्चित आराखडा तयार करणे आवश्यक आहे. अल्पसंख्याकांना उद्योग, शिक्षण, रोजगार यासाठी 100 कोटी रुपये कसे खर्च केले जाणार आहेत याचा आराखडा शासनाने तयार करावा आणि जनतेचा विकास करावा अशी विनंती करतो आणि मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

--

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चरणसिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदया, राज्याचा सन 2008-09 चा अर्थसंकल्प सर्वसामान्य जनतेचा विचार करुन मांडल्याबद्दल या राज्याचे मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख आणि वित्तमंत्री श्री. जयंत पाटील यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. सभापती महोदया, मुंबईच्या विकासाबाबत मी काही सूचना करु इच्छितो.मुंबईच्या उपनगरामध्ये सध्या असलेल्या एक चटईक्षेत्र निर्देशांकाची मर्यादा मुंबई शहराप्रमाणे 1.33 इतकी करण्यात येणार आहे. त्यामुळे मुंबई उपनगरातील जनतेच्या वतीने या शासन निर्णयाचे मी स्वागत करतो. वाढती लोकसंख्या, जागेची भासणारी कमतरता आणि विकासाचा वाढता वेग पाहता निर्देशांकात केलेली वाढ योग्य आहे असे मला वाटते. निर्देशांकात वाढ केल्याने मुंबई उपनगरात सदनिकांची संख्या वाढणार आहे. यातून काही अडचणीही निर्माण होणार आहेत. कारण जवळजवळ 50 हजार गृहनिर्माण संस्था अशा आहेत की, ज्यामध्ये विकासकाने इमारती बांधल्या आहेत, सोसायटया देखील झालेल्या आहेत परंतु त्यांना कन्व्हेयन्स मिळालेला नाही. त्यामुळे वाढलेला निर्देशांक कोणी वापरावा म्हणजे बिल्डरने वापरावा किंवा गृहनिर्माण संस्थेने वापरावा यामध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. जवळजवळ 10 हजार जुन्या इमारती उपनगरामध्ये रि-डेव्हलप केल्या जाणार आहेत. त्यामध्ये बिल्डर आणि गृहनिर्माण संस्था यामध्ये कन्व्हेनियन्स करण्यासाठी बोलणी सुरु आहेत परंतु त्यातून वाद निर्माण होऊन प्रकरणे न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. यासाठी शासनाने यासंबंधात योग्य ती उपाययोजना करावी अशी मी शासनाला विनंती करतो. 0.33 निर्देशांकासाठी शीघ्रगणकानुसार चालू बाजार भावाप्रमाणे अधिमूल्याची रक्कम म्हणजेच प्रिमीयमची रक्कम भरावी लागणार आहे यासाठी कोणता आधार आहे ? ही रक्कम जागेच्या किंमतीवर भरावी लागणार आहे की टीडीआरच्या किंमतीवर भरावी लागणार आहे हे अजून स्पष्ट झालेले नाही. यासाठी एक रेग्युलेटरी ॲथॉरिटी निर्माण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे अल्प उत्पन्न गटातील आणि मध्यम उत्पन्न गटातील जनतेस व सर्वसामान्यांना मुंबईच्या उपनगरामध्ये घर घेणे सोईचे होईल.

सभापती महोदया, केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी 1200 कोटी रुपयांचा जलस्वराज्य प्रकल्प मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे या निर्णयाचे मी स्वागत करतो. या प्रकल्पाची सुरुवात कधी होणार आहे आणि प्रकल्प निश्चित कालावधीत पूर्ण होण्यासाठी शासनाने यावर नियंत्रण ठेवावी अशी विनंती आहे. पुढील 18 महिन्यात नवीन 156 लोकल गाडया

......2





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वेमार्गावर धावणार आहेत. या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी कशा प्रकारचे नियोजन करण्यात आलेले आहे हे स्पष्ट केलेले नाही. रेल्वे लाईनचे काम करताना बाधित नागरिकांचे पुनर्वसन करुन सरकारने त्यांना संरक्षण द्यावे व त्यासाठी शासनाने उपाययोजना करावी अशी मी विनंती करतो.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MMP/ KGS/ 11:20

श्री.चरणसिंग सप्रा...........

सभापती महोदया, देहू, आळंदी, अष्टविनायक मंदिराच्या ठिकाणी भाविकांना अधिकाधिक सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने शासन प्रयत्न करणार असून त्यासाठी 10 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे, याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. राज्यातील 15 महानगरपालिकांच्या क्षेत्रातील जकात कर रद्द करण्यात आला आहे. माझी माननीय वित्तमंत्र्यांना विनंती आहे की, पुढच्या अर्थसंकल्पात राज्यातील उर्वरित महानगरपालिकांच्या क्षेत्रातील जकात कर रद्द करण्यात यावा. पीक कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ झाले, 65 वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांना एस.टी.च्या निमआराम बसमध्ये 50 टक्के सवलत जाहीर करण्यात आली, दारिद्र्य रेषेखालील आठवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत सायकलींचे वाटप करण्यात येणार आहे, एस.टी.चे वातानुकूलित प्रवास भाडे स्वस्त करण्यात आले, म्हाडा वसाहतींसाठी जादा चटई क्षेत्र निर्देशांक जाहीर करण्यात आला, जून्या इमारतींच्या हस्तांतरणासाठी मुद्रांक शुल्क अभय योजना घोषित करण्यात आली, या सर्व निर्णयाचे मी स्वागत करतो. गहू, तांदूळ, चहा, नारळ इत्यादीवरील कर सवलत 2010 पर्यंत लागू होणार आहे, शासकीय रुग्णालयातील सुधारणांसाठी निधीची तरतूद, अल्पसंख्याक समाजासाठी विशेष 100 कोटी रुपयांची तरतूद, मुंबईतील ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी 400 कोटी रुपयांची तरतूद, वांद्रे स्टेशन, जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड व विरार स्टेशन परिसर येथील उन्नत पादचारी मार्ग बांधण्याचा प्रस्ताव असून 4500 कोटी रुपयांच्या एमयुआयपी टप्पा-2 प्रकल्पास मान्यता दिल्यामुळे हा अर्थसंकल्प सर्वसामान्य लोकांचा अर्थसंकल्प आहे असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही.

सभापती महोदया, राज्यामध्ये पुणे येथे तिसऱ्या राष्ट्रकूल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करुन आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भातील सोयीसुविधा, निर्मिती व विस्तारीकरण करण्यासाठी 100 कोटी रुपयांची तरतूद केल्यामुळे मी शासनाचे आभार मानतो. महाराष्ट्रात अशा प्रकारच्या क्रीडा स्पर्धांच्या आयोजनासाठी पुढील अर्थसंकल्पात देखील भरीव तरतूद करण्यात यावी अशी मी विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चरणसिंग सप्रा......

सभापती महोदया, इंदिरा आवास योजना, संजय गांधी निराधार योजना, जीवनदायी आरोग्य योजना यासाठी देखील तरतूद करण्यात आली आहे, निधी वाढविण्यात आला आहे. मी माननीय अर्थमंत्र्यांना विनंती करतो की, पुढील अर्थसंकल्पात हा निधी वाढविण्यात यावा. कारण गोरगरीब लोकांचा याचा फायदा होऊ शकतो.

सभापती महोदया, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिष्यवृत्ती देण्याचे अर्थसंकल्पात प्रस्तावित केले आहे. परंतु या शिष्यवृत्तीच्या रक्कमेत वाढ करण्यात यावी. त्यामुळे गोरगरीब तरुणांना शिक्षणात आणखी यश मिळू शकेल. या वर्षीचा अर्थसंकल्प हा सर्वसामान्य लोकांचा अर्थसंकल्प सादर केला आहे असे सांगून मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो आणि माननीय वित्तमंत्र्यांचे पुन्हा एकदा अभिनंदन करुन माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांचे मनापासून स्वागत करण्यासाठी मी उभा आहे. महाराष्ट्रामध्ये रहात असताना परप्रांतीयांनी आपला धर्म सांभाळून याठिकाणच्या मातीशी कसे इमान राखावे हे सभागृहाला कळले.

श्री.चरणसिंग सप्रा : माझी जन्मभूमी महाराष्ट्र आहे आणि कर्मभूमी देखील महाराष्ट्र आहे.

श्री.जयंत पाटील : प्रांतीय अटॅचमेंटची जाणीव महाराष्ट्रात करुन देणे हे महाराष्ट्राच्या आणि देशाच्या एकात्मतेसाठी पोषक आहे.

**तालिका सभापती** (श्रीमती उषा दराडे) : मदर टेरेसा यांनी सांगितले होते की, मी जन्माने भारतीय नाही. मी माझ्या स्वत:च्या मनाने, कर्तबगारीने कामाचे क्षेत्र म्हणून भारताची निवड केली आहे याचा मला अभिमान वाटतो. मला आठवण झाली म्हणून सांगते. माननीय वित्तमंत्र्यांनी आपले उत्तराचे भाषण सुरु करावे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील (वित्त मंत्री) : महोदया, राज्याच्या अर्थसंकल्पाविषयी या सभागृहात अतिशय चांगली चर्चा झाली आणि या चर्चेमध्ये जवळजवळ सर्वच सन्माननीय सदस्यांनी सहभाग घेतला आहे. नव्यानेच सभागृहात आलेले सन्माननीय सदस्य श्री. चरणजितसिंग सप्रा आणि माननीय श्री. सुभाष चव्हाण यांनी निवडून आल्यानंतर पहिले भाषण अर्थसंकल्पावर केले. त्या सर्वच सन्माननीय सदस्यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. सन्माननीय सदभ्यांनी आपल्या भाषणात जे मार्गदर्शन व मौलिक सूचना केल्या त्याचा तपशील मला माननीय वित्त राज्यंत्र्यांकडून मिळाला. सभागृहात केलेल्या भाषणांमध्ये ज्या ज्या विधायक सूचना असतील त्यांचा अंतर्भाव भविष्यकाळात व्हावा अशी अपेक्षा जवळजवळ सर्वच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. परंतु सभागृहात ज्यांनी भाषण केले त्यांच्या सर्वच मुद्यांचा परामर्श घेण्याचा मी प्रयत्न करीन कदाचित काही मुद्दे राहिले तर त्यासाठी थोडासा जास्त वेळ लागण्याची शक्यता आहे, तो मला मिळाला तर सविस्तरपणे उत्तर देणे शक्य होईल.

महोदया, या महाराष्ट्राच्या विकास वाढीचा वेग गेल्या पाच वहा वर्षात सतत वाढता ठेवण्यात शासनाला आणि राज्याला यश मिळाले आहे. सन 1996-97 मध्ये हा विकास दर 5.8 टक्के, सन 1997-98 मध्ये 5.2 टक्के, सन 1999-2000 मध्ये 3.4 टक्के, सन 2000-01 मध्ये 4.3 टक्के आणि सन 2002-03 मध्ये हा दर 6.8 टक्के, सन 2003-04 मध्ये 7.5 टक्के, सन 2004-05 मध्ये 8.2 टक्के, सन 2005-06 मध्ये 9.3 टक्के, सन 2006-07 मध्ये 9.7 टक्के आणि सन 2007-08 मध्ये हा दर 9 टक्के अशा प्रकारे आपल्या राज्याची वार्षिक दरवाढ, जीएसडीपीमधील वाढ आपण ठेवली आहे. ही वाढ आकडेवारीप्रमाणे राखून इेवण्यात आपल्याला बऱ्यापैकी यश मिळाले आहे. जी इकॉनॉमी वाढती असते आणि वाढीचा वेग चांगला असतो त्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फायदा राज्याला होणे स्वाभाविक आहे. राज्यशासनाने घेतलेल्या सर्व योजना आणि धोरणे अनुरुप असल्यामुळेच ही वाढ झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. परवा जी चर्चा या सभागृहात झ ाली त्यात सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनीही काही मुद्दे काढले. मधल्या काळात म्हणजेच सन 2002 ते सन 2004 मध्ये कर्जाचा बोजा हा राज्याच्या सकल उत्पन्नापेक्षा वाढलेला आहे. आर्थिकदृष्ट्या काही कठोर निर्णय आणि योजनाबध्द पध्दतीने पावले टाकल्यामुळे गेल्या तीन वर्षांची आकडेवारी पाहिली तर 28 टक्क्यावरुन 26 टक्के, 25



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील......

टक्के आणि आता 24 टक्क्यावर आपण आलो आहोत. म्हणजेच एकत्रित घेतलेले सर्व कर्ज ते जीएसडीपीच्या किती टक्क्यापर्यंत आहे असे म्हटले तर आता आपण 24 टक्क्यापर्यंत खाली आलो आहोत. मधल्या काळात ही टक्केवारी 28 टक्क्यापर्यंत वाढली होती. परंतु आर्थिकदृष्ट्या जे नियोजन चालू आहे त्यात आपल्याला यश मिळायला लागले आहे. म्हणूनच मी वारंवार सांगू इच्छितो की, आपले राज्य हे आर्थिकदृष्ट्या स्टेबल राज्य झालेले आहे. आणि देशातील सर्व पुढारलेल्या राज्यांच्या तुलनेने आपले राज्य आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम आणि खंबीर झालेले आहे. त्यामुळे कोणतेही आव्हान स्वीकारण्याची ताकद या राज्याच्या अर्थव्यवस्थेत आहे.

महोदया, रिसिप्ट टॅक्स वाढत आहे त्याप्रमाणे दुसऱ्या बाजूला नॉन रिसीप्ट टॅक्सेस देखील वाढत आहेत. मोठया प्रमाणात कराचे संकलन अधिक चांगले व्हावे म्हणून वेळोवेळी सभागृहात देखील फार चांगले मुद्दे मांडले व त्यांची अंमलबजावणी आपण केली. तसेच बाहेर जे सुचले त्याचीही अंमलबजावणी केली. त्या अनुषंगाने काही पॅरॉमीटर्स बघितले तर महसुली उत्पन्नाच्या इंटरेस्टचे प्रमाण हे मधल्या काळात फार वाढलेले असून 28 टक्क्यापर्यंत हे प्रमाण आले होते ते आता 16 टक्क्यापर्यंत खाली आले आहे. कर्जाचे प्रमाण म्हणजे महसुली उत्पन्न आणि कर्ज याचे प्रमाण किती असावे हे पाहिले तर काही वेळा हे प्रमाण मधल्या काळात 284 टक्क्यावर गेले होते. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे काही नियोजनबध्द पध्दतीने पावले टाकल्यामुळे साधरणपणे महसुली उत्पन्नापेक्षा कर्जाचे प्रमाण जास्त नसावे. मग इकॉनॉमी कम्फर्टेबल असते त्यावेळी हे प्रमाण खाली यायला पाहिजे. त्यानुसार हे प्रमाण 198 टक्क्यावर खाली आले आहे. म्हणजेच 200 टक्क्यांनी खाली आले आहे. या सभागृहात कर्जाबाबत अनेक मुद्दे उपस्थित केले, त्यात सांगण्यात आले की, राज्यावरील कर्जाचे प्रमाण फार वाढलेले आहे, त्यामुळे अडचण निर्माण झाली आहे. इकॉनॉमीमध्ये सुध्दा हीच गोष्ट केलेली आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सभापती महोदय, अमेरिकेवर सुध्दा हजारो कोटी रुपयांचे कर्ज आहे जोपर्यंत रिपेमेंटचे स्ट्रक्चर मर्यादित आहे आणि विकासाला अधिक पैसा उपलब्ध होतो तोपर्यंत चिंताकरण्याचे कारण नाही. डेट सर्व्हीसींग मधील काळात 40 टक्क्यापर्यंत गेली होती. म्हणजे मुद्दलाची परतफेड आणि व्याजाची परतफेड एकत्रिपणे परतफेड करावी लागते. याचे उदाहरण द्यावयाचे झाले तर राज्याचे 100 रुपये महसुली उत्पन्न होते त्यापैकी परतफेडीसाठी 40 रुपये जात होते. आता याचे प्रमाण 21 टक्क्यापर्यंत खाली आणलेले आहे. हे राज्याचे आर्थिक नियोजनाचे सर्वात मोठे यश आहे असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. त्यामुळे आता आपण विकासामध्ये जास्त पैसे खर्च करीत आहोत. यामुळेच आपल्या राज्याची योजना सतत वाढती राहिली आहे हे आपल्याला मान्य करावे लागेल. मला आठवते की, 1999-2000 सालामध्ये आपल्या योजना 6-7-8 हजार कोटीवर रेंगाळत असत परंतु गेल्या तीन वर्षापासून 15-20-25 हजार कोटी रुपयावर आपल्या योजना गेलेल्या आहेत. मला पूर्ण विश्वास आहे की, पुढच्या वर्षी 30-32 हजार कोटी रुपयांवर आमच्या योजना नेल्याशिवाय आम्ही राहणार नाही. हे सांगण्याचा मतीतार्थ असा आहे की, आपण मोठया प्रमाणात राज्याचे उत्पन्न आणि मघाशी सांगितल्या प्रमाणे राज्याच्या सर्व पॅरामिटरमध्ये सुधारणा केल्या. मी खालच्या सभागृहात आणि या सभागृहातील सदस्यांची भाषणे ऐकलेली आहेत. सदस्यांचे म्हणणे आहे की, आता महसुली अधिक्य आहे, पैसे कमी नाही त्यामुळे अमक्या अमक्या गोष्टी करा. परंतु पैसे कमी आहेत की, जास्त आहेत यापेक्षा महसुली अधिक्याचा अर्थ असा आहे की, महसुली अधिक्य हे महसुली जमा, रेव्हेन्यू रिसीट जे होतात त्यातून महसूली खर्च गेल्यावर जी शिल्लक रक्कम राहते ती महसुली अधिक्याची रक्कम राहते. आपण जो भांडवली खर्च करतो तो महसुली अधिक्य अधिक काही प्रमाणात कर्ज आणि भांडवली जमा. भांडवली जमा म्हणजे आपण काही लोकांना कर्ज दिलेले असते जसे आपण एमएसईबीला कर्ज दिले होते व त्यांच्याकडून आलेले व्याज या सगळयांची बेरीज करुन आपण भांडवली खर्च करीत असतो. महसुली अधिक्यच नसेल तर कर्ज आणि भांडवली जमा याची बेरीज करुन आपल्याला भांडवली खर्च करावा लागतो. आपण गेल्या तीन वर्षापासून सतत महसुली रक्कम जमा करीत आहोत याचा अर्थ कर्ज कमी काढतो आणि महसुली अधिक्य जेवढे वाढेल तेवढे योजनेसाठी कर्ज काढण्याचे प्रमाण मर्यादित होते. त्यामुळे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण म्हणता की, महसुली अधिक्याचा अर्थसंकल्प मांडला व आपण खर्च करीत नाही अशी वस्तुस्थिती नाही. परंतु महसुली अधिक्य निर्माण झाल्यामुळे भांडवली खर्चासाठी जे कर्ज काढतो ते कमी काढावे लागते व महसुली अधिक्यामुळे राज्यावरील कर्ज वाढीचे जे प्रमाण आहे त्यावर मर्यादा येते. पर्यायाने पुढील कालावधीत आणि या वर्षीदेखील त्याचा परिणाम जाणवतो आहे. आपल्या योजना आता सहजगत्या वाढू शकतात. मी बाहेर सुध्दा अनेकांची भाषणे ऐकलेली आहेत. त्यांनी सांगितले आहे की, आता राज्याचा रेव्हेन्यू सरप्स असल्यामुळे पैसे शिल्लक आहेत त्यामुळे ही कामे करा, ती कामे करा परंतु असे करुन चालणार नाही. महसुली अधिक्य लक्षात घेऊन आपण ज्या योजना तयार करतो त्या योजनेत कर्ज, त्या योजनेत महसुली अधिक्याची रक्कम जमा आहे. खरी आयडीअल सिच्यूएशन काय आहे ? आपण कर्जच काढता कामा नये. महसुली अधिक्य एवढे असले पाहिजे की, तेवढयातूनच तुमच्या योजनेचा भांडवली खर्च झाला पाहिजे. कॅपिटल रिसीट आणि महसुली अधिक्य याच्यातूनच आपल्या योजना करणे हे आयडीअल लक्षण असते. परंतु राज्याच्या वेगवेगळया गरजा, राज्याचे वेगवेगळे प्रश्न सोडवत असतांना काही प्रमाणात कर्ज काढणे आवश्यक असते त्यामुळे कर्ज काढावयाचे नाही अशी आमची भुमिका नाही परंतु कर्ज काढत असतांना राज्याची क्रेडीट रेटींग इम्प्रुव्ह झाली तरच आपल्याला कमी दराने कर्ज मिळते हा भाग देखील आपण लक्षात घेतला पाहिजे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 11.35

श्री.जयंत पाटील...

सभापती महोदया, मला सभागृहाला अत्यंत नम्रपणे सांगावयाचे आहे की, एक काळ असा होता की,काही महामंडळाचे कर्ज रोखे डी जंक बॉन्ड म्हणून डेसिग्नेट झालेले होते ते खरेदी करु नका असे सांगितले जात असल्याचा काळ मागच्या दहा वर्षाच्या कालखंडामध्ये आम्ही पाहिला होता परंतु यामध्ये बरीच सुधारणा करुन आता हे रेटीग "डी" वरुन "बी "वर गेले होते आणि "बी" वरुन "बीबीबी" वर गेलेले आहे. त्यानंतर आता जो अर्थसंकल्प सभागृह मंजूर करील त्या अर्थसंकल्पातील आकडेवारी पहिल्यानंतर माझी अशी खात्री आहे की " ए" कॅटेगरीमध्ये जाण्यास आपल्याला फारशी काही अडचण येणार नाही. येत्या दोन चार महिन्यात महाराष्ट्र राज्य हे सर्वोत्तम अशा क्रेडिट रेटीगच्या नामावलीमध्ये जाईल याबद्दल माझ्या मनात कोणतीही शंका नाही एवढया चांगल्या पध्दतीने महाराष्ट्राच्या आर्थिक नियोजनाचे काम राज्य सरकारने करण्याचा प्रयत्न केला आहे. अनेकदा असे विचारण्यात येते की ,राज्य शासन प्लॅन ठरवते परंतु त्या पैकी नेमका खर्च किती केला जातो ? मागच्या तीन वर्षात नेहमी 100 टक्याच्यावर खर्च करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे 2004-2005 मध्ये 102 टक्के, 2005-2006 मध्ये 133 टक्के आणि 2006-2007 मध्ये 106 टक्के अशा प्रकारे खर्च करण्यात आलेले आहेत. म्हणजे प्लॅनचा जो काही खर्च आपण धरेलला आहे त्यापेक्षा अधिक खर्च त्या त्या वर्षाच्या अखेरीस केलेला आहे. वर्तमानपत्रामध्ये अशा बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत की ,काही मंत्रिमहोदयांच्या विभागाचा खर्च कमी झालेला आहे. त्याबाबतीत मला हे सांगावयाचे आहे की, डिसेंबर 2006 मध्ये आपला खर्च 34.69 टक्के एवढा होता.डिसेंबर 2007 मध्ये 34 टक्या ऐवजी 39.54 टक्के झाला आहे. म्हणजे यामध्ये पुष्कळ सुधारणा झालेली आहे हे यावरुन दिसून येते. वर्तमानपत्रात अशा बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत की, अमुक विभागाने किंवा अमुक मंत्र्यांनी हा खर्च केलेला नाही . आपण दोन वर्षापूर्वी मासिक वितरण प्रणाली सुरु केलेली आहे. त्याचा असा फायदा झाला आहे की, आपल्या कामाचा वेग कमी आहे की जास्त आहे हे दर महिन्याला विभागाच्या लक्षात येते. . त्यामुळे या मध्ये बरीच सुधारणा होत आहे त्याचप्रमाणे प्रत्येक वर्षाच्या अखेरीला त्या त्या विभागाला दिलेले सर्व पैसे खर्च होत आहेत. गेल्या तीनही वर्षामध्ये 100 टक्क्यापेक्षंा अधिक खर्च प्लॅनवर करण्यात आला आहे हा त्याचा एक पुरावा आहे. विभागाला जो निधी दिलेला आहे तो जर समप्रमाणात वाटला गेला आणि दर महिन्याला तो खर्च करण्यात आला तर यामध्ये सुधारणा होईल. 31 मार्चला पैसे खर्च

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

करण्याच्या बाबतीत घाई होत असते तसे होऊ नये म्हणून मासिक वितरण प्रणाली आणली असून या प्रणालीमुळे यामध्ये हळूहळू यश यावयास लागले आहे हे मला या ठिकाणी नम्रपणे सांगायाचे आहे.

सभापती महोदया, महाराष्ट्राच्या नियोजनाच्या दृष्टीने येथे बसून निर्णय घेतो त्यापेक्षा जिल्हयामध्ये बसून लहान लहान कामाच्या संदर्भात अधिक चांगले निर्णय झाले पाहिजेत ही आपली भूमिका आहे. आपल्याला विकेन्द्रीत व्यवस्था पाहिजे असे फक्त भाषणात सांगून चालणार नाही तर प्रत्यक्षात तशी व्यवस्था सुरु केली पाहिजे. जिल्हयाच्या वाटयाला देण्यात आलेले पैसे लहान लहान कामासाठी खर्च करण्यासाठी अधिक प्रभावीपणे नियंत्रण आणण्यासाठी राज्य सरकारने एक हजार कोटी रुपयाची जिल्हा योजना या वर्षी दोन हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवली आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्हयामध्ये जाण्याचा मी प्रयत्न केला आहे.या वर्षी प्रथमच ही रक्कम वाढवून देण्यात आलेली असल्यामुळे जी वाढीव रक्कम त्या जिल्हयाच्या वाटयाला आलेली आहे ती वाढीव रक्कम चांगल्या कामावर अधिक खर्च केली पाहिजे असा त्यामागचा उद्देश आहे. मला अशी खात्री आहे की महाराष्ट्रामध्ये जिल्हा योजनेसाठी दोन हजार कोटी रुपये वाढवून दिलेले आहेत त्यामुळे सर्व जिल्हयातील लहान लहान कामाच्या योजनांना मोठी ्गती प्राप्त होईल. प्राथमिक आरोग्य केन्द्रे, उपकेन्द्रे, पाझर तलाव तसेच अंगणवाडीच्या इमारतीची कामे त्या योजनेमध्ये समाविष्ट केलेली आहेत.त्या संदर्भात शासनाचा असा प्रयत्न आहे की लहान लहान कामाच्या बाबतीत दुर्लक्ष होता कामा नये. त्यामुळे काही जिल्हयाच्या रकमेमध्ये जवळपास दुप्पटीपेक्षा अधिक वाढ झालेली असल्यामुळे सर्वसामान्य लोकांची जी मागणी आहे ती मागणी पूर्ण करण्यासाठी किंवा त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपल्याला चांगली संधी मिळालेली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदया, आर्थिक पाहणीच्या पुस्तकामध्ये असा उल्लेख करण्यात आला आहे की,मागच्या वर्षी सर्व 33 जिल्हा परिषदाना आणि ग्रामपंचायतींना 35 हजार कोटी रुपयांचा निधी दिला होता त्यापैकी 28 हजार रुपये खर्च करण्यात आले आणि 7 हजार कोटी रुपये खर्चच झालेला नाही . त्यांना आपण अधिक पैसे देत आहात ही चांगली गोष्ट आहे परंतु त्यांची पैसे खर्च करण्याची क्षमता किती आहे हे दिसून आलेले आहे त्याबाबतीत मी माझ्या भाषणात मुद्दा मांडला होता की, 33 जिल्हा परिषदा आणि 3500 ग्रामपंचायतीचा रेव्हेन्यू 35

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 11.35

श्री दिवाकर रावते ...

हजार कोटी असून त्यापैकी 28 हजार कोटी रुपये खर्च केलेले आहेत 7 हजार कोटी रुपये खर्च झालेले नाहीत. जिल्हा पातळीवरील लहान गावामधील कामावर हे पैसे खर्च होऊ शकलेले नाहीत आणि आपण त्यांना अधिकचे पैसे देत आहात तेव्हा याबाबतीत खुलासा करण्यात यावा.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.अरविंद सावंत )**

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, वेगवेगळ्या जिल्ह्यात काही प्रमाणात ही परिस्थिती आहे की, त्यांच्याकडे गेलेला निधी वेळेत खर्च होण्यासाठी जी प्रोसिजरल हर्डल्स आहेत, उदा. टेंडर अमुक इतक्या काळात काढावे वगैरे., यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता असेल तर ती करण्यात सरकारला आनंदच होईल. पण जिल्हा नियोजनाचा जो पैसा आहे हा करेक्टली खर्च व्हावा, कारण माझादेखील हा अनुभव आहे. मी अकोल्याला गेलो होतो. तेथे मला दिसून आले की, जिल्ह्याला दिलेले 34-35 कोटीच्या योजनेतील 17-18 कोटीचेच बजेट झाले. त्यानंतर अजूनही दोन तीन जिल्ह्यात गेल्यानंतर तेथेही हेच होत असल्याचे लक्षात आल्यावर आता या वर्षी आपण मुलभूत बदल केलेला आहे की, जिल्हा नियोजनामध्ये चर्चा होईल त्याप्रमाणे 100 टक्के बजेट करायचे, बजेट करण्यासाठी त्या जिल्ह्याला दुसऱ्या कोणाकडे जाण्याची गरज नाही. तर त्या जिल्ह्याच्या नियोजन मंडळामध्ये झालेल्या चर्चेनुसार आपण या वेळेस डायरेक्ट या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे आणि तो खर्च करण्यास जिल्हाधिकाऱ्यांवर पूर्ण जबाबदारी टाकून परवानगी दिलेली आहे. त्यामुळे माझी खात्री आहे की, जिल्ह्याच्या योजनांना अतिशय चांगली गती मिळेल. एक काळ असा होता, 1996-97 च्या आपल्या काळामध्ये, 1995-96 ची 900 कोटीची योजना 1996-97 मध्ये 1300 कोटीवर गेली आणि 1997-98 मध्ये पुन्हा ती 800 कोटीवर आली. म्हणून माझा भविष्यात असा प्रयत्न राहील की, जिल्ह्याची योजना 2 हजार कोटीवर गेली आहे ती परत 1700 कोटीवर येईल वा आली आहे, असे कधी होणार नाही. ती 2000 कोटीची योजना भविष्यात देखील, मी स्वत: अनुभव घेतलेला आहे की, अनेक जिल्ह्यात लहान लहान कामे आहेत ती लोक केवळ बघत बसतात, पण ती पूर्ण होत नाहीत. अशा योजनांना स्थानिकदृष्ट्या जर जास्त पैसे गेले तर अधिक चांगल्या पद्धतीने राज्याच्या सामान्य माणसाच्या शासकीय सेवा देण्याच्या ज्या व्यवस्था आहेत त्या उभ्या राहतील आणि तोच आपला भविष्यातदेखील प्रयत्न राहील. तेव्हा जिल्हा योजना या महाराष्ट्राच्या योजनेतील सगळ्यात मोठे वैशिष्ट्य म्हणून राहतील आणि त्यांना अधिक बळकटी देण्याचा प्रयत्न यातून होत आहे.

सभापती महोदय, या वर्षापासून प्रत्येक जिल्ह्याची स्वतंत्र पुस्तिका देखील आपण प्रकाशित करीत आहोत. गेल्या काही वर्षामध्ये, विशेषत: गेल्या दोन वर्षामध्ये राज्याला ओव्हरड्राफ्ट घेण्याची गरज भासली नाही. पण मला हे सांगितले पाहिजे की, या सगळ्या विकासाच्या कामामध्ये आपले

..... यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

सोशल सेक्टरमध्ये स्पेंडींग काय आहे ? मला आपणास सांगण्यास अभिमान वाटतो की, महाराष्ट्र हे देशामध्ये सोशल सेक्टरमध्ये स्पेंडींग करणारे आघाडीचे राज्य आहे. या संदर्भात आपण गुजरातचे उदाहरण घेतले तर श्री.नरेंद्र मोदींच्या गुजरातमध्ये सोशल सेक्टरचे स्पेंडींग हे केवळ 13 हजार कोटीचे आहे. जेथे गरज आहे अशा बिहारमध्येही हे सोशल सेक्टरचे स्पेंडींग 13 हजार कोटीचे आहे. कर्नाटकामध्ये 19 हजार कोटी, केरळमध्ये 10 हजार कोटी, मध्य प्रदेशमध्ये 13 हजार कोटी, राजस्थानमध्ये 13 हजार कोटी आणि तामिळनाडूसारख्या राज्यातही हे स्पेंडींग 23 हजार कोटीचे आहे. परंतु महाराष्ट्राचे सोशल सेक्टरचे स्पेंडींग हे 31,307 कोटी पर्यंत नेण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. तेव्हा विकासामध्ये कोणताही घटक मागे राहू नये अशी भूमिका या राज्याने, या सरकारने घेतलेली आहे हे आपण लक्षात घ्यावे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल साहेबांना मी सांगेन की, सच्चर समितीचा जो अहवाल आला आहे त्यानुसार एक वेगळे खाते निर्माण करणारे हे महाराष्ट्र राज्य आहे. केवळ मुस्लिम समाजच नाही तर एकूणच अल्पसंख्यांक समाज आहे त्याच्या हिताचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी आपण स्वतंत्र खाते आपल्या राज्यात निर्माण केलेले आहे आणि ते खाते माननीय मुख्यमंत्र्यांकडे आहे म्हणजे त्या खात्याला आपण किती प्रॉयॉरिटी दिलेली आहे हे आपण लक्षात घ्यावे. तेवढ्यापर्यंत आपण थांबलो नाही तर त्या पलिकडे आपण ....सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना मी सांगू इच्छितो की, आपण जरा शांत रहावे, आपण माझे भाषण पूर्ण ऐकून घ्यावे ...

( अडथळा )

श्री. मधुकर चव्हाण : आमचा त्यालाच तर विरोध आहे, त्यांनी मागितले म्हणून आपण अल्पसंख्यांकासाठी स्वतंत्र खाते केले उद्या ते वेगळा मतदारसंघ मागतील, पाकिस्तान मागतील....

( अडथळा )

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, आपण साऱ्यांनी शांत बसावे, खाली बसावे. ... मंत्री महोदयांना भाषण करू द्यावे. ...

( यानंतर श्री. सरफरे ....व्ही 1 ...

(गोंधळ)

श्री. मधुकर चव्हाण : होय,आमचा सच्चर आयोगाला विरोध आहे...

**तालिका सभापती (श्री. अरविंद सावंत)** : मी उभा असल्यामुळे माननीय सदस्यांनी खाली बसावे. माननीय अर्थमंत्र्यांना मी विचारु इच्छितो की, सभागृहामध्ये वेळेचे बंधन असल्यामुळे 11.45 वाजेपर्यंत आपले भाषण पूर्ण होईल असे वाटत नाही. तेव्हा आपणास किती वेळ अधिक लागणार आहे ते सांगावे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माझ्या भाषणामध्ये जेवढे अडथळे येतील तेवढा जास्त वेळ मला लागेल. तरीसुध्दा आपण मला 12.00 वाजेपर्यंत वेळ ध्यावा अशी माझी विनंती आहे.

**तालिका सभापती** : आपण 11.55 वाजेपर्यंत भाषण करावे, त्यानंतर ऑन लेग भाषण ठेवावे.

श्री. जयंत पाटील : ठीक आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी अनेक राज्यांची याठिकाणी आकडेवारी सांगितली आहे. परंतु तुलनात्मक त्या राज्याची असलेली लोकसंख्या सांगितली नाही. आपल्या राज्याची लोकसंख्या आणि त्या राज्यांची असलेली लोकसंख्या यामधील फरक स्पष्ट केला पाहिजे.

श्री. जयंत पाटील : ती माहिती मी आपणास देईन.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या भाषणामध्ये सामाजिक न्यायाबाबत उल्लेख झाला...

श्री. जयंत पाटील : माझे भाषण संपल्यानंतर आपण विचारले तर बरे होईल. आपल्या प्रत्येक प्रश्नाचे मी उत्तर देईन. हवे तर आपण प्रश्नोत्तराचा तास ठेवावा. मी सर्व प्रश्नांची उत्तरे देईन.

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांना मी सुचवू इच्छितो की, आपल्या मनामध्ये ज्या काही शंका असतील त्यासंबंधी मंत्रिमहोदयांचे भाषण संपल्यानंतर आपण त्यांना विचारु शकता. त्या शंकांचे निरसन केले जाईल. त्यामुळे आपण आता मध्येच हरकत घेऊ नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आपणास माहीत नाही की,माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेब सकाळी एकटेच भाषण करीत होते. तेव्हा त्यांनी आपल्या मनामध्ये असलेल्या सर्व भावना याठिकाणी मोकळया केल्या होत्या. आपण हवे तर रेकॉर्ड तपासून बघावे. आपल्या पक्षाच्या ध्येय धोरणामध्ये काय बदल करणे आवश्यक आहे याबाबत ते आपणास सांगतील.

श्री. मधुकर चव्हाण : माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे आमच्याकडे आहेत, तुमच्याकडे नाहीत.

श्री. जयंत पाटील : माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचा प्रभाव तुमच्या लोकांवर पडलेला नाही. त्यामुळे त्यांचा नंबर पुढे यायला त्यांचे पूर्ण आयुष्य जाईल. त्यांचा प्रभाव तुमच्यावर पडणे मुष्किल, अवघड आहे.

सभापती महोदय,मला याठिकाणी थोडक्यात सांगावयाचे आहे की, महाराष्ट्र हे देशातील सर्व समाजाच्या, जाती-धर्माच्या कुटुंबातील मागे राहिलेल्या, वंचित राहिलेल्या लोकांना न्याय देणारे देशातील पहिले राज्य असेल असे विश्वासाने मला वाटते. त्यामुळे माननीय सदस्यांनी सच्चर समितीच्या अहवालाबाबत उल्लेख केला आहे. अल्पसंख्यांक विभागाबाबत तपशीलवार चर्चा झाली आहे, त्याबाबत काही बैठका झाल्या आहेत. आणि याची सुरुवात म्हणून यावर्षी 100 कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. त्यांच्या योजना ज्यावेळी फलद्रुप होतील, निश्चितीला येतील. त्या पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्राच्या बळकट असलेल्या अर्थव्यवस्थेमधून अधिक पैसे उपलब्ध करुन दिले जातील.त्यामध्ये हे महाराष्ट्र राज्य कमी पडणार नाही. त्यांच्याकरिता ज्या काही योजना करावयाच्या आहेत त्या व्यवस्थित कागदावर आणू. सच्चर आयोगाच्या अहवालाच्या निमित्ताने मी या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील सर्व अल्पसंख्यांक समाजाला विश्वास देतो की, महाराष्ट्र त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्न करणारे राज्य आहे. त्याकरिता वाटेल तेवढा पैसा उपलब्ध करुन देवू. माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेब त्याकरिता गरज आहे ती या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याची. आपल्या सारख्या लोकांनी चुकीच्या जागी जाऊन बसल्यामुळे अडथळे निर्माण होतात. ते दूर करण्यासाठी आपण आपल्या विचारामध्ये पुन्हा एकदा बदल केला तर हे महाराष्ट्र राज्य आपले स्वागत करील असे मला वाटते. त्यांचे शेती विषयीचे विचार ऐकून मी भावनाविवश झालो. इतके चांगले विचार त्यांनी मांडले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (खाली बसून) : मग तुम्ही त्यांचे विचार स्विकारावेत.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आमचे देखील अनेक वर्षापासून तेच विचार आहेत आणि ते स्विकारलेलेच आहेत. सन्माननीय सदस्य नव्याने काही सांगत नाहीत. महाराष्ट्रातील आणि देशातील शेतकऱ्यांना योग्य ते स्थान मिळाले पाहिजे, भूमीपुत्राला न्याय मिळाला पाहिजे या सर्व भूमिका आम्ही यापूर्वीच घेतलेल्या आहेत.

श्री.मधुकर चव्हाण (खाली बसून) : पण तुम्ही लोक मरेपर्यंत थांबला होतात.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, आता ते तुमच्याकडे गेल्यामुळे सन्माननीय सदस्यांना ठासून-ठासून सांगावे लागत आहे, कारण त्यांच्यावर लोक विश्वास ठेवत नाहीत की, ते त्यांच्या मताशी पक्के आहेत. पण महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्टया हे प्रगतीशील राज्य असले पाहिजे ही आपली भूमिका आहे. महाराष्ट्र राज्य हे गुंतवणूकीसाठी सुध्दा प्राईम डेस्टीनेशन असले पाहिजे असा प्रयत्न राज्य शासनाने नेहमी केलेला आहे. मी इतर कोणाशीही फारशी तुलना करणार नाही. पण अलिकडे मी पेपरमध्ये बातम्या वाचल्या आहेत आणि विधानसभेमध्ये, विधान परिषदेमध्ये देखील सन्माननीय सदस्यांनी काही मुद्दे मांडले आहेत. मी सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये जे नंबर ऑफ प्रोजेक्टस् आले आहेत, त्याबाबतीत सांगावयाचे तर मागच्या वर्षभरातील ही संख्या 522 होती आणि गुजरातमध्ये 343 होती. महाराष्ट्रामध्ये फॉरेन डायरेक्ट इन्व्हेसमेंट झालेली आहे. त्या बाबतीत 10 वर्षापूर्वीचे सांगत नाही पण . . . .

**(सभापतीस्थानी - माननीय सभापती)**

**सभापती** : याठिकाणी अर्थसंकल्पावरील चर्चा झाली आणि आता माननीय वित्तमंत्र्यांचे उत्तराचे भाषण सुरु आहे.मी माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होईपर्यंत सभागृहाची वेळ वाढवून देण्याचे ठरविलेले आहे. त्यानुसार मी 12 वाजून 25 मिनिटांपर्यंत सभागृहाची वेळ वाढवित आहे. या वेळेमध्ये माननीय वित्तमंत्र्यांचे उत्तराचे भाषण आणि काही प्रश्नोत्तरे असतील तर ती होतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक 12 वाजून 45 मिनिटांनी सुरु होईल. आता माननीय वित्त मंत्री यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये थेट विदेशी गुंतवणूकीची इरादा पत्रे 57 आलेली आहेत आणि गुजरातमध्ये ही संख्या फक्त 7 आहे. मी एवढया माहितीवरच थांबत नाही तर पुढे असेही सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये आपल्याला मागच्या वर्षभरामध्ये रोजगार

. . . .डब्ल्यु-2



APR/ KGS/ MMP/ 11:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्माण करण्याच्या बाबतीत किती यश मिळाले ? तर महाराष्ट्रामध्ये 2 लाख 42 हजार लोकांना रोजगार मिळाला आणि गुजरातसारख्या राज्यामध्ये ही आकडेवारी 80 ते 90 हजाराच्या आसपास आहे. मला हेच सांगावयाचे की, आजही उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्र राज्याचे अव्वल स्थान आहे. पण हे करीत असताना महाराष्ट्रात अधिक गुंतवणूक यावी. यासाठी महाराष्ट्रातील अधिक गुंतवणुकीचे जे वातावरण आहे ते टिकविण्यासाठी आणि या राज्याचा पहिला क्रमांक टिकविण्यासाठी जे प्रयत्न करावयाचे आहेत, ते सतत सुरु आहेत. काल भारत फोर्ज बरोबर एक एम.ओ.यु.झाला. त्या माध्यमातून काही शेकडो कोटी रुपयांची गुंतवणूक झाली. परवा देखील माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनामध्ये फियाट आणि टाटा यांच्या बरोबर 4400 कोटी रुपयांचा एम.ओ.यु.झाला. महाराष्ट्रामध्ये अधिकाधिक गुंतवणूक येण्यासाठी उद्योजकांना आकर्षित करण्यामध्ये राज्याला काही अडचण येण्याचे कारण नाही. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी या राज्यातील उद्योग वाढला पाहिजे ही भूमिकाच फलदायी ठरेल असा मला विश्वास आहे. म्हणून महाराष्ट्रात होणारी जी गुंतवणूक आहे, त्याबाबतीत काही वेळेला वेगवेगळे आकडे सांगितले जातात. पण गुंतवणूक करण्यासाठी जी कमिटमेंट आहे, त्याचे रिअल इन्व्हेसमेंटमध्ये कन्व्हर्शन किती होते, हा आकडा देखील महत्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये इरादा पत्राव्दारे जे गुंतवणूक करीत आहेत, त्यामध्ये आज 52 टक्के कन्व्हर्शन रिअल प्रोजेक्टमध्ये होते. जे राज्य आपल्या जवळपास आलेले आहे, अशी ज्यांच्या बाबत चर्चा आहे त्या राज्यामध्ये हा आकडा 40 टक्के आहे. त्यामुळे आपल्या राज्यामध्ये सर्व दिशेने विकासाच्या दृष्टीने प्रयत्न करताना आपल्यासमोर सर्वात मोठी अडचण आहे की, आज विजेची कमतरता आहे आणि हे मला मान्य आहे. महाराष्ट्रामध्ये जेवढी वीज जास्त, तेवढा विकासाचा वेग अधिक वाढणार आहे. विजेच्या वाढीच्या बाबतीत मागे काय झाले ? हे सर्व सभागृहाला माहिती आहे. त्यामुळे त्या खोलामध्ये जाणार नाही. पण महाराष्ट्रामध्ये अधिकाधिक गुंतवणूक होण्यासाठी पुढच्या दोन,अडीच, तीन वर्षाच्या कालखंडामध्ये 6000 मे.वॅ.चे प्रोजेक्ट येऊ घातले आहेत. आमचे माननीय ऊर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे पाटील यांनी गेल्या 3-4 वर्षामध्ये सतत कष्ट करुन प्रयत्न केले आहेत. जेव्हा वाईट काळ असतो, तेव्हा सगळेच टीका करीत असतात. पण त्याकडे थोडेसे दुर्लक्ष करुन, या प्रश्नाला न्याय देण्यासाठी या राज्याच्या ऊर्जा विभागाने जी मेहनत घेतलेली आहे, त्याची फळे हळूहळू समोर येतील आणि पुढच्या दोन-अडीच वर्षाच्या कालखंडामध्ये महाराष्ट्रातील विजेच्या ....

. . . .डब्ल्यु-3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्मितीची क्षमता जवळपास साडेपाच-सहा हजार कोटीपर्यंत वाढेल, तेव्हा या राज्यात मोठया प्रमाणात सरप्लस विजेच्या एरियामध्ये जाऊ. मला आठवते, एक काळ असा होता की, महाराष्ट्राच्या अर्थ विभागासमोर काही प्रश्न असावयाचे, आपण ते प्रश्न गेल्या पाच-सहा वर्षामध्ये योजनाबध्द रितीने दूर केले आणि आपले राज्य हे सरप्लस स्टेट झाले. ज्यावेळी माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवारसाहेब या राज्याचे मुख्यमंत्री होते त्यावेळी किंवा त्याच्या अगोदरही आपण शेजारील राज्यांना वीज विकत होतो. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाणसाहेब, मधल्या काळामध्ये काय झाले ? हे मी सांगणार नाही. पण या मधल्या काळामध्ये जे झाले, त्याचा परिणाम आपण किती काळ भोगत आहोत.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

श्री. जयंत पाटील ....

काही चुकीचे निर्णय अतिशय महत्वाच्या क्षेत्रात झाले. काही क्षेत्रे सेन्सेटिव असतात. ग्रोथला टारगेट करुन आपण काम करीत असतो. मधला कालखंड असा होता की, 1981 ते 1990 या कालावधीत जवळपास 3812 मेगावॅटची आपण ॲडीशन केली. त्यानंतर 1991 ते 1995 या पाच वर्षाच्या काळात 1240 मेगावॅटची ॲडीशन झाली. पण मधल्या काळात म्हणजे 1995 ते 1999 या दरम्यान 500 मेगावॅट पेक्षा जास्त वीज ग्रीडमध्ये आणू शकलो नाही. त्यानंतरच्या काळात आर्थिक अडचणीत असणाऱ्या राज्यात काही प्रश्नांबाबत आणि त्या एकूण क्षेत्रावरच अंधुकपणा आलेला होता. काही बाबतीत सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर बरीच चर्चा झाली. त्याचा परिणम निर्णयावर झाल्यामुळे थोडेसे क्षेत्र मागेपुडे झाले आहे. पण त्यानंतर आपण 920 मेगावॅटची ॲडीशन केली. ही ॲडिशन देखील वाढत्या लोकसंख्येला,वाढत्या इंडस्ट्रीला आणि वाढत्या गरजांना कमी पडत आहे म्हणून राज्य सरकारची ही प्रायोरिटी आहे की, विजेमध्ये अधिकाधिक गुंतवणूक आणावयाची, स्वतः जास्तीत जास्त गुंतवणूक करावयाची, वितरणाचे नेटवर्क मजबूत करावयाचे त्याचबरोबर ज्या गांवाना फिडर सेपरेशनची योजना लागू केली त्या ठिकाणचा जो अनुभव आहे तोच अनुभव या महाराष्ट्रातील 16 हजार पेक्षा उरलेली जी गावे आहेत त्यांच्यासाठी एक्स्टेंड व्हावा म्हणून फिडर सेपरेशनचा कार्यक्रम अधिक गतीने करण्याचा कार्यक्रम राज्यात ऊर्जा विभागाने घेतलेला आहे. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, महाराष्ट्रामध्ये विजेच्या क्षेत्रात जी काही कमतरता मधल्या काळात निर्माण झाली ती दूर करण्यासाठी महाराष्ट्रात जी गुंतवणूक करीत आहोत, या वर्षी 1300 कोटी रुपयांची गुंतवणूक ऊर्जा क्षेत्रात करीत आहोत आणि मला खात्री आहे की, राज्य सरकारची ही गुंतवणूक आणि खाजगी क्षेत्राची गुंतवणूक मिळून होणारी गुंतवणूक महाराष्ट्रातील विजेचे सकट दूर करणारी ठरेल. त्यादृष्टीने नियोजनबध्द पध्दतीने राज्य सरकारने काही पावले टाकलेली आहेत.

सभापती महोदय, मुंबईच्या बाबतीत सभागृहात उल्लेख करण्यात आला. जो मुंबई मेट्रोपोलिटन रिजन आहे त्यामध्ये केवळ मुंबईच्याच दृष्टीने विचार करीत नाही. पुढच्या पाच वर्षामध्ये आमच्या राज्याचा ग्रोथ रेट काय राहणार आहे याविषयी विचार करत असताना

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ SBT/ KTG/ KGS

श्री. जयंत पाटील .....

महाराष्ट्राच्या प्रगतीचा, विकासवाढीचा वेग हा चांगला व्हावयाचा असेल तर महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात देखील हा वेग वाढला पाहिजे. मुंबई मेट्रोपोलिटंट रिजनचा जो परिसर आहे त्यामध्ये आपण असे गृहीत धरतो की, या ठिकाणी साधारणपण 14 टक्के ग्रोथ रेट राहील. ठाणे असेल, वसई असेल, पलीकडच्या बाजूला कल्याण-डोंबिवली असेल, इकडच्या बाजूला अंबरनाथ असेल, खालच्या बाजूला अलीबाग पर्यंतचा मुंबई मेट्रोपोलिटनचा जो सगळा परिसर आहे त्या सगळ्या रिजनची ग्रोथ अतिशय योजनाबद्द पध्दतीने करण्याचा राज्य सरकारचा निर्धार आहे. मुंबई शहरामध्ये जसे आपण एमएमआरडीएच्या माध्यमातून प्रकल्प घेतो तशाच पध्दतीने आता मुबईच्या बाहेर देखील 550 कोटी रुपयांचे प्रकल्प घेऊन त्या नगरीमधील सुधारणा करण्याचा धोरणात्मक निर्णय एमएमआरडीएच्या स्तरावर राज्य सरकारने घेतलेला आहे. मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, मुंबईमध्ये रेल्वेने प्रवास करणाऱ्याच्या समोर ज्या समस्या आहेत त्यांचे प्रतिबिंब नेहमी सभागृहात उमटते. एमयूटीपीचा 4500 कोटी रुपयांचा जो प्लॅन होता त्याला गती देण्याचा प्रयत्न राज्य सरकारने केला. त्याला आवश्यक तेवढे पैसे दिले. एमयूटीपी टू ची देखील उद्‌घोषणा केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे आणि एमयूटीपी टू चा देखील मोठ्या प्रमाणात कार्यक्रम मुंबईमध्ये चालू होईल. एमयूटीपी टू मध्ये रोज रेल्वेने लाखो प्रवासी प्रवास करताना रेल्वेच्या प्रवासामुळे घाम गाळतात तो त्यांचा प्रवास सुखदायक करण्याची व्यवस्था आपण करीत आहोत. किती गाड्या सुरु करणार याचा उल्लेख माझ्या भाषणात आहे. केवळ गाड्या सुरु होणार नाहीत तर अधिक दर्जेदार गाड्या सुरु करण्याचा कार्यक्रम आहे. मी आणि माननीय मुख्यमंत्री महोदय व्ही. टी. स्टेशनला त्यातील पहिली चांगली सुखदायक गाडी चालू करण्यासाठी गेलो होतो. पण महाराष्ट्राच्या मुंबई राजधानीतील रेल्वेच्या लाखो प्रवाशांना न्याय देण्यासाठी देखील एमयूटीपी टू आणि एमयूटीपी वन यातील काही भाग आपण खर्च करीत आहोत. हा खर्च करीत असताना आमच्या काही समस्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेब, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेब मला मदत करतील अशी आशा आहे. या एमयूटीपी वन चा कार्यक्रम करीत असताना आमच्या वेगवेगळ्या एजन्सीज काम करीत आहेत. परंतु मुंबई महानगरपालिकच्या बाबतीत सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण साहेब आपण एकत्रित जाऊन चर्चा करु.

यानतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ MMP/ KTG/ श्री.बरवडनंतर 12:00

श्री.जयंत पाटील.....

मुंबईसाठी घेण्यात आलेल्या एमयूटीपी (1) या प्रकल्पाच्या 417 कोटी रुपये किंमतीपैकी केवळ 32 कोटी रुपये इतकी कामाची प्रगती झाली आहे. यासंदर्भात आपण सर्वजण मुंबई महापालिकेत जाऊन महापौरांना भेटू. कारण मी मुंबई शहराचा पालकमंत्री असल्यामुळे मला देखील त्याचे शल्य आहे. मुंबई महानगरपालिकेने या कामाची गती वाढविली पाहिजे. मुंबई महानगरपालिकेचे काय प्रश्न आहेत ते जाणून घेऊ. कारण मुंबई शहरातील सर्वसामान्य लोकांना न्याय देण्यासाठीच एमयुटीपी (1) व एमयुटीपी (2) असे प्रकल्प हाती घेतले आहेत. या प्रकल्पांच्या कामांना योग्य ती गती मिळाली पाहिजे. मी मुंबईचा पालकमंत्री असल्यामुळे मुंबई महानगरपालिका विरोधी पक्षाच्या ताब्यात आहे असे मी म्हणणार नाही. परंतु या शहरातील सर्वसामान्य नागरिकांना न्याय देण्याची भूमिका सरकारची आहे. त्यासाठी सरकारने एमयुआयपी हा देखील प्रकल्प सुरु केलेला आहे. आपल्याला सांगितले पाहिजे की, जवळपास 155 कि.मी.ची रस्त्याची कामे हाती घेतली असून त्यापैकी 18 रस्त्याची कामे सुरु केली आहेत. त्यापैकी 6 रस्त्यांचे 140 कि.मी.चे काम पूर्ण झालेले आहे. या कामावर जवळपास 1000 कोटी रुपये खर्च केलेला आहे. यानंतर एमयुआयपी फेज-2 आता सुरु करीत आहोत. त्या अंतर्गत मीरा-भाईंदर, वसई आणि सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांच्या ठाणे शहरामध्ये (अडथळा) सन्माननीय उपसभापती श्री.वसंत डावखरे यांच्या ठाणे शहरामध्ये राहणारे सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड या दोघांच्या शहराला न्याय देण्यासाठी 60 कि.मी.रस्त्याची 20 कामे 2009 सालामध्ये हाती घेत आहोत. त्यासाठी साधारणपणे 675 कोटी रुपये खर्च येणार आहे. मुंबईतील लालबहादूर शास्त्री या रस्त्याची लांबी 18 कि.मी.आहे, स्वामी विवेकानंद रोडची लांबी 26 कि.मी.इतकी आहे. अशा अनेक रस्त्यांची माहिती देता येईल, पण वेळेअभावी मी ती देत नाही. यातील महत्वाचे वैशिष्ट असे आहे की, मुंबईत राहणा-यांच्या सेवेमध्ये वाढ करीत असताना मुंबईबाहेर राहणा-या लोकांसाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून सेवा देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी वांद्रे-वरळी या पुलाचे काम फार काळ लांबल्याचे म्हटले होते. या कामाला विलंब झाला आहे हे मला मान्य आहे. पण हे काम हाती घेतले त्यावेळी आंदोलने झाली,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ SBT/ MMP/ KTG/

श्री.जयंत पाटील....

पुलाचे डिझाईन बदलल्यामुळे त्याची लांबी वाढली. त्यांनी सुचविलेले डिझाईन सुंदर होते, वेगळे होते. या पुलाचे चांगले काम होणार आहे. डिसेंबर, 2009 पर्यंत या प्रकल्पाचे काम पूर्ण होईल असे त्यांनी म्हटले आहे. या कालावधीपूर्वी काम झाले तर मी राजीनामा देईन असे ते म्हणाले होते. पण हे काम डिसेंबर, 2008 पर्यंत पूर्ण होईल. त्यामुळे सभागृहाला एका चांगल्या विद्वानाला जगाच्या पाठीवरील संपूर्ण माहिती असणा-या सदस्याला मुकण्याची पाळी येईल. वरळी-वांद्रे या सी-लिंकचे काम अगोदर सांगितलेल्या कालावधीत पूर्ण होईल.

सभापती महोदय, सरकारने शेतक-यांच्या समस्यांसंबंधी काही मुलभूत निर्णय घेतले आहेत. या देशामध्ये गेली अनेक वर्षे शेतक-यांना कर्ज मुक्त करण्याची मागणी येत होती. केंद्र सरकारकडून 69 हजार कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर झाली त्याची सर्वांनी वाहव्वा केली आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील....)

शेवटी एवढा मोठा निर्णय झाल्यावर त्यावर दुस-या बाजूने देखील बोलण्याचा सर्वांना अधिकार आहे. परंतु केन्द्रातील देशाचे माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग, वित्त मंत्री श्री. पी. चिदंबरम् आणि कृषी मंत्री श्री. शरद पवारसाहेब यांनी जाणीवपूर्वक या देशातील शेतक-याच्या डोक्यावरचे कर्ज बाजूला केले पाहिजे, त्यांचा संसार पुन्हा एकदा सुरळीत चालला पाहिजे आणि देशाच्या विकास वाढीच्या वेगामध्ये शेतीचा हिस्सा 4 टक्क्यापर्यन्त वाढला पाहिजे ही भूमिका स्वीकारुन या देशामध्ये ज्या शेतक-याचे कर्ज थकलेले आहे त्याची थकबाकी दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या भूमिकेचे सभागृहाने तसेच मी देखील अर्थसंकल्पामध्ये स्वागत केलेले आहे.

स्वातंत्र्यानंतर या देशामध्ये अनेकांच्या सत्ता आल्या. पण या देशातील बळीराजाच्या डोक्यावरचे कर्ज बाजूला करण्याची दानत यापूर्वीच्या कोणत्याही सरकारमध्ये नव्हती. मी कोणाचे नाव घेत नाही. पण या देशातील शेतक-याच्या डोक्यावरचे थकलेले कर्ज बाजूला करण्याची योजना केली आणि त्याही पुढे जाऊन या देशामध्ये शेतक-यांना आणखी काही सुविधा देण्याचा प्रयत्न होतोय. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये शेती या विषयाला जाणीवपूर्वक चांगली तरतूद आपण करीत आहोत. कारण केन्द्र आणि राज्य शासनाच्या मिळून असणा-या ज्या योजना आहेत त्यामधून राज्याच्या प्रत्येक जिल्हास्तरावर आपण नियोजन करीत आहोत. या राज्यातील शेतीचा विकास वाढीचा वेग हा राज्याच्या विकास वाढीतील मोठा सहभाग असला पाहिजे. मधल्या काळात हा विकास वाढीचा वेग मायनस किंवा 1 - 2 टक्के झालेला होता. हा विकास वाढीचा वेग 4 टक्क्यांनी वाढला पाहिजे यासाठी राज्य शासनाने जाणीवपूर्वक प्रयत्न केलेला असून त्यादृष्टीने अर्थसंकल्पामध्ये तरतूद केलेली आहे. आम्ही एवढयावरच थांबलो नाही तर या राज्यामध्ये ज्यांचे कर्ज थकलेले आहे त्यांना दिलासा दिलेला आहे. पण जो नियमित कर्ज भरणारा आहे त्याच्यासाठी काय ? हा प्रश्न देखील पुढे येऊ शकतो. आपल्या राज्यामध्ये काही वर्षापासून आपण एक योजना करीत होतो. जिल्हास्तरावर त्यासाठी पैसे धरण्याचे आपण प्रयोजित करीत होतो आणि जिल्हास्तरावर पैसे धरले जात नव्हते. कोणतेही पैसे शेतक-याच्या नावाने बँकांना पोहोचत नव्हते. पूर्वीच्या पंजाबराव देशमुख योजनेंतर्गत नियमित कर्ज फेडणारे असे किती जिल्ह्यातील शेतकरी

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील...)

आहेत ? मागचे सर्व क्लिअर करण्यासाठी आपण अर्थसंकल्पामध्ये 204 कोटी रु.ची तरतूद करीत आहोत. चालू वर्षापासून राज्यस्तरावर दरवर्षी अशी तरतूद करीत आहेत.या राज्यातील जो शेतकरी 25 हजाराच्या आज जो कर्ज काढील त्यावरचे 7 टक्के व्याज केन्द्र सरकारने दिले. आपण त्याबाबतीत 6 टक्क्यावर आलो असून महाराष्ट्रातील शेतक-यासाठी दरवर्षी 130 कोटी रु.आपण खर्च करीत आहोत. म्हणून 6 टक्क्याने जो नियिमित कर्ज फेडेल आणि 25 हजाराच्या आतील कर्ज असेल तर त्याला 4 टक्के व्याजामध्ये सवलत दिलेली आहे म्हणजे तो 2 टक्क्यावर आला आणि 3 लाखाच्या आत जो कर्ज काढील त्याला 2 टक्के व्याजामध्ये सवलत दिलेली आहे, म्हणजे तो 4 टक्क्यावर आलेला आहे. अशी योजना राज्यस्तरावर आणून या राज्याच्या बजेटमध्ये तरतूद करुन महाराष्ट्रातील शेतक-याला मोठा दिलासा देण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. शेवटी एका शेतक-याचे कर्ज थकलेले आहे आणि दुसरा शेतकरी प्रामाणिकपणे वेगवेगळे कष्ट करुन, कर्ज फेडत आहे. जो नियमित कर्ज फेडीत आहे त्याच्यावर अन्याय होता कामा नये म्हणून त्याला आज व्याजामध्ये सवलत देण्याची भूमिका घेतलेली आहे.

सभापती महोदय, आपण राज्यामध्ये जलसिंचनासाठी 6 हजार कोटी रु. तरतूद करीत आहोत. या राज्याच्या इतिहासामध्ये जलसिंचनासाठी अशा प्रकारे 6 हजार कोटीची तरतूद कधीही करण्यात आली नाही. ही तरतूद करताना आपला दृष्टीकोन हा आहे की, महाराष्ट्राच्या कानाकोप-यात राहाणा-या शेतक-याच्या दारापर्यन्त पाणी पोहोचविण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. त्याला पाणी मिळणे हा पहिला प्रश्न आहे आणि त्याच्या पिकाला किंमत काय मिळणार हा नंतरचा प्रश्न आहे. ही जी 60 हजार कोटीची माफी दिलेली आहे त्यामधून या देशाच्या अर्थकारणाशी संबंधित असलेली माणसे अंतर्मुख झालेली आहेत. मला खात्री आहे की, या देशातील शेतक-याच्या घामाचा दाम त्याला मिळण्यासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये आमुलाग्र बदल, धोरणात्मक बदल केन्द्रस्तरावर होतील आणि त्यासाठी आपणा सर्वांचे नेते श्री. शरद पवारसाहेब हे प्रयत्नशील आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांचे श्री. शरद पवार यांच्यावर किती प्रेम आहे हे मला माहीत आहे. ते त्यांची भाषणे ऐकत असतात. श्री. शरद पवारसाहेबांनी आपल्या

..3..



MSS/ SBT/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 12:05

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत पाटील...)

भाषणामध्ये असे म्हटलेले आहे की, शेतीमालाला देशातून आवाक आणि जावक यासाठी मुक्त व्यवस्था झाली पाहिजे. ती झाली तर या माल कमी आहे म्हणून निर्यातीला बंदी किंवा माल जादा झाला म्हणून निर्यात करा अशा प्रकारची या देशातील शेतक-याला वेळोवेळी मदत करण्यापेक्षा तो कायम आपला माल घेऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उभा राहील अशा प्रकारची व्यवस्था करण्याची भूमिका केन्द्र सरकारच्या स्तरावर होईल, असे श्री. शरद पवारसाहेबांनी आपल्या भाषणात सांगितलेले आहे. मी सांगितलेले आहे की, केन्द्र सरकारने केल्यानंतर जे काही राहील त्यासाठी राज्य सरकार महाराष्ट्रातील शेतक-याला मदतीचा हात दिल्या शिवाय राहाणार नाही आणि त्या भूमिकेचा अर्थसंकल्पामध्ये उल्लेख केलेला आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, केंद्र सरकारने शेतक-यांवरील 60 हजार कोटी रुपयांचे कर्ज माफ केले त्यामुळे त्यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्र राज्य अग्रसर आहे असे आपण नेहमी बोलतो. परंतु महाराष्ट्रातील शेतक-यांच्या बाबतीत अतिशय गोलमाल उत्तरे अर्थसंकल्पीय उत्तराच्या भाषणात करीत आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी केंद्र शासनाचे अभिनंदन करीत आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी राज्य सरकार नेमके काय करणार आहे ?

श्री. जयंत पाटील : महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी काय केले पाहिजे त्याबाबतीत कृपया सन्माननीय सदस्यांनी मार्गदर्शन केले तर बरे होईल.

श्री. यशवंतराव गडाख : महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी काय केले पाहिजे यासंबंधी मी माननीय वित्तमंत्र्यांना पत्र दिलेले आहे. सगळयात जास्त शेतक-यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात झालेल्या आहेत. माननीय वित्त मंत्री गेल्या दहा वर्षापासून अर्थसंकल्प सभागृहात सादर करीत आहेत. त्यामुळे शेतक-यांसाठी काय करावे या विषयी त्यांना चांगली माहिती आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या असतील तर राज्य सरकारने देखील पुढे आले पाहिजे आणि भरीव अशा पध्दतीची मदत केली पाहिजे अशी माझी नाही तर महाराष्ट्रातील सगळया शेतक-यांची अपेक्षा आहे.

श्री. जयंत पाटील : मी या ठिकाणी अर्थसंकल्पीय भाषण केले आहे त्याचे सन्माननीय सदस्यांनी वाचन केले आहे किंवा नाही याची मला माहिती नाही. केंद्र सरकारची योजना पूर्ण डिफाईंड झाली पाहिजे. केंद्र सरकार कोणकोणालो बेनिफीट देणार हे राज्यातील जनतेला कळले पाहिजे. एकाच घरात बेनिफीट देताना घरातील सगळयांना सारखाच दिला पाहिजे. यासंदर्भात कधी गडबड करावयाची नसते. आपण केंद्र सरकारचे स्वागत करतो आहोत म्हणून आपल्या सरकारचे देखील स्वागत झाले पाहिजे असा अट्टाहास धरणे योग्य नाही. परंतु केंद्र सरकार काय करीत आहे हे राज्यातील जनतेला कळले पाहिजे. केंद्र सरकारचे लाभधारक कोण आहेत हे निश्चित झाल्यानंतर उरलेल्या शेतक-यांसाठी देखील राज्य शासनाला काही तरी करावे लागेल. एकाच ठिकाणी दोन लाभ पाठविणे योग्य नाही, एवढे तरी तारतम्य आपल्याला बाळगावे लागेल. एवढेच मी या निमित्ताने सांगतो.

श्री. यशवंतराव गडाख : महाराष्ट्रातील शेतक-यांची आपल्याकडून मोठी अपेक्षा आहे.

2...

श्री. जयंत पाटील : सन्माननीय सदस्य श्री. गडाख साहेबांनी याबाबतीत लेखी पत्र माझ्याकडे दिलेले आहे. त्यांनी त्यांचे विचार सांगावयास हवे होते अशी माझी अपेक्षा होती. आपण काही मुद्यांच्या बाबतीत उल्लेख केला असता तर त्यासंबंधी मला खुलासा करता आला असता. त्यांनी यासंदर्भात मला पत्र दिलेले आहे. सन्माननीय सदस्य ज्येष्ठ आहेत. ज्येष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन घेऊनच सरकारचे कामकाज चालत असते. तुम्ही व्यक्त केलेले विचार मोकळे जाणार नाहीत एवढाच विश्वास मी देऊ इच्छितो.

श्री. मधुकर चव्हाण (बसून) : माननीय मंत्री महोदय, चांगल्या प्रकारे चुना लावण्याचे काम करीत आहेत.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. मी जर चांगले बोललो तर चुना लावला असे बोलले जाते. वाईट बोललो तर काथा लावला असे सांगितले जाते. माझ्यावर अन्याय होता कामा नये. विधानसभा सभागृहातील सदस्यांच्या विचारांच्या बाबतीत मी समजू शकतो. परंतु या सभागृहातील प्रत्येक सभासदांचा विचार मी गांभीर्याने घेत असतो. त्या गोष्टीस जर सन्माननीय सदस्य चुना म्हणावयास लागलात तर तो माझ्यावर अन्याय होतो आहे. एखाद्या सदस्याच्या विचाराच्या बाबतीत सकारात्मक भूमिका घेतली तर त्यास चुना म्हणणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी "चूना" शब्दाचा वापर बसून केलेला असल्यामुळे तो शब्द मागे घ्यावे असे मी म्हणू शकत नाही.

सभापती महोदय, शेतक-यांनी पीक कर्ज घेतल्यानंतर त्यांना राष्ट्रीयकृत बँकेकडे मुद्रांक शुल्क भरावे लागते. जवळपास 80 कोटी रुपयांचे मुद्रांक शुल्क राष्ट्रीयकृत बँकाकडे भरावे लागत होते. मुद्रांक शुल्क रद्द करण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. मी नम्रपणे सांगू इच्छितो की, आपण या ठिकाणी शेतक-यांचा विकास करण्यासाठी या सभागृहात बसलेलो आहोत. महाराष्ट्रात शेतक-यांचा विकास करण्यासाठी जे काही करावे लागेल ते करण्यासाठी राज्य शासन मागे रहाणार नाही. वेळ कमी असल्यामुळे मी फक्त काही ठराविक मुद्यांच्या अनुषंगाने बोलणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे आणि सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी बीड शहरातून रेल्वेसाठी लोहमार्ग तयार करावा आणि तेथून रेल्वे वाहतूक सुरु करावी अशी त्यांनी या ठिकाणी मागणी केली आहे. केंद्र सरकारने मनमाड- इंदूर व्हाया मालेगाव-धुळे-शिरपूर यासाठी प्रस्ताव मागितला होता.

यानंतर श्री. कानडे...

केंद्र सरकारने 50 टक्के आणि राज्य सरकारने 50 टक्के रक्कम द्यावी अशी नवीन भूमिका यासंदर्भात घेतलेली आहे. त्यामुळे दोन रेल्वे मार्गाला मान्यता दिलेली आहे. बीडच्या रेल्वे मार्गाबाबत केंद्रीय रेल्वेमंत्री श्री. लालप्रसाद यादव यांनी सांगितलेले आहेच. कालच माननीय मुख्यमंत्री महोदयांबरोबर रेल्वेच्या जनरल मॅनेजरची चर्चा झालेली आहे. दोन रेल्वे मार्ग सुरु करण्यासाठी शासन मदत करीत आहे. केंद्र शासनाने बीडच्या रेल्वेचे काम सुरु करावे असे आम्ही त्यांना सांगितले. हे पैसे दोन रेल्वेमार्गाच्या अगेंन्स्ट बीडच्या मार्गासाठी वापरावेत याप्रस्तावाला मान्यता दिलेली आहे. त्यामुळे बीडच्या रेल्वे मार्गाचे काम सुरु होण्यास काही अडचण राहिली नाही.....

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, बीड-परळी-नगर रेल्वेमार्गाची गेल्या 25-30 वर्षापासूनची मागणी आहे. हा प्रश्न शासनाने मार्गी लावल्याबद्दल मी राज्य शासनाचे आभार मानते.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मला हे सांगितले पाहिजे की, आपल्या राज्यामध्ये एक महत्वाचा कार्यक्रम जो राबविला जात आहे तो म्हणजे घरकुले बांधण्याचा. राज्याच्या अर्थसंकल्पाचे हे एक वैशिष्टय आहे. राज्यामध्ये 10 लाख घरांचे बांधकाम पुढील दोन वर्षात पूर्ण करण्यासाठी शासनाने पावले उचलली आहेत. इंदिरा आवास योजनेतून अडीच लाख घरे आणि इतर ज्या योजना आहेत त्यामधून अशी एकूण 10लाख घरे बांधली जाणार आहेत. जो गरीब आहे आणि घराशिवाय आहे त्याला न्याय देण्याची भूमिका शासनाने घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांचे भाषण मी ऐकत होतो. त्यांनी सांगितले की म्हाडाचे चटईक्षेत्र वाढवून शासन मुंबई शहरावर नागरी सुविधांचा मोठा ताण निर्माण करीत आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, म्हाडाच्या घरांसाठी शासन 2.5 एफएसआय वापरण्यासाठी परवानगी देणार आहे. पूर्वी तो 1.33 च्या पलिकडे नव्हता. म्हाडासाठी जो एफएसआय वाढवून देणार आहेत त्यामधून अतिरिक्त घरे उपलब्ध होतील. युएलसी कायदा रद्द केला त्यावेळी शासनाची हीच भूमिका होती की अधिकाधिक जमीन उपलब्ध व्हावी. ही जमीन ज्याची आहे त्याची आहे असे न होता मोकळी जमीन विकसित करुन अधिक गुंतवणूक येऊन घरांची संख्या वाढेल. मागणी आणि पुरवठा यामध्ये घरांचा पुरवठा जास्त झाला तर या शहरातील सामान्य माणसाला आणि जे लोक झोपडपट्टीमध्ये राहतात ज्यांना घरे घेणे परवडत नाही त्यांच्यासाठी घरे उपलब्ध होतील आणि घरांच्या किंमती खाली आल्या की

......2

या शहरातील गोरगरिबांना घरे उपलब्ध होतील. शासन वेगवेगळया मार्गाने झोपडपट्टीत राहणारांचे पुनर्वसन करणार आहेच. त्याचप्रमाणे या शहरात नवीन घरे उपलब्ध करण्यासाठी जाणिवपूर्वक शासनाने अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली आहे. 0.33 एफएसआय वाढवून दिलेला आहे. 2 पर्यंत लिमिट बदलली नाही. बऱ्याच विकासकांनी टीडीआर घेऊन एफएसआय वापरला त्यातून राज्य सरकारला देखील उत्पन्न मिळणार आहे. म्हाडामध्ये सुधारणा करीत आहेत ज्यामुळे या शहरामध्ये अधिकाधिक घरे निर्माण झाली पाहिजेत. युएलसीमधून मोकळी झालेली जमीन वापरुन त्यावर इमारती उभ्या राहून अधिक घरांची व्यवस्था होऊ शकेल. या मुंबई शहराबाहेर जाण्याचा मार्ग देणाऱ्या अधिक सुधारणा करुन मुंबईवरील ताण कमी होईल. याठिकाणी मला नम्रपणे सांगितले पाहिजे की राज्यातील ग्रामपंचायतींमध्ये ग्रामसेवक आणि ग्रामविस्तार अधिकाऱ्यांची पदे निर्माण करण्यासाठी अलिकडेच श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी प ुढाकार घेऊन राज्यामध्ये 3 ते 5 हजार ग्रामसेवकांची पदे भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. ग्रामसेवकांअभावी विकास थांबणार नाही आणि मोकळया जागा भरल्यानंतर ग्रामीण भागाचा विकास होईल.

सभापती महोदय, यशवंत पंचायत राज अभियानातून जे पुरस्कार देण्यात येतात त्यामध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यशवंत पंचायत राज अभियान हे महत्वाचे अभियान आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना गुणवत्ता पुरस्कार देऊन प्रोत्साहन देण्यासाठी यशवंत पंचायती राज अभियान ही योजना दोन वर्षापासून सुरु केली आहे. या योजनेला बळकटी देण्यासाठी म्हणून रु.3.10 कोटी देण्याचा निर्णय घोषित करीत आहोत.

सभापती महोदय, स्वयंसहाय्यिता गटाचा महासंघ करणे ही कल्पना होती. दोन्ही सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्या यांनी माझी भेट घेतली आणि महिला बचत गटांना अधिक न्याय द्यावा अशी मागणी केली. लाखो महिला बचत गटासाठी आपला वेळ देत असतात. बचत गटामध्ये जाऊन वेगवेगळी कामे करतात, नवनवीन वस्तू तयार करतात. त्यांना योग्य प्रशिक्षण देण्यासाठी महाराष्ट्रात कोणतीही व्यवस्था नाही. म्हणून ग्रामविकास विभागाच्या वतीने स्वयंसहाय्यिता गटाचे फेडरेशन करण्याचा निर्णय केला आहे. त्यांना 5 कोटी रुपये संघ स्थापन करण्यासाठी देत आहोत. 5 कोटी रुपयात सगळे काम होईल असा माझा दावा नाही. आणखी निधी द्यावा लागेल. व्यवसायाभिमूख प्रशिक्षण देण्याची व्यवस्था या प्रशिक्षण केंद्रामार्फत देण्याचा निर्णय केला आहे. मला खात्री आहे, महाराष्ट्रातील लाखो भगिनींना याचा फायदा होईल. आज ज्या भगिनी उदबत्त्या तयार करतात त्यांना त्या क्षेत्रात अधिक प्रोफेशनल ट्रेनिंग देणे आवश्यक आहे. त्यांनी चांगला दर्जेदार माल तयार करावा यासाठी प्रोत्साहन दिले जाईल. दुसरे एक पाऊल उचलले आहे ते म्हणजे महिला बचत गटामार्फत ज्या वस्तू तयार केल्या जातात त्या शेजारच्या गावात जाऊन विकल्या जातात. बाजारपेठ मिळविण्याची व्यवस्था राज्य सरकारने केली पाहिजे यासाठी 75 लाख रुपयांची तरतूद केली आहे. 50 लाख रुपये उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. मुंबईमध्ये 'महालक्ष्मी सरस' या नावाने प्रदर्शन व मेळावा भरविला जातो. त्यासाठी 75 लाख रुपये खर्च करण्याचे आणि मुंबईमध्ये चांगली बाजारपेठ उपलब्ध करुन देऊन तेथे या भगिनींनी उत्पादित केलेल्या मालाची विक्री करण्यासाठी तरतूद करण्याचा राज्य सरकारने प्रयत्न केला आहे. मोठ्या प्रमाणात राज्य सरकार यात यशस्वी झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, संत गाडगे महाराज समाधी स्मारक ट्रस्ट अमरावती येथे आहे. संत गाडगे महाराजांचे स्मारक उभे करण्यासाठी तरतूद करण्याचा निर्णय घेतला आहे. तुळजाभवानीचे दर्शन घेण्यास आपण श्रध्देने जात असतो. त्या तुळजापूरचा समग्र विकास करण्यासाठी 200

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील.....

कोटी रुपये इतका खर्च येणार आहे. त्यातील कोअर सेक्टर म्हणून 100 कोटीचा प्लॅन करण्यात येईल. तुळजापूरची भवानी माता हे महाराष्ट्राचे दैवत आहे. त्या परिसराचा विकास करण्यासाठी योजनेची सुरुवात करीत आहोत. त्यासाठी 200 कोटी रुपयांची योजना आहे.

सभापती महोदय, छत्रपती राजाराम महाराज हे शिवाजी महाराजांचे सुपुत्र होते. त्यांनी रायगडावरील राजधानी सातारा येथे आणली. जानेवारी 1708 मध्ये पहिले छत्रपती शाहू महाराज यांचा किल्ले अजिंक्यतारा येथे दिमाखात राज्याभिषेक झाला. तीन राजांचा राज्याभिषेक सोहळा या किल्ले अजिंक्यताराने पाहिला आहे. या वास्तूमध्ये छत्रपती शिवाजी महाराज 56 दिवस राहिले होते. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही किल्ले अजिंक्यतारा भूमी आहे. तेथे चांदबिबीना देखील नजरकैदेत ठेवले गेले होते. पहिले छत्रपती शाहू महाराज यांच्या राज्याभिषेकाला 300 वर्षे पूर्ण झाल्याबद्दल किल्ले अजिंक्यतारासाठी 5 कोटी रुपये तरतूद करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्याचबरोबर नागपूर येथे ज्याप्रमाणे हज हाऊस केले गेले. त्यासाठी 5 कोटी रुपये दिले असून 4 कोटी रुपये दिले जाणार आहेत. तशा प्रकारे औरंगाबादला देखील हज हाऊसची व्यवस्था करण्याचा निर्णय करीत आहोत.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील......

औरंगाबाद येथे हज हाऊसची स्वतंत्र व्यवस्था करुन तेथील मुस्लीम बांधवांची अधिक सेवा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांच्या मुद्याच्या संदर्भात मला उपरोक्त व्यवस्थेबाबत सांगताना आनंद वाटतो. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी तसेच अन्य शिक्षक आमदारांनी शिक्षकांचे पगार एक तारखेला मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्या अनुषंगाने मला असे सांगावयाचे आहे की, सन 2008-09 मध्ये आपण नव्याने एक सिस्टीम हाती घेण्याचे ठरविले आहे. ती सिटीम म्हणजे इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टीम (ईसीएस) प्रमाणे शिक्षकांचे पगार वेळेवर होण्यात अडचणी येणार नाहीत. तसेच ही बजेटरी डिस्ट्रीब्युशन सिस्टीम केली असल्यामुळे खर्चावर एक प्रकारे चांगले नियंत्रण येते आणि त्याचा पुढचा टप्पा आपण या वर्षी घालत आहोत. सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी महिलांच्या धोरणांचा आढावा घेण्याची सूचना केली आहे. तसेच महिलांनी तयार केलेल्या वस्तुंचे मार्केटिंग करा असेही त्यांनी सुचविले. मी मघाशीच घोषणा केली की, महिलांचे सक्षमीकरण करण्याबाबत जे जे मुद्दे येथे मांडले आहेत, त्यांची नोंद घेऊन सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे यांनी केलेल्या सूचनांचा पाठपुरावा करण्याचे प्रयत्न शासनाकडून करण्यात येतील. त्याचप्रमाणे माननीय तालिका सभापतीस्थानी असलेले माननीय श्री. अरविंद सावंत यांनी देखील मुंबईसाठी अर्थसंकल्पात न्याय मिळाला नाही, अशी खंत व्यक्त केली. परंतु मुंबईला किती न्याय दिला आहे हे सांगण्याचा मघाशीच मी प्रयत्न केला आहे. त्यामुळे आपले समाधान झाले असल्याचे आपल्या चेहऱ्यावरुन वाटते.

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : असे नाही, आपल्या सचिवांनी आपल्याला चुकीचे इंटरप्रिटेशन केले असावे. कारण मी असे म्हटले की, मुंबईतील लोकांना हक्काची घरे कशी मिळतील ?

श्री. जयंत पाटील : आमच्या अधिकाऱ्यांनी जर चुकीचे इंटरप्रिटेशन केले असेल तर त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

महोदय, रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या संदर्भात येथे सांगण्यात आले की, आज राज्यात 32 लाख बेरोजगार आहेत आणि त्यासाठी वेबसाईटची अडचण होती परंतु आता या सर्व गोष्टी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील.....

आता पूर्णपणे कार्यान्वित झालेल्या आहेत. त्यानुसार शासनाने आता प्रत्येक तरुणावर 7 हजार रुपयापर्यंत खर्च करण्याचा निर्णय घेतला आहे. कारण हे तरुण सुशिक्षित आहेत, पण काम करता येत नाही. त्यासाठी त्यांच्यासाठी इफिशिएन्सी कोर्सेस सुरु करावेत व ही कल्पना शासनाने हाती घेतली. तसेच दहावी, बारावी, तेरावी अथवा चौदावी अशा अर्धवट शिकलेल्या तरुणांसाठी देखील ही योजना तयार केली असून त्यांच्यासाठीच यातील मॅक्सीमम खर्च करावयाचा. त्यातून त्याला प्रशिक्षण द्यावयाचे, त्यांना किट द्यावयाचे अशा प्रकारे योग्य पध्दतीने काम करण्याची संधी द्यावी, असे शासनाचे धोरण आहे. आणि या योजनेचा आपल्या राज्यात चांगला परिणाम होईल, अशी शासनाला खात्री वाटते.

महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मेडिकल कॉलेजेसमधील बोगस कोर्सेस, मेडिकल कॉलेजेसच्या इन्फ्रास्ट्रक्चरसंबधीचे मुद्दे उपस्थित केले. तसेच बोगस कॉलेज, खाजगी कॉलेजेसमध्ये एमसीआयच्या निकषांप्रमाणे इन्स्ट्रुमेंटेशन नसेल तर त्यांच्यावर सक्त कारवाई करणे आवश्यक आहे, याबद्दल माझ्या मनात शंका नाही. पण एमसीआयच्या निकषांप्रमाणे राज्याच्या काही कॉलेजेसमध्ये इक्विपमेंट्स नसतील तर त्यांची पुर्तता आपण या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून बऱ्यापैकी केली आहे. तसेच इतर ज्या मेडिकल कॉलेजेसबाबतच्या सूचना आहेत त्यांचा पाठपुरावा करण्यात येईल, असेही मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी ग्लोबल वॉर्मिंगच्या बाबतीत देखील मुद्दा उपस्थित केला, त्यासाठी शासनाने कोणताही अभ्यास गट नेमलेला नाही, असेही त्यांनी सांगितले.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात केंद्रशासनाने बरेच संशोधन केलेले आहे परंतु त्यांच्या मानाने राज्य सरकारने तेवढे संशोधन केलेले नाही त्यामुळे ग्लोबत वॉर्मिंगच्या संदर्भात राज्यशासनाने सुध्दा अधिक संशोधन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी वित्त विभागाच्या संदर्भात बरेच मुद्दे मांडलेले आहेत. त्यांच्या मुद्यांना मला उत्तरे द्यावयाची होती परंतु ते सभागृहात उपस्थित नाहीत. ज्यावेळेस आम्ही विरोधी पक्षात होतो तेव्हा आम्ही प्रत्येक विषयावर चर्चा करीत असे आणि उत्तर ऐकण्यासाठी सुध्दा थांबत असे. परंतु सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या सर्वाचे प्रश्नाचे समाधान झाले असेल म्हणून ते उपस्थित नाही असे मी समजतो.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेमध्ये केवळ 288 मजुरांना काम मिळाले आहे असा मुद्दा या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे परंतु यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, 6 लाख मजूर क्षमतेची 7343 कामे पूर्ण असून 3047 मजूर उपस्थित आहेत. सभापती महोदय, एनआरईजीएस आणि इजीएस या कॉम्बीनेशनची ही संख्या आहे. केंद्रसरकारने आम्हाला सांगितले की, आमच्या प्लॅनिंगच्या कामाचे तुम्ही का वापरत नाही? दुसरी राज्ये 700-800 कोटी रुपये वापरतात त्यामुळे यावर्षी आपण जसे इजीएससाठी आपण जसे पैसे भरतो तसे पैसे एनआरईजीएस साठी केंद्रसरकारचे अधिकाधिक पैसे मिळवियाचे प्रयत्न होईल.

सभापती महोदय, सहकारी साखर कारखान्यांची परिस्थिती फार खराब आहे असा उल्लेख या ठिकाणी करण्यात आलेला आहे. माननीय कृषी मंत्री पवार साहेबांनी नाबार्डचे पहिले पॅकेज दिले, दुसरे पॅकेज आता एक्सटेंन्ड केले जात आहे. आपल्या राज्यातील ऊस पिकविणा-या शेतक-यांसाठी वेगवेगळया योजना अर्थसंकल्पात दिलेल्या आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. सुरेश नवले यांनी दारिद्रय रेषेखालील मुलींना सायकलीचे वाटप केले जाणार आहे तसेच वाटप दारिद्रय रेषेखालील मुलांना सुध्दा देण्यात याव्यात अशी सूचना केलेली आहे परंतु मी सांगू इच्छितो आहे की, मुलींना सायकली देण्यामध्ये काही लॉजिक आहे. मुलींचे गळतीचे प्रमाण अधिक आहे तसेच मुलींना शाळेत पाठवितांना पालकाला दहा वेळा विचार करावा लागतो.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील .....

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी अंबरनाथ येथे विमानतळ करण्यात यावे अशी मागणी केलेली आहे परंतु कल्याण येथील नेवाळे येथील जागेत एअरपोर्ट करण्याच्या बाबतीत केंद्रसरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे परंतु अजूनपर्यंत केंद्रसरकारने यावर निर्णय घेतलेला नाही. मुंबई रिजनमध्ये आताच विमानतळाची व्यवस्था केली तर पुढील 20-25 वर्षाने शॉर्टेज वाटणार नाही. त्यामुळे दुरदृष्टीपणाचे मार्गदर्शन या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी केलेले आहे त्याबाबत सन्माननीय उपसभापती श्री. डावखरे साहेबांशी चर्चा करुन अंमलात आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी विदायक सूचना या ठिकाणी केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी प्राथमिक शिक्षणाची अवस्था वाईट आहे आणि शिक्षकांची संख्या कमी आहे असे सांगितले आहे परंतु मी सांगू इच्छितो की, यासंदर्भात राज्यशासनाने मोठया प्रमाणात कार्यक्रम हातात घेऊन शिक्षकांच्या नेमणुका केलेल्या आहेत. 8-9 वर्षापूर्वी जी परिस्थिती होती तशी परिस्थिती आता राहिलेली नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी पर्यटनासाठी 200 कोटी रुपये देण्यात यावे असे सांगितले. समुद्रकिना-यासाठी आपल्याला 12 वित्त आयोगाकडून 65 कोटी रुपयांची तरतूद उपलब्ध होत असते, यामध्ये राज्यसरकारने अर्थसंकल्पात अधिकची तरतूद केलेली आहे. विदर्भातील जंगल तसेच कोकणातील समुद्र किनारे या ठिकाणच्या पर्यटनाला चालना देण्याचे धोरण गेल्या दोन तीन वर्षात राबविण्याचा राज्यसरकारने प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : मत्स्य दुष्काळाबद्दल काही सूतोवाच केलेले नाही.

श्री.जयंत पाटील. : सभापती महोदय,मत्स दुष्काळ जाहीर करण्यासंबंधी सन्माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे आणि कोकणातील सर्व मंत्र्यांची एक बैठक झाली होती. परतु मत्स दुष्काळ जाहीर करण्याच्या बाबतीत राज्य सकराने अजून अंतिम निर्णय घेतलेला नाही त्यामुळे जो निर्णय झ ाालेंला नाही त्याची घोषणा करणे योग्य होणार नाही. ही बाब प्रोसेसमध्ये आहे असे आपण समजावे.सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणातून जे मुद्दे मांडलेले आहेत त्या सर्व मुद्यांना मी उत्तरे दिलेली आहेत असे समजतो.

श्री.जितेद्र आव्हाड (बसून) ञ्जलवाहतूकीच्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मुंबई शहरापासून आणि ठाणे खाडीपर्यंतच्या जलवाहतूकी सबंधी मध्यंतरी टेन्डर काढले होते परंतु ते रद्द करुन पुन्हा नव्याने टेन्डर काढण्यात येत आहे. मुंबईतील रस्त्याच्या कामाला ज्याप्रमाणें प्राधान्य देण्यात आलेले आहे त्याप्रमाणे मुबईच्या जवळ एवढया मोठया प्रमाणावर समुद्र उपलब्ध असतांना जल वाहतूकीला देखील चालना दिली पाहिजे म्हणून जल वाहतुकीला चालना देण्याचेच राज्य सरकारचे धोरण राहील हे मी या ठिकाणी नमूद करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री अरुण गुजराथ यांनी काही मुद्दे मांडलेले आहेत त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. सुमंत गायकवाड यांनी महामंडळाच्या कर्जाची परतफेड होत नसल्याबद्दलचा मुद्दा मांडलेला आहे. यावर्षी महामंडळाना मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला आहे.शेळीमेंढी विकास महामडळाच्या बाबतीत सांगावयाचे....

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय,

श्री.जयंत पाटील : आपण मला उठून पुन्हा प्रश्न विचारण्याची गरज नाही. आपणदोघेही जण एकाच जिल्हयातील आहोत माझे वाक्य पूर्ण् झाल्यानंतर आपण पुन्हा प्रश्न विचारावा. शेळीमेंढी विकास महामडळाच्या बाबतीत अर्थसंकल्पात उल्लेख् केलेला आहे तो कदाचित आपण वाचलेला नाही.

श्री.प्रकाश शेंडगे : माननीय उपमुख्यमंत्र्यांनी वेगवेगळया मेळाव्यामध्ये 125 कोटी रुपये देण्याच्या बाबतीत घोषणा केलेली आहे तेव्हा त्याप्रमाणे हा निधी केव्हा देणार आहात तेवढेच सांगावे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील : या महामंडळाच्या संदर्भात मी अर्थसंकल्पामध्ये उल्लेख केलेला आहे.सन्माननीय सदस्यांनी ते भाषण वाचून पहावे. तीन महामंडळाचा त्यात उल्लेख केलेला आहे. त्यासाठी किरकोळ निधीची तरतूद केलेली आहे आणि ती वाढवून दिली पाहिजे. शेळी मेढी विकास महामंडळाच्या मार्फत एक कार्यक्रम आपल्याला हाती घ्यावयाचा आहे. त्याकरिता एक विशेष तरतूद करावयाची असा निर्णय शासनाने घेतलेला आहे परंतु निधीची तपशीलवार माहिती आल्यानंतर बजेटीग केले जाणार आहे असा उल्लेख मी माझ्या भाषणात केला होता. त्यामुळे जून महिन्याच्या पुरवणी मागण्याच्या वेळी त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यात येईल याची मला खात्री आहे. परंतु मी आपल्याला नम्रपणे सांगतो की हे राज्य विकासाकडे चालले आहे. आर्थिक दृष्टया एक सक्षम राज्य म्हणून महाराष्ट्राचा नावलौकिक पुन्हा एकदा संपूर्ण देशात प्रस्तापित झाला आहे. महाराष्ट्रातील पददलिताना न्याय देण्यासाठी सोशल सेक्टरवर अधिक पैसे खर्च करण्यात येत आहेत. आदिवासी आणि एस.सी. प्लॅनवर देशातील कोणत्याही राज्यापेक्षा महाराष्ट्र राज्याने अर्थसंकल्पात जास्त पैसे ठेवलेले आहे. जो घटकमागे राहिलेला आहे त्याला अधिक न्याय देण्याचा प्रयत्न करीत आपले राज्य पुढे गेले पाहिजे या दृष्टीने हा अर्थसंकल्प मांडण्यात आला असून तो समतोल आहे, सर्वाना न्याय देणारा आहे तेव्हा या अर्थसंकल्पातील सर्व बाबी मान्य कराल आणि अर्थसंकल्पाला पाठिंबा द्याल अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण आणि डॉ.दीपक सावंत यांना एक एक प्रश्न विचारण्याची मी परवानगी देतो.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, असे का करण्यात येत आहे ?

**तालिका सभापती** : याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, सभागृहाची नियमित बैठक 12.45 वाजता सुरु होणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी माननीय मंत्री महोदयांचे भाषण सुरु असतांना दोन तीनदा प्रश्न विचारण्याचा प्रयत्न केला होता आता प्रश्न विचारु नका असे सांगून त्यांना खाली बसवले होते.

श्री.जितेंद्र आव्हाड : परंतु प्रश्न आम्ही विचारले नाही आम्ही सौजन्य दाखवले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना मी सांगतो की आपण खाली बसून जल वाहतूकीसंबंधीचा प्रश्न विचारला होता व त्या प्रश्नाचे माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते.आता सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी प्रश्न विचारावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी फक्त एकच प्रश्न विचारु इच्छितो परवाच्या दिवशी धोरण जाहीर करीत असतांना .माननीय महसूल मंत्री श्री.नारायण राणे असे म्हणाले होते की,यापुढे मुंबई शहरामध्ये अतितिरक्त एफ.एस.आय.मध्ये जी घरे बांधली जाणार आहेत त्यामध्ये सर्वसामान्य व्यक्तींसाठी 30 टक्के घरे देण्याची अट ठेवली जाणार आहे. अर्थसंकल्पामध्ये मात्र 10 टक्केचा उल्लेख केलेला आहे. एफ.एस.आय.चा उल्लेख अर्थसंकलपामध्ये कसा आला हे मला माहीत नाही ? जी अतिरिक्त जमीन उपलब्ध होईल त्यामध्ये सर्व सामान्य माणसाकरिता 60 टक्के रिझर्व्हेशन ठेवून त्यातील 35 टक्के वन बीएचके आणि 25 टक्के टू बीएचकेसाठी ठेवून,किंमतीवर नियंत्रण आणून सात आठ लाख रुपयांना ही घरे देण्यात येतील अशा प्रकारची योजना आखण्यात येणार आहे काय ?

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे तिचा पूर्णपणे विचार करण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आपण वाडिया हॉस्पिटलला 4 कोटी रूपये दिले आहेत, ते पैसे कशासाठी दिले आहेत ? तसेच हाफकीनसाठी काही तरतूद आपण अर्थसंकल्पात केलेली आहे, ही जी 2 कोटीची तरतूद केलेली आहे तर आपण हाफकीन स्वत: चालविणार आहात की, ती एक खाजगी संस्था म्हणूनच चालविणार आहात ? कारण त्यांच्याकडे आज हजारो एकर जमीन मुंबईच्या अगदी मधल्या भागामध्ये आहे ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, हाफकीन संस्थेचे बळकटीकरण आणि अपग्रेडेशन करावयाचे आहे त्यासाठी हा पैसा आपण दिलेला आहे आणि आपणच ती संस्था चालविणार आहोत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्या संबंधात मी दोन-तीन प्रश्न विचारले हाते त्याला उत्तर आलेले नाही. तेथील शेतकऱ्यांचे चिकू, नारळ, भोपळी मिरची यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्यासंबंधात मी उल्लेख माझ्या भाषणा केला होता. तसेच तेथील डायमेकिंगचा उद्योग हा कॉटेज इंडस्ट्री म्हणून जाहीर करावा आणि तिसरा प्रश्न म्हणजे ठाणे जिल्ह्याचे विभाजन करण्यासंबंधात आपण काही येथे खुलासा करावा.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, काही मोठ्या जिल्ह्यांचे विभाजन, त्रिभाजन व्हावे ही मागणी अनेक वर्षांपासूनची आहे. परंतु यापूर्वी जे जिल्हे नव्याने आपण निर्माण केले आहेत त्या ठिकाणी अधिक सुविधा-व्यवस्था केली पाहिजे, त्यासाठी आपण अगोदर प्रयत्नशील आहोत. ठाणे आणि नगर जिल्ह्याची केस ही विभाजनाच्या बाबतीत जेन्युईन आहे त्याबाबत धोरणात्मक स्वतंत्र असा निर्णय घ्यावा लागेल. दुसरे म्हणजे डायमेकिंग उद्योगाला कुटीरोद्योगाचा दर्जा देण्याचा प्रस्ताव माझ्याकडे आल्यास त्याबाबत संबंधितांशी मला बोलावे लागेल. शिवाय हा विषय माझा नसल्याने मला वाटत नाही की, मी त्याबाबत काही करणे वा बोलणे बरोबर होईल. परंतु त्याबाबत संबंधितांशी जरूर चर्चा करण्यात येईल एवढेच मी सांगतो.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मी येथे बेलापूर किल्ल्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता ...

..... जीजी 2 ..

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत उत्तर देण्याचे राहून गेले होते. त्याबात मी आपल्याला सांगू इच्छितो की, बेलापूर किल्ल्याच्या सुधारणा-दुरूस्तीसाठी राज्य सरकार संबंधित अधिकाऱ्यांबरोबर तसेच सन्माननीय सदस्यांनाही त्यावेळी बोलाविण्यात येईल, पण सर्वांशी बोलून, त्यासंबंधात एक योजना तयार करून त्यासाठी निधी जरूर देईल. छत्रपती शिवाजी महाराजांनी बांधलेले आणि महाराष्ट्राचा अभिमानाचा विषय असलेले असे जे जुने किल्ले आहेत त्यांच्या डागडुजीसाठी, मग तो शिवनेरी किल्ला असेल वा पुरंधर किंवा प्रतापगड असेल, त्या ठिकाणी सुधारणा करण्याचा राज्य सरकारचा मोठा कार्यक्रम आहे. त्याचबरोबर पोर्तुगीजांनी बांधलेले किल्ले आहेत तेथेही सुधारणा करणे तसेच पर्यटनाच्यादृष्टीनेही ती ठिकाणी चांगली असल्यास त्यासाठी पैसे देण्याची गरज भासली तर ते देता येतील.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, वॉटर ट्रान्स्पोर्टेशनचा जो मुद्दा मी माझ्या भाषणात मांडला होता. त्यातील बोरीवली ते नरिमन पॉईंट बद्दल माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. परंतु मी त्याच्या उलट बाजू सांगतो. ठाण्याच्या घोडबंदर आणि वसई क्रीक आहे येथून ठाणे शहराला लागून ऐरोली पासून गेटवे पर्यंतची वाहतूक सुरू करण्याच्यादृष्टीने आपण सर्वेक्षण करून घेतले तर ...

श्री. जयंत पाटील : तसा सर्व्हे करण्यात येईल आणि ते व्हाएबल असेल तर दोन वर्षात त्या दृष्टीने व्यवस्था करण्याचा आपण प्रयत्न करू.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मुलुंड पर्यंत मेट्रो रेल्वे आपण आणीत आहात ती ठाण्यापर्यंत नेणार का ?

श्री. जयंत पाटील : त्याबाबत जे करता येईल ते करू.

**तालिका सभापती** : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक 12.45 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 12.44 वाजता स्थगित झाली. )

( यानंतर श्री. सरफरे ... एचएच 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**अनेक प्रकरणात हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतरसुध्दा पदे अनारक्षित केल्या प्रकरणी योग्य तो लाभ देण्याची कारवाई न होणे**

**सभापती** : आता प्रथम दिनांक १४ मार्च २००८ रोजी राखून ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र. ३७६३७ घेण्यात येईल.

**(९) * ३७६३७ डॉ. एन. पी. हिराणी , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे : दिनांक २९ नोव्हेंबर २००७ रोजी सभागृहराच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या सोळाव्या यादीतील प्रश्न क्रमांक २९३५५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकामागून एक अनेक प्रकरणामध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्टपणे निर्णय दिल्यानंतरसुध्दा अधिव्याख्यात्यांची पदे अनारक्षित करण्यामध्ये शासनाकडून विलंब होत आहे अशी तक्रार करणाऱ्या नागपूर विद्यापीठ शिक्षक संघांच्या ( नुटा) सहसचिवांनी ३० मे, २००५ रोजी किंवा त्या दरम्यान, सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग यांच्यामार्फत मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण यांना सादर केलेल्या विचाराधिन निवेदनात नमुद असलेल्या प्रस्तावा संदर्भात पदे अनारिक्षित करून संबंधितांना सेवा सातत्याने लाभ लागू करण्याबाबत शासनाने दिलेल्या आदेशाबाबत सहसंचालक व कुलसचिव यांनी आजपावेतो कोणतीही कारवाई केलेली नाही हे खरे आहे काय,

(२) कार्यवाही झालेली असल्यास, याबाबत मा. उच्च न्यायालयाचे निर्णय लक्षात घेता शासनाने केलेल्या कारवाईचे स्वरूप काय आहे,

(३) कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : १), २) व ३)

संबंधित अधिव्याख्यात्यांच्या वरिष्ठ श्रेणीची वेतन निश्चिती झाली असून त्यापैकी ३ अधिव्याख्यात्यांना थकबाकी अदा करण्यात आली आहे. उर्वरित दोन अधिव्याख्यात्यांना दि.३१.३.२००८ पर्यंत वरिष्ठ श्रेणीची थकबाकी अदा करण्यात येईल



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ KTG/

**ता.प्र.क्र. ३७६३७....**

श्री. दिलीप वळसे पाटील...

त्याचप्रमाणे उक्तपैकी ४ अधिव्याख्यात्यांच्या निवडश्रेणीची वेतन निश्चिती करण्यात आली आहे.उर्वरित एका अधिव्याख्यात्याची अशी वेतन निश्चिती करुन त्यांच्यासह सर्व पाच अधिव्याख्यात्यांना याबाबतची थकबाकी दि.३१.३.२००८ पर्यंत अदा करण्यात येईल.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ SBT/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:50

ता.प्र.क्र.37637 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, 15 ते 20 वर्षाच्या वर नोकरी झालेल्या अनेक शिक्षकांचा महाराष्ट्रामध्ये छळ झाला आणि यासंदर्भात दोन-चार केसेस समोर आलेल्या आहेत आणि त्या केसेस सुध्दा हाय कोर्टातून परत आलेल्या आहेत. याबाबतीत डझनावरी लोकांना अनारक्षण न दिल्यामुळे, त्यांना गेली अनेक वर्षे अतिशय छळाला तोंड द्यावे लागले आहे. या केसेस हाय कोर्टातून परत आलेल्या आहेत. पण डहाणूकर कॉलेजमधील श्रीमती माधवी एस.पेठे यांच्या बाबतीत कन्टेम्प्ट ऑफ कोर्टची नोटीस दिल्यानंतर मग शासनाने यांना रेग्युलराईज करण्याचे आदेश दिले आहे. याशिवाय हाय कोर्टाने ऑर्डर दिली की, 1990 च्या जी.आर.प्रमाणे कार्यवाही करावी. पण श्री.केंद्रे नावाच्या एका अधिकाऱ्याने असे कळविले की, 1994 च्या जी.आर.प्रमाणे करावी. याबाबतीत सदनामध्ये देखील उल्लेख केला होता आणि सभापती महोदय,आपणही एक बैठक बोलाविली होती. त्यावेळी आपण देखील असे म्हटले होते की, हाय कोर्टाने निर्णय दिल्यावरही श्री.केंद्रे यांनी अशा प्रकारची ऑर्डर पाठविणे बरोबर नाही. श्री.केंद्रे यांना हाय कोर्टाने याबाबतीत 20 हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. श्री.केंद्रे यांनी चुकीची माहिती देऊन कोर्टाची दिशाभूल केल्याबद्दल हा दंड ठोठावला होता ही बाब माननीय मंत्री महोदयांनी लक्षात घ्यावी. या ठिकाणी असे म्हटलेले आहे की,"श्री.केंद्रे यांनी प्रतिज्ञापत्रात केलेली विधाने वस्तुस्थितीला धरुन नव्हती व दिशाभूल करणारी होती असे निदर्शनास आल्यावर खंडपीठाने त्यांच्याविरुध्द कन्टेम्प्ट ऑफ कोर्टची नोटीस काढली. त्यावेळीही श्री.केंद्रे यांनी चुक कबूल करुन बिनशर्त दिलगिरी व्यक्त केली नाही. आपली चूक झाली असे जर न्यायालयास वाटत असेल तर आपण दिलगीर आहोत असे त्यांनी म्हटले आहे. मग न्यायालयाने त्यांची दिलगिरी स्विकारली नाही आणि त्यांना दंड ठोठावला.आता 15-20 वर्षे झाली. आपण स्वत: सर्व संबंधितांची बैठक बोलविली होती आणि त्यावेळी आपण स्पष्टपणे सांगितले होते की, परंतु याप्रकरणी हाय कोर्टाचा निर्णय झाल्यानंतर सरकार सुप्रीम कोर्टामध्ये गेलेले नाही आणि तसे न झाल्यामुळे हाय कोर्टाचा निर्णय इन्टॅक्ट आहे. त्यावेळी ते तेथेच होते. पण तरीही त्यानंतर कार्यवाही झाली नाही. यासंबंधात सभागृहामध्ये आपण कोणता निर्णय दिलेला आहे ते मी एक मिनिटामध्ये सांगतो.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा सार्वजनिकदृष्टया अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.

. . . .2 आय-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37637 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

अशा प्रकारे कोणाचाही छळ होऊ नये अशी माझी मनापासून इच्छा आहे. दि.6 जुलै 2006 रोजी आपण सदनामध्ये असे सांगितले की, "सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांच्या विवेचनावरुन, सप्लीमेंटरी माहिती दिली, ज्याला मी हरकत म्हणणार नाही, ती याठिकाणी दिली आहे. त्यांचे जे मत आहे, तेच माझेही मत आहे.एकदा हाय कोर्टाने निर्णय दिल्यानंतर त्या निर्णयाची अंमलबजावणी होते हे गृहीत धरलेले असते आणि तो निर्णय स्विकारणे गरजेचे आहे.या अनुषंगाने शासनाला जर काही अडचण असेल तर त्यांनी सर्वोच्य न्यायालयामध्ये जावे. माझ्या दालनामध्ये दि. 27 एप्रिल 2006 रोजी सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी याची अंमलबजावणी होण्याची गरज आहे असे मी सांगितले होते. सभापती महोदय, आपण त्यादिवशी हा प्रश्न राखून ठेवला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. असे डझनावारी लोक आहेत म्हणजे काही लोकांना मंत्रालयातून रिलीफ मिळालेला आहे. मी माननीय मंत्री महोदयांच्या फाईलमधील पान क्रमांक देखील सांगू शकतो. येथे आरक्षण उठविले होते, त्याला स्टे दिला, संबंधितांची रिकव्हरी काढली

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझा पॉईंटेड प्रश्न आहे. त्यादिवशी कारवाई केली असे सांगितले होते. पण काय कारवाई केली आहे ? तर याबाबतीत आज जी काही कारवाई केली आहे, त्यातील अर्ध्या कारवाईच्या बाबतचा भाग उत्तरामध्ये दिलेला आहे आणि तो भाग व्यक्तीश: समाधानकारक आहे. त्यांना वरिष्ठ श्रेणी आणि निवड श्रेणी मध्ये जे काही लाभ द्यावयाचे होते, ते दिलेले आहेत. पण हाय कोर्टाचा निर्णय काय आहे ? तर हाय कोर्टाचा आदेश असा आहे की, त्यांना कन्टीन्युटी ऑफ सर्व्हीसचे सर्व फायदे द्यावेत. पण त्यांना इन्क्रीमेंट सुध्दा दिलेले नाही अशी माझी तीन-चार दिवसापूर्वीची माहिती आहे. परंतु ते फायदे जर त्यांना दिले असतील तर मग मला प्रश्न विचारावयाचे नाहीत. हाय कोर्टाने त्यांना कन्टीन्युटी ऑफ सर्व्हीस दिलेली आहे. तुम्ही त्यांना प्रमोशन वगैरे दिले. काहींचे ॲरिअर्स दिले आणि काही जणांना 31 तारखेनंतर देतो असे सांगत आहात त्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. माझे पॉईंटेड म्हणणे असे आहे की, त्यांना 1989 च्या शासन निर्णयाप्रमाणे इन्क्रीमेंट दिलेले आहे काय ? मला चार दिवसापूर्वी मिळालेल्या माहितीनुसार ते देण्यात आलेले नाही. पण जर ते देण्यात आले असेल तर मग मला प्रश्न विचारावयाचे नाहीत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत माहिती द्यावी.



APR/ KTG/ SBT/ 12:50

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37637 . . . .

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अमरावती विद्यापीठातील ज्या पाच केसेस होत्या, त्या संदर्भात हाय कोर्टाने जे आदेश दिले किंवा यासंदर्भात शासनाने वेळोवेळी जी भूमिका घेतली .

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 37637 .... श्री. दिलीप वळसे-पाटील....

त्यामध्ये बहुतांश लाभ त्यांना देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी 1989 च्या शासन निर्णयाच्या संदर्भात नवीन मुद्दा उपस्थित केलेला आहे. यासंदर्भात सन्माननीय सदस्य आणि मी एकत्र बसून आजच यासंदर्भात आम्ही अंतिम निर्णय घेऊ.

प्रा. बी. टी. देशमुख : माझी काही हरकत नाही. मुद्दा लहानसा आहे. चार आठवड्याच्या आत त्यांना क्वॉन्सिक्वेंशल बेनिफिट्स दिले पाहिजेत असा हायकोर्टाचा निर्णय आहे. हा आदेश 2005 चा आहे. ते आरक्षित नव्हते, ते अनारक्षित होते म्हणून त्यांना इन्क्रिमेंट दिले नव्हते. ते देणे आवश्यक आहे. कारण कोर्टाने कंटीन्युटी दिलेली आहे आणि आपणही कंटीन्युटी दिलेली आहे. माननीय मंत्रिमहोदय म्हणत आहेत म्हणून मी जास्त आग्रह धरत नाही. पण माननीय मंत्रिमहोदय म्हणतात त्याप्रमाणे बसून आजच त्याबाबतचा अंतिम निर्णय घेणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, होय.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/ KTG/ SBT/

**राज्यात डॉक्टरांना संरक्षण देण्यासाठी नवीन कायदा करण्याबाबत**

**(१) * ३७६४१ श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री.राजन तेली :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉक्टरांना संरक्षण देण्यासाठी राज्यात कायदा करण्याबाबतचे जाहीर आश्वासन मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक १० जानेवारी, २००८ रोजी वा त्या सुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रुग्णालयात डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्यांच्या पार्श्वभुमिवर आलेल्या कायद्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात कायदा करण्याबाबत शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, मार्च-एप्रिल, २००८ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान हा कायदा लागू करण्यात येईल काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१) मा.मुख्यमंत्री यांनी असे आश्वासन दिल्याचे दिसून येत नाही.

(२), (३) व (४) गुन्हेगारी स्वरुपाच्या कृत्यासंदर्भात कायदे अस्तित्वात असल्यामुळे डॉक्टरांना संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र कायदा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी अशा प्रकारचे आश्वासन दिल्याचे दिसून येत नाही असे उत्तरामध्ये म्हटले आहे. लातूरमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याचे कात्रण मी आपल्याला सादर करतो. माझे असे म्हणणे आहे की, वैद्यकीय क्षेत्रामध्ये डॉक्टरांना मारहाण होणे, तोडफोड करणे तसेच खंडणीचे प्रकार अतिशय वाढू लागले आहेत. दवाखान्यामध्ये गंभीर पेशन्ट असताना असे प्रकार घडले तर पेशन्टवर त्याचा परिणाम होऊ शकतो. माझा असा प्रश्न आहे की, आंध्र प्रदेश सरकारने ज्या पध्दतीने कायदा केला आहे, गुजरात सरकारने सुध्दा ज्या पध्दतीने कायदा केलेला आहे त्या पध्दतीचा कायदा महाराष्ट्र सरकार करणार काय ? जे आरोपी आहेत त्यांच्यावरील गुन्हा अजामीनपात्र समजला जाईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आंध्र प्रदेश सरकारचा जो अध्यादेश निघाला त्याच धर्तीवर कायदा करण्याचे गृह खात्याच्या विचाराधीन आहे. त्यांनी आरोग्य विभाग आणि आरोग्य शिक्षण विभागाचे अभिप्राय मागितलेले आहेत. त्यांची मागणी आताच आलेली आहे. आमचे दोन्ही विभाग अभिप्राय देणार आहे आणि त्यानंतर कायदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/ KTG/ SBT

ता.प्र.क्र. 37641 .....

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाला कायद्याप्रमाणेच सामाजिक दृष्टीकोन सुध्दा आहे. अलीकडे अशा घटनांमध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे. डॉक्टर भयग्रस्त झालेले आहेत. परिणामी क्रिटीकल स्टेजमध्ये असलेला पेशन्ट असला तरी त्यांना सुध्दा ते ॲडमिट करीत नाहीत. तो पेशन्ट दगावला तर आपल्यावर दोषारोप होईल अशी त्यांना भीती वाटते. डॉक्टरांना तणावाच्या वातावरणामध्ये काम करता येत नाही. आंध्र प्रदेश, गुजरात तसेच इतर राज्यामध्ये जे कायदे केलेले आहेत त्या अनुषंगाने यांसदर्भातील प्रक्रियेसाठी एक अभ्यासगट निर्माण करुन, त्यासाठी वेळेची मर्यादा ठरवून या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये कायद्यात दुरुस्ती किंवा नवीन कायदा करण्यात येईल काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आताच सांगितले की, ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. संजय दत्त : मी अभ्यास गट आणि वेळेच्या मर्यादेबाबत विचारले आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, अभ्यास गट तयार करण्याची गरज नाही. ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे. दोन राज्यांचे जे अध्यादेश आहेत किंवा जे कायदे आहेत ते तपासून शासन योग्य तो निर्णय लवकरात लवकर करणार आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, डॉक्टरांच्या एकंदरीत वर्तणुकीबद्दल एक चांगला प्रश्न या ठिकाणी आलेला आहे. या नाण्याला दोन बाजू आहेत. डॉक्टरांना सुरक्षितता मिळाली पाहिजे हे जसे सत्य आहे तसेच जे रुग्ण त्यांच्याकडे जातात त्यांनाही संरक्षण मिळाले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37641..... श्री.मधुकर सरपोतदार.....

हे रेसिप्रोकल रिलेशन आहे. त्यामध्ये एकाने चूक केली तर दुसरा दगावतो. म्हणजे डॉक्टरने चूक केली तर पेशंट दगावतो आणि पेशंटने चूक केली तर डॉक्टर धोक्यामध्ये येतो. यातून मार्ग काढण्यासाठी कोड ऑफ डिसिप्लीनची आवश्यकता आहे जी डॉक्टरांच्या प्रोफेशनमध्ये अंतर्भूत आहे. या कोर्ड ऑफ डिसिप्लीनचे तंतोपंत पालन करण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हा प्रश्न वेगळा आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा प्रश्न या प्रश्नाशीच संबंधित आहे.

डॉ.दीपक सावंत : माननीय मंत्रिमहोदयांनी अतिशय पॉझिटिव्ह उत्तर दिले आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या सर्व प्रोसिजरला वेळ लागणार आहे. तोपर्यंत प्रत्येक हॉस्पिटलमध्ये मग ते राज्य शासनाच्या वैद्यकीय शिक्षण खात्याचे असो की सार्वजनिक आरोग्य विभागाचे असो. निदान कॅज्यूअल्टीमध्ये असणा-या डॉक्टरांना तरी संरक्षण मिळण्याची व्यवस्था केली जाणार आहे काय ? कारण या प्रोसिजरला वेळ लागणार आहे. तोपर्यंत मघाशी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितल्याप्रमाणे टाईम गॅप भरुन काढण्यासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून त्या डॉक्टरांना पोलीस संरक्षण देण्याची सोय केली जाणार आहे काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, एनआरएचएम अंतर्गत सर्व ग्रामीण रुग्णालयांमधील डॉक्टरांना संरक्षण देण्याची तरतूद केलेली आहे. ग्रामीण रुग्णालयांमध्ये खाजगी सुरक्षा रक्षक ठेवलेले आहेत. एनआरएचएमची अंमलबजावणी जिल्हा स्तरावर होते. माननीय सदस्यांनी असे म्हटले की, या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. यासंदर्भात जिल्हा आरोग्य अधिका-यांना आपापल्या रुग्णालयात सुरक्षेची तयारी ठेवण्याच्या सूचना दिल्या जातील.

--------

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/ SBT/ KGS/

**जामखेड तालुक्यातील राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचे अनुदानाबाबत**

**(2) * 40563 श्री. यशवंतराव गडाख : तारांकित प्रश्न क्रमांक 30730 ला दिनांक 31 जुलै, 2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) जामखेड (जि.अहमदनगर) येथील राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या गांडुळखत प्रकल्प व कांदा चाळ या योजनांच्या अनुदानापासून शेतकरी वंचित राहिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित ठेवण्याची कारणे काय आहेत,

(3) असल्यास, संबंधित शेतकऱ्यांना त्यांचे अनुदान वितरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्यापपर्यंत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विनय कोरे** : (1) राष्ट्रीय फलोत्पादन अभियानांतर्गत सन 2006-2007 मध्ये जामखेड, जि.अहमदनगर येथील गांडुळ खत प्रकल्पाचे 11 प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी 7 प्रस्तावांना मंजूर वार्षिक कृति आराखड्याच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली होती. सन 2007-2008 पासून गांडूळ खत प्रकल्प ही बाब सेंद्रीय शेती प्रमाणीकरणाशी निगडीत करण्यात आली असल्याने अशाच प्रकरणी मान्यता देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. कांदाचाळ ही बाब केंद्र शासनाने बँक कर्जाशी निगडीत केली आहे व प्रस्ताव त्या निकषानुसार नसल्याने अनुदानास पात्र झाले नाहीत.

(2) प्रश्न उद्‌भवत नाही.

(3) मंजूर वार्षिक कृति आराखड्यात दिलेल्या लक्षांकाप्रमाणे गांडूळ खत प्रकल्पांना अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदय, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत शेतक-यांना मोठया प्रमाणावर अनुदान दिले जाते, मदत केली जाते. त्यामध्ये कांद्याच्या चाळी, गांडूळ खत असेल किंवा फळबाग योजना असेल. ही एक चांगली योजना आहे. परंतु यासाठी ठराविक निकष आहेत. शेतक-यांकडून आलेले अर्ज या निकषांच्या आधारे फेटाळून त्यांना अनुदानापासून वंचित ठेवले जाते. आज शेतकरी मोठया प्रमाणावर फळबागाकडे वळतो आहे, फळबागाची शेती करीत आहे. जामखेड तालुक्यामध्ये केळी व पोफळीची लागवड मोठया प्रमाणावर केली जाते. पण केळी व पोफळीची लागवड शासनाच्या निकषामध्ये बसत नाही. म्हणून या पिकांचे उत्पादन घेणारे शेतकरी या निकषात कसे बसतील यादृष्टीने आपल्या स्तरावर एक बैठक बैठक घेतली जाईल काय ?

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KTG/ SBT/ KGS/

ता.प्र.क्र.40563....

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांबरोबर एक बैठक घेऊन त्यांनी सुचविल्याप्रमाणे जे काही निकष बदलावे लागतील त्यासाठी सरकार प्रयत्न करील.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सेंद्रीय खत योजना मोठया प्रमाणावर आणण्यात आली होती. सन 2006-07 मध्ये या योजनेकडे आकर्षित झाले होते. कारण पहिल्या वर्षी या योजनेंतर्गत 30 हजार रुपये अनुदान दिले जात होते. पण नंतर हे अनुदान 10 हजारावर आणले आहे. त्याशिवाय हे खत प्रमाणित करावे लागते. कोकण भागामध्ये खत प्रमाणित करण्यासाठी विलंब होतो. त्यामुळे शेतकरी या योजनेपासून वंचित होतो. म्हणून मघाशी सन्माननीय सदस्य श्री.गडाख यांनी म्हटल्याप्रमाणे बैठक घेतली जाईल काय आणि ही योजना पूर्वीप्रमाणे कार्यान्वित केली जाईल काय ?

श्री.विनय कोरे : सभापती महोदय, या योजनेचे अनुदान कमी केलेले नाही. पूर्वीप्रमाणेच 30 हजार रुपये अनुदान दिले जाते. माननीय सदस्यांनी 10 हजार रुपयांच्या अनुदानाचा उल्लेख केला आहे. सेंद्रीय शेतीचा अवलंब करण्यासाठी वेगळे अनुदान दिले जाते. गांडूळ खत निर्मितीसाठी 30 हजार रुपयांचे अनुदान दिले जाते. राष्ट्रीय फलोत्पादन अभियान अंतर्गत क्लस्टर ॲप्रोच करुन जे शेतकरी सेंद्रीय खताची निर्मिती करतात त्यात रासायनिक खताचा उपयोग न करता निर्माण केलेले आहे काय हे प्रमाणित केल्याशिवाय शेतक-याला त्याचा फायदा होत नाही. या सर्टिफिकेशनसाठी येणा-या खर्चाची तरतूद सुध्दा शासनाने केलेली आहे.

------

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**देवली (ता.मालवण, जि.सिंधुदूर्ग) येथील शेतकऱ्यांची जमिन एमआयडीसीला दिल्याबाबत**

**(३) * ३७७८८ श्री.परशुराम उपरकर , डॉ. दीपक सावंत :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील देवली या गावातील शेतकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता ७/१२ च्या उताऱ्यावर औद्योगिक विकास महामंडळ अशा प्रकारचे स्टॅम्प तलाठ्याकडून माहे नोव्हेंबर-डिसेंबर, २००७ च्या सुमारास मारले गेले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शेतकऱ्यांची जमिन औद्योगिक विकास महामंडळाच्या कोणत्या प्रकल्पासाठी घेण्यात येत आहे, त्यांचा आराखडा ग्रामस्थांना दाखविण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन व मोबदला याबाबत प्रस्ताव तयार करण्यात आला आहे काय,

(४) असल्यास, सदरहू जमिन संपादित करण्याकरिता तेथील ग्रामस्थांनी विरोध दर्शविला असताना मा.मुख्यमंत्री यांनी स्थगिती दिली होती, हे खरे आहे काय ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय, हे खरे आहे,

मालवण तालुक्यातील मौजे देवळी येथील १०४२.४०.११ हे. आ. क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील प्रकरण (६) अन्वये दिनांक ५.४.२००७ रोजी राजपत्राद्वारे अधिसूचित करण्यात आले आहे. प्रचलित पद्धतीनुसार आवश्यक प्रसिद्धी देऊन संबंधित जमीनीच्या ७/१२ उताऱ्यावर तहसिल कार्यालयामार्फत नोंद घेण्यात आली आहे.

(२) सदर क्षेत्र महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ अन्वये औद्योगिक प्रयोजनार्थ अधिसूचित करण्यात आले आहे.

(३) सदर भूसंपादन प्रक्रिया अद्याप प्राथमिक स्तरावर आहे. मोबदला देणेसंदर्भात अधिनियमातील तरतूदींच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही शासन मान्यतेने करण्यात येते. तसेच पुनर्वसनाबाबत शासनाने वेळोवेळी घेतलेले निर्णय व महामंडळाच्या धोरणानुसार आवश्यक कार्यवाही महामंडळाच्या स्तरावर करण्यात येते.

(४) हे खरे नाही.

श्री. परशुराम उपरकर : शेतक-यांच्या जमिनी घेत असताना त्या जमिनी कोणत्या प्रकल्पासाठी घेण्यात येत आहेत याची कल्पना दिलेली नाही हे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये कबूल केलेले आहे. असे असताना शेतक-यांच्या 7/12वर एमआयडीसीने शिक्के मारलेले आहेत. या जमिनीवरील शेतक-यांची घरेदारे, गोठे, आंबा बागायत क्षेत्र नष्ट होणार आहे. हा प्रकल्प रद्द करुन ही जागा एमटीडीसीला देण्याचा प्रयत्न झालेला आहे हे खरे आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : भूसंपादनाच्या प्रक्रियेतील पहिली स्टेप तेवढी करण्यात आलेली आहे. सेक्शन 6 लागू केल्यानंतर 7/12वर एमआयडीसीचा शिक्का लागणे अभिप्रेत आहे

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यात आलेली आहे. पूर्वपध्दतीप्रमाणे भूधारकांना आधी सांगण्याची पध्दत नाही. परंतु या स्पेसिफिक केसमध्ये शेतक-यांबरोबर बैठक करण्याची एमआयडीसीची तयारी आहे. ही जागा औद्योगिक उपयोगासाठी घेत आहोत. या जागेचा फायनल वापर काय करायचा हे एम.आय.डी.सी. ठरवील.

श्री. अरविंद सावंत : शासनाची कशी हडेलहप्पी चालू आहे याचे हे एक उदाहरण आहे. शेतक-यांना पूर्वसूचना न देता त्यांची जमीन संपादन करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. म्हणून या गोष्टी बेकायदेशीर झालेल्या असल्यामुळे पुन्हा शेतक-यांना सूचना देऊन त्या संदर्भात शासन शेतक-यांबरोबर चर्चा करणार आहे काय ? एमआयडीसीने कृती आराखडा तयार केलेला आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम 1961 मध्ये अशी स्पष्ट तरतूद आहे की, महामंडळाला उद्योगिकीकरणासाठी जी जागा विकसित करण्याची इच्छा असेल ती जागा संपादित करण्यासाठी सुरुवातील दोन-तीन स्टेप्स घेण्याची आवश्यकता आहे. त्या घेतल्यानंतर कलम 6 अन्वये अधिसूचना काढली जाते. जमीन अमूक अमूक कारणासाठी घ्यावयाची आहे यासंबंधी फक्त सूचना केली जाते. जमीन संपादित करण्याच्या बाबतीत अधिसूचना काढली जाते. संयुक्त मोजणी केली जाते. ही संयुक्त मोजणी संबंधित शेतकरी आणि अधिकारी मिळून केली जाते. त्यानंतर हरकती मागविल्या जातात. प्रत्येक हरकतीच्या बाबतीत निर्णय घेतला जातो. त्यानंतर दर निश्चित करण्याची प्रक्रिया होते. दर निश्चित करताना निगोशिएशन करण्याची एमआयडीसी कायद्यामध्ये तरतूद आहे. असे निगोशिएशन करुन वाढीव मोबदला दिला जाऊ शकतो. या व्यतिरिक्त लोकांना कोर्टामध्ये जाण्याची मुभा आहे. मला आपल्याला एवढेच सांगावयाचे आहे की, या प्रकरणी जी काही कार्यवाही केलेली आहे ती नियमाप्रमाणे केलेली आहे. जागेचा कृती आराखडा तयार आहे.

...नंतर श्री.गिते...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37788...

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, हा विषय सिंधुदूर्ग जिल्हयाशी निगडीत आहे. हा पर्यटन जिल्हा आहे. ज्या पध्दतीने देवली गावातील जागा घेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे, त्या पध्दतीला शेतक-यांचा विरोध आहे ही वस्तुस्थिती आहे. कुडाळ येथे सर्वात मोठी इंडस्ट्रीयल इस्टेट आहे. या इंडस्ट्रीयल इस्टेटसाठी हजारो एकर जमीन संपादित केली गेली आहे. या हजारो एकर जमिनीवरील सर्व उद्योग बंद पडलेले आहेत. कुडाळ येथील इंडस्ट्रीयलची स्थिती काय झाली आहे यासंबंधीची माहिती घ्यावयाची असेल तर मी माननीय उद्योग राज्यमंत्र्यांना कुडाळ येथे घेऊन जाण्यास तयार आहे. या इंडस्ट्रीयल इस्टेटमधील जमिनीवर आज खाजगी बंगले आणि घरे उभारली जात आहेत. देवली येथे एम.आय.डी.सी.साठी जमीन घेत आहात. तुम्ही ती जमीन घेऊ शकता. जमिनी घेण्याचे शासनाला पूर्णपणे अधिकार आहेत. शासनाच्या अधिकाराला मी चॅलेंज करु शकत नाही. आज शेतक-यांच्या 7/12 उता-यावर त्यांची नावे आहेत. त्यामुळे त्या जमिनींवर शेतक-यांचा हक्क आहे. या देवली विभागातील शेतक-यांना आपल्या जमिनीसंदर्भात विक्रीचे व्यवहार करु शकतो काय ? कुडाळ येथे इंडस्ट्रीयल इस्टेट असताना देवली तालुक्यात एम.आय.डी.सी. निर्माण करण्याची घाई शासनाला कशासाठी झाली आहे यासंबंधी माननीय मंत्री महोदय खुलासा करतील काय?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी या संदर्भातील माहिती अगोदर दिलेली आहे. परंतु पुन्हा मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना माहिती सांगतो. या ठिकाणी आपण फक्त पहिली स्टेप गाठली आहे. अजून सात ते आठ स्टेप्स आहेत. याबाबतीत अतिशय घाईगर्दी केलेली नाही हे मी नम्रपणे सांगू इच्छितो. यासंदर्भात अतिशय फास्ट प्रक्रिया करण्याचा प्रयत्न केला आहे असे बिलकूल झालेले नाही. त्यासाठी या ठिकाणी मी एक-एक टप्प्या स्पष्टपणे सांगितला होता. सभापती महोदय, आपली परवानगी असेल तर या प्रक्रियेसंदर्भातील सगळया स्टेप्सची माहिती मी सदनाच्या पटलावर ठेवतो.

डॉ.दीपक सावंत : कुडाळ येथील एम.आय.डी.सी.बंद पडलेली आहे. महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स महामंडळाची जागा त्या ठिकाणी होती. ते देखील युनीट बंद पडलेले आहे. त्या ठिकाणी एक्झीस्टींग एम.आय.डी.सी.असताना दुसरी एम.आय.डी.सी.तयार करण्याचे प्रयोजन काय आहे ?

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37788...

श्री. राणा जगजितसिंह पाटील : कुडाळ येथे एम.आय.डी.सी.मध्ये जागा उपलब्ध आहे, त्याबाबतीत निश्चित अभ्यास करता येऊ शकेल. ब-याच ठिकाणी असे होते की, उद्योगांना जागा देण्यात येते. तेथे उद्योग सुरु केले जातात. कालांतराने ते उद्योग बंद पडतात. काही जागांवर उद्योग सुरु होत नाहीत. रिझ्यूम करण्याची जी प्रोसेस आहे ती एकदा कोर्टात गेल्या नंतर ती जमीन अनेक वर्षे परत मिळूच शकत नाही. या भागात उद्योग येणार असतील, येथे मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार असेल, तर त्यात बाधा येऊ नये अशी माझी इच्छा आहे. यात काही अडचणी असतील तर त्या अडचणी समोरा समोर बसून सोडविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

**सभापती** : या ठिकाणी दोन पध्दतीचा प्रश्न उपस्थित झालेला आहे. कुडाळ येथे पूर्वी पासून असलेली इंडस्ट्रीयल इस्टेट सुरु आहे. त्यामध्ये अनेक प्रोजेक्ट बंद आहेत असेही सन्माननीय सदस्यांकडून सांगितले गेले आहे. त्याच विभागात देवली या ठिकाणी एम.आय.डी.सी.साठी जागा संपादित करण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. कुडाळ इंडस्ट्रीयल इस्टेटमध्ये जागा उपलब्ध आहे. त्यामुळे देवळी येथील जागा घेण्याची आवश्यकता नाही असे साधारणत: सदस्यांचे मत आहे. यासंदर्भात या विभागाच्या कॅबीनेट मंत्र्यांना बोलावून तुम्ही तुमच्या दालनात सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक घेऊ शकाल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : होय.

श्री. मधुकर चव्हाण : तोपर्यंत या सगळया भूसंपादनाला स्थगिती देण्यात येईल काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : यासंदर्भात सोमवारी बैठक घेतो, तोपर्यंत भूसंपदनाच्या कामास स्थगिती देण्यात येईल.

---------

यानंतर श्री. कानडे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मु.पो.मांडवगण फराटा (जि.पुणे) येथील हिराबाई दयाराम नाईक कला व वाणिज्य महाविद्यालयाबाबत**

**(४) * ३७३६२ श्री. रामनाथ मोते , श्री.राजन तेली :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मु.पो.मांडवगण फराटा (जि.पुणे) येथे गेल्या ३ वर्षापासून हिराबाई दयाराम नाईक कला व वाणिज्य महाविद्यालय या नावाने महाविद्यालय सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या शैक्षणिक वर्षात या महाविद्यालयामध्ये एकूण ८० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला असून गेले ३ वर्षे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना अन्य मान्यता प्राप्त महाविद्यालयातर्फे परिक्षेला बसवले जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या महाविद्यालयाला पुणे वा अन्य कोणत्याही विद्यापीठाची मान्यता नाही, तसेच संलग्न दिलेल्या यादीत ही या महाविद्यालयाचे नाव नाही, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच या महाविद्यालयाचे संस्थापक कोण आहेत, त्यांचे विरोधात प्राथमिक चौकशी पुणे विद्यापीठाने केली आहे, त्या चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(५) सदर प्रकरणी दोषी व्यक्तींविरुध्द काय कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

(४) नियोजित महाविद्यालयाचे संस्थापक श्री. बाळासाहेब दयाराम नाईक हे आहेत. प्राथमिक चौकशी करण्यात आली असून सदरचे महाविद्यालय अस्तित्वात नाही.

(५) यासाठी विद्यापीठामार्फत नेमण्यात आलेल्या द्विसदस्यीय समितीचा अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषी व्यक्ती आढळून आल्यास नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, पुणे विद्यापीठांतर्गत मान्यता नसलेल्या महाविद्यालयांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. शासनाने उत्तरामध्ये नमूद केले आहे की अशा प्रकारचे कोणतेही महाविद्यालय अस्तित्वात नाही. तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी अन्य महाविद्यालयामार्फत परीक्षेसाठी बसविण्यात आलेले नाहीत. सभापती महोदय, उत्तराच्या पाचव्या भागामध्ये नमूद करण्यात आले आहे की याप्रकरणाची चौकशी करण्यासाठी दोन सदस्यांची समिती नियुक्त केली होती आणि त्या समितीकडून अहवाल आल्यानंतर कारवाई केली जाईल. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, जी दोन सदस्यांची समिती नेमली होती त्या समिती सदस्यांची नांवे काय आहेत ? समितीचा अहवाल केव्हा अपेक्षित आहे ? त्याप्रमाणे पुणे विद्यापीठांतर्गत अशा प्रकारची अन्य काही अनधिकृत महाविद्यालये अस्तित्वात आहेत काय किंवा तशा प्रकारच्या तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झाल्या आहेत काय ?

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37362 पुढे सुरु....

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या विशिष्ट केसमध्ये पुणे विद्यापीठाची चौकशी समिती नेमण्यात आली होती. त्या चौकशी समितीमध्ये प्रा.गोसावी आणि श्री. संजय माळी अशा दोन व्यक्तिंचा समावेश करण्यात आला होता. समितीने प्रत्यक्षामध्ये त्याठिकाणी जाऊन चौकशी केली. चौकशी केल्यानंतर तसेच संबंधित ग्रामस्थांशी चर्चा केल्यानंतर अशा प्रकारचे कुठलेही अनधिकृत महाविद्यालय अस्तित्वात नाही, वर्तमानपत्रात आलेली बातमी खरी नाही किंवा कोणाची फसवणूक झालेली नाही अशा प्रकारे स्पष्टपणे निष्कर्ष काढले आहेत. अंतिरिम अहवाल विद्यापीठाला सादर केलेलाहोता. आज सकाळी विद्यापीठातील अधिकाऱ्यांशी बोलल्यानंतर अंतरिम अहवालच अंतिम आहे असे समजून प्रश्न निकाली काढण्यात आला आहे. अन्य ठिकाणी अनधिकृत महाविद्यालये आहेत अशा प्रकारची कोणतीही तक्रार राज्य शासनाकडे प्राप्त झालेली नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्रीमहोदयांना संस्थांच्या नांवाने पत्र दिलेले होते. पुणे शहरामध्ये अनेक संस्था मग त्या बी.एड. असो अथवा मेडिकल असो बोगस रीतीने अस्तित्वात आहेत. कोर्टाने या संस्थांवर ताशेरे सुध्दा मारले आहेत. प्रतिष्ठित माणसांच्या या संस्था आहेत. या संस्थांवर कारवाई करा म्हणून मी 3 वर्षापूर्वी पत्र दिले होते पण अजून कारवाई झाली नाही आणि मला पत्राचे उत्तर सुध्दा आले नाही. माझा प्रश्न असा आहे की, पुणे जिल्हयामध्ये अस्तित्वात असलेल्या एकूण बोगस महाविद्यालयांच्या बाबतीत ज्या तक्रारी आहेत त्याबाबतीत शासन किती दिवसात कारवाई करणार आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील :सभापती महोदय, कुलगुरु, त्याचप्रमाणे सहसंचालक(तंत्रशिक्षण) व संचालक(वैद्यकीय शिक्षण) यांना आदेश देण्यात येतील आणि अशा प्रकारची अनधिकृत महाविद्यालये किंवा मान्यता नसलेल्या संस्था त्यांच्या त्यांच्या विभागात अस्तित्वात आहेत काय याची तपासणी करावी आणि तीन महिन्यांच्या आत राज्य सरकारला अहवाल सादर करावा. त्यानंतर याबाबतीत अंतिम निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

-----

......3



SSK/ KGS/ MMP/ 13:15

**मुंबईतील "एशियन हार्ट फाऊंडेशन" या हॉस्पिटलमध्ये मराठी डॉक्टरांना कमी केल्याबाबत**

**(५) * ३७७३३ डॉ. दीपक सावंत , श्री.परशुराम उपरकर :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एशियन हार्ट फाऊंडेशन ह्या हॉस्पिटलमध्ये मराठी डॉक्टरांना आणि कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यासंबंधी कारवाई सध्या सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ.संदिप राणे व भास्कर शाह ह्या दोघा डॉक्टरांना काढून टाकले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर हॉस्पिटलांनी राज्य शासनाचे नियम धाब्यावर बसवून मनमानी कारभार सुरु केला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, किती निर्धन व दारिद्रय रेषेखालील रुग्णांना न्यायालयाच्या आदेशानुसार उपचार दिले आहेत ?

**श्री. रणजित कांबळे,डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (१), (२), (३) व (४) एशियन हार्ट फाऊंडेशन हे खाजगी रूग्णालय असून भारतीय कंपनी कायदा, १९५६ अंतर्गत कॉर्पोरेट रूग्णालय म्हणून नोंदणीकृत आहे.
डॉ.संदिप राणे व डॉ.भास्कर शाह हे दोन्ही डॉक्टर या रूग्णालयात करार पध्दतीने काम करत होते. त्यापैकी डॉ.संदिप राणे व डॉ.भास्कर शाह हे दोन्ही डॉक्टर या रूग्णालयात करार पध्दतीने काम करत होते. त्यापैकी डॉ. संदिप राणे यांनी २००७ मध्ये कराराचे नूतनीकरण केले नाही. तर डॉ.भास्कर शाह यांच्या कराराचे व्यावसायिक कारणास्तव नूतनीकरण करण्यात आले नाही. तसेच न्यायालयाच्या आदेशानुसार निर्धन व दारिद्रय रेषेखालील रूग्णांना उपचार देण्याची बाब या रूग्णालयास लागू नाही. असे या रूग्णलयाने दिनांक १३ मार्च, २००८ च्या पत्रान्वये कळविले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबईमध्ये वांद्रे(पूर्व) परिसरात एशियन हार्ट फाऊंडेशन नावाचे हार्टचे हॉस्पीटल आहे. या हॉस्पीटलमधील मराठी डॉक्टरांना जाणुनबुजून त्यांच्याविरोधात रिपोर्ट तयार करुन त्यांना रुग्णालयातून काढून टाकण्याचा प्रयत्न होत आहे. यासंदर्भात ६ जानेवारी आणि १३ जानेवारी मध्ये दोन मराठी दैनिकांमध्ये याविषयाबाबत एक आर्टीकल देखील आले होते. क्लेव्हलॅन्ड या अमेरिकेतील संस्थेचे हे हॉस्पीटल आहे. माझा प्रश्न असा आहे की, राज्य शासनाच्या आरोग्य खात्याकडे या हॉस्पीटलबाबत काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत काय ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, हे खाजगी रुग्णालय असून भारतीय कंपनी कायदा १९५६ अंतर्गत कॉर्पोरेट रुग्णालय म्हणून नोंदणीकृत आहे. एमएमआरडीएची जागा रुग्णालयाने वापरली आहे. या रुग्णालयाला कोणत्या दराने ही जागा देण्यात आली ?

नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या खाजगी रुग्णालयांवर शासनाचा अंकुश आहे का? डॉ.संदीप राणे आणि अन्य 80 डॉक्टरांच्या विरुध्द रुग्णांकडून पुरावे गोळा करुन त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आले हे खरे आहे काय?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, एशियन हार्ट फाऊंडेशन हे हॉस्पिटल कंपनी ॲक्टप्रमाणे रजिस्टर झालेले आहे व एमएमआरडीएकडून त्यांनी लिजवर जागा घेतली आहे.

श्री.नितीन गडकरी : एमएमआरडीएने डेव्हलपमेंट प्लॅनप्रमाणे जो प्लॉट दिला, तो हॉस्पिटलसाठी आरक्षित होता का?असेल तर कोणत्या दराने प्लॉट दिला होता?सवलतीच्या दरात दिला असेल तर कोणत्या अटी घालण्यात आल्या होत्या? त्या अटींचे पालन केले जात आहे का?

श्री.रणजित कांबळे : ही माहिती सध्या उपलब्ध नाही. तपासून माहिती पटलावर ठेवण्यात येईल. त्यांनी एमएमआरडीएकडून लिजवर जागा घेतली आहे.

श्री.नितीन गडकरी : हिंदुजा रुग्णालय, लिलावती रुग्णालय देखील खाजगी आहेत. परंतु गोरगरिबांना ते उपचार द्यायला तयार नाहीत. माहिती उपलब्ध नसेल तर प्रश्न राखून ठेवावा.

श्री.रणजित कांबळे : हिंदुजा रुग्णालयाला जी शासकीय जमीन देण्यात आली आहे ती अटी व शर्तीनुसार देण्यात आली आहे. एमएमआरडीएकडून लिजवर जमीन दिलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्री महोदय, काही मानद डॉक्टरांना सेवेतून कमी करण्याची घटना घडलेली आहे एवढयापुरता या प्रश्नाचा आपल्या विभागाशी संबंध आहे. एमएमआरडीएने लिजवर जागा दिली असली तरी त्यासंबंधीच्या अटी व शर्तीबाबतची माहिती या क्षणी उपलब्ध नसेल तर जरुर पटलावर ठेवावी. मी माझ्या दालनात जरुर याबाबत चर्चा करेन. यासाठी हा प्रश्न राखून ठेवण्याची मला आवश्यकता वाटत नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ह्युमन राईट कमिशनकडे तक्रार केलेली आहे. ॲंजिओप्लास्टीसाठी जे इम्पोर्टेड मटेरियल वापरले जाते ते रियूज केले जाते अशा तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाकडे देखील तक्रारी पाठविण्यात आल्या आहेत. मी आपल्यामार्फत मंत्रीमहोदयांकडे तक्रारीची प्रत सादर करतो. असे असेल तर राज्यमंत्री महोदय माहिती नाही असे कसे म्हणू शकतात. ज्यांनी तक्रार केली त्यांना बोलावून याबाबत शहानिशा करावी. या संदर्भात उच्चस्तरीय समिती स्थापन करुन चौकशी करणार आहात काय?

श्री.रणजित कांबळे : होय.

-----------------

..2..



**मु.पो. धांडेगाव (ता/जि.जालना) येथील जिल्हा परिषद शाळेतील मुख्याध्यापकाने केलेली मारहाण**

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(६) *  ४०७७६  श्री. गुरुमुख जगवानी , श्री. श्रीकांत जोशी , श्री. जगदीश गुप्ता , श्री.केशवराव मानकर :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक ३१ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास मु.पो.धांडेगाव (ता.जालना, जि.जालना) येथील जि. प. शाळेतील मुख्याध्यापक श्री. प्रल्हाद सोनुने हयांनी शाळेतील सहशिक्षक श्री. सुरजकुमार निकाळजे व मोहिते हयांना शाळा सुरु असतांना प्रचंड मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दोनपैकी एका शिक्षकावर जालना येथील सहकारी दवाखान्यामध्ये औषधोपचार करण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी पूर्ण झाली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यामध्ये दोषी आढळलेल्या व्यक्तीविरोधात कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.विजयसिंह मोहिते पाटील यांच्याकरिता** : (१) नाही.

(२) होय.

(३) होय, दोन शिक्षकांमध्ये किरकोळ स्वरुपाची धक्काबुक्की झाली असून याप्रकरणी महात्मा गांधी तंटामुक्त समितीमध्ये तडजोड करण्यात आली आहे.

(४) एका शिक्षकाची बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, उत्तर क्र.३ मध्ये म्हटले आहे की, तंटामुक्ती समितीमध्ये तडजोड करण्यात आली आहे. ही तडजोड कोणत्या स्वरुपाची होती? ज्या शिक्षकांची बदली केली त्यांचे नाव काय आहे? हे प्रकरण उद्‌भवण्याची कारणे काय आहेत?

श्री.रणजित कांबळे : या शाळेमध्ये तीन शिक्षक कार्यरत आहेत. त्यांच्यामध्ये वाद निर्माण झाला ही वस्तुस्थिती आहे. एफ.आय.आर.ची प्रत माझ्याकडे उपलब्ध असून त्यामध्ये धक्काबुक्की झाली असा उल्लेख आहे. श्री.प्रल्हाद सोनुने यांची बदली करण्यात आली आहे.

(नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**खापरखेडा (जि.नागपूर) येथील वीज प्रकल्पांतून स्थानिक बेरोजगारांना डावल्याबाबत**

**(७) * ३७६७२ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. सुरेशदादा देशमुख :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील खापरखेडा येथे अडीच हजार कोटी खर्चुन नव्याने उभारण्यात येणाऱ्या १/५०० मेगावॅट ऊर्जा प्रकल्पात स्थानिक अनुभवी कंत्राटदार तसेच सुशिक्षित, प्रशिक्षित-अप्रशिक्षित बेरोजगारांना डावलून प्रकल्प उभारणीचे खाजगी कंत्राटदार भेल कंपनी व मे. बी.जी.आर. या खाजगी कंपन्या कमी पैशात परप्रांतीय कंत्राटदार व मजूर आणून काम करवून घेत आहेत. त्यामुळे स्थानिक बेरोजगार युवकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला आहे. परिस्थिती न सुधारल्यास स्थानिक नेत्यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. हि गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, राज्यशासनाने यासंदर्भात काही ठोस कारवाई केली असल्यास त्याचा तपशील काय आहे,

(३) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१) खापरखेडा येथील १x५०० मे.वॅ. उर्जा प्रकल्पासाठी मुख्य सयंत्राच्या पुरवठ्याचे व उभारणीचे काम मे. भेल या सरकारी उपक्रमाला देण्यात आले आहे. तसेच उर्वरित प्रकल्पाच्या पुरवठ्याचे व उभारणीच्या कामाचे कंत्राट स्पर्धात्मक निविदेद्वारे आलेल्या न्युनितम बोलीदार मे.बी.जी.आर. या कंपनीला देण्यात आले आहे.मे.बी.जी.आर. व मे. भेल यांनी फक्त परप्रांतीय कंत्राटदार तसेच कामगार यांना कामे दिली आहेत हे खरे नाही. त्यांनी बहुतांश स्थानिक कंत्राटदार व स्थानिक कामगार यांना कामे दिली आहेत.

(२) महानिर्मिती कंपनीतर्फे मे.बी.जी.आर., मे.भेल. व इतर कंपन्यांना स्थानिक कंत्राटदारांना व बेरोजगार युवकांना त्यांच्या अनुभवानुसार व गुणवत्तेनुसार प्राधान्य देण्याविषयी सूचित केले असुन त्याप्रमाणे बहुतांश स्थानिकांना कामे दिलेली आहेत. प्रकल्पाचे काम पुर्ण वेगाने सुरू झाल्यावर स्थानीक कंत्राटदारांना व स्थानिक बेरोजगांराना जास्तीत जास्त कामाच्या संधी उपलब्ध होणार आहेत व याबाबतीत महानिर्मिती कंपनीस शासनाकडून कोटेकोरपणे देखरेख ठेवण्यास सांगण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : महोदय, या दोन्ही कंपन्यांना एकूण किती रकमेचे काम देण्यात आले होते ? त्यापैकी स्थानिक कंत्राटदाराला किती रकमेचे काम देण्यात आले आहे ? तसेच या ठिकाणी एकूण किती कामगार काम करतात आणि त्यापैकी स्थानिक कामगार किती आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, भेल आणि बीजीआर या कंपन्यांना अनुक्रमे 1352 कोटी आणि 928 कोटीचे काम दिलेले आहे. जी कामे येथे सुरु आहेत त्या कामामध्ये स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याच्या संदर्भात शासनाने या कंपन्यांना हे काम दिले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, या कंपनीमध्ये परप्रांतीय कामगार आणि स्थानिक कामगार किती आहेत ?

........2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : बीजीआर कंपनीतर्फे जे काम सुरु आहे त्या ठिकाणी एकूण 304 कामगार असून त्यामध्ये स्थानिक 232 कामगार आहेत आणि परप्रांतीय 72 कामगार आहेत. तसेच ज्या शहा अँड कन्स्ट्रक्शन कंपनीतर्फे बांधकाम सुरु आहे तेथे एकूण 295 कामगार असून त्यापैकी 265 स्थानिक आणि 30 परप्रांतीय कामगार आहेत. भेलच्या वतीने जे काम सुरु आहे तेथे एकूण 142 कामगार आहेत, त्यापेकी स्थानिक 99 कामगार आणि परप्रांतीय 43 कामगार काम करीत आहेत.

श्री. संजय दत्त : महोदय, स्थानिक लोकांना प्राधान्य देण्याबाबत फक्त वन टाईम इन्सिटन्स म्हणून जनरल सूचना देण्यात आल्या आहेत काय आणि त्याचे काटेकोरपणे पालन होत आहे काय ? तसेच त्यासंबंधीची देखरेख करण्यासाठी समिती नेमलेली आहे काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, स्थानिक कामगारांना काम दिले पाहिजे अशा स्पष्ट सूचना या कंपन्यांना देण्यात आल्या आहेत. फक्त जे कुशल कामगार आहेत ते स्थानिक पातळीवर उपलब्ध होत नाहीत असे कामगार स्पेसिफिक जॉबसाठी बाहेरुन येतात. तसेच यासंबंधी देखरेख ठेवण्यासंबंधीच्याही सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री. नितीन गडकरी : महोदय, माननीय मंत्री महोदयांनी स्थानिक लोकांना काम दिले पाहिजे अशी भूमिका घेतली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परंतु या ठिकाणी काही राजकीय नेते ब्लॅकमेलिंगचा प्रकार करुन तेथील लोकांना त्रास देतात. एवढेच नव्हे मारहाण देखील करतात. त्याचा कामावर परिणाम झालेला आहे. मी तर असेही ऐकले आहे की, या कंपनीच्या सेक्रेटरीने आपल्या कॅबिनेटमध्ये सुध्दा याची माहिती दिलेली आहे. म्हणून हे ब्लॅक मेलिंगचे प्रकार बंद करण्यासंबंधीची काळजी शासन घेईल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, कुठल्याही कारणांनी वीज निर्मितीच्या प्रकल्पामध्ये ब्लॅकमेलिंग करणे अथवा काम बंद पाडणे किंवा कुठल्याही प्रकारची अशांतता निर्माण करणे अशा कोणत्याही बाबी शासन खपवून घेणार नाही. यापूर्वीच्या काळात ज्या ज्या वेळी अशा घटना घडल्या त्या वेळी राज्यशासनाच्या वतीने संबंधितांच्या विरुध्द एफआयआर दाखल करण्यात आले आहेत.

---------------


PFK/ KGS/ MMP/ KTG/ पूर्वी श्री. भोगले 13:25

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर-गोंडखैरी या बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बीओटी) तत्त्वावरील रस्त्याच्या बांधकामात झालेली अनियमितता

**(८) * ३८६८६ श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख : तारांकित प्रश्न क्रमांक ३७१२४ ला दिनांक २९ नोव्हेंबर, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ लि. (सिकॉम लि.) या महामंडळात राज्य शासन सर्वात मोठे भागधारक असून राज्य शासनाचे त्यात सुमारे ४९ टक्के भाग भांडवल आहे व त्यापोटी शासनाची सुमारे रु.२९.७५ कोटी एवढी रक्कम सिकॉममध्ये भाग म्हणून गुंतविण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वर-गोंडखैरी या बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (बीओटी) तत्त्वावरील रस्त्याच्या बांधकामासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक व गुंतवणूक महामंडळ लि.(सिकॉम लि.) या महामंडळामार्फत दिनांक ११ एप्रिल, २००२ ते दिनांक ३१ ऑगस्ट, २००२ या कालावधीत मे.गुरुदत्त इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.या बांधकाम कंपनीस रु.१ कोटी ४९ लाख एवढ्या रक्कमेच्या केलेल्या कर्ज वितरणात अनियमितता झाली असल्याचे शासनाने विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्फत केलेल्या चौकशीच्या दिनांक २९ डिसेंबर, २००५ च्या अहवालानुसार स्पष्ट झालेले असल्यामुळे या कर्ज वितरणात १ कोटी ७ लाख एवढ्या रक्कमेचा गैरव्यवहार झालेला असल्यामुळे व शासन सिकॉममध्ये मोठे भागधारक आहे हे विचारात घेता शासनाचे हित जपण्यासाठी याप्रकरणी शासनाकडून कोणती कारवाई केली आहे अथवा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई करण्यात आली नसल्यास, याप्रकरणी विकास आयुक्त (उद्योग) यांच्यामार्फत शासनाने कोणत्या कारणासाठी चौकशी केली होती व शासनाचे भाग भांडवलापोटी होणारे नुकसान भरुन येण्यासाठी शासन स्तरावरुन कोणती उपाययोजना करण्यात येत आहे ?

**श्री. राणा जगजितसिंह पाटील, श्री.अशोक चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.

(२) सिकॉमने या प्रकरणी महाअधिवक्ता यांचे अभिप्राय घेतले असून त्यांनी सिकॉम ही स्वतंत्र वित्तीय संस्था आहे आणि सिकॉमच्या कर्मचाऱ्यांसंबंधात निर्णय घेण्याचे अधिकार संस्थेच्या नियमावलीतील अनुच्छेद २९ ( डब्ल्यू) अनुसार सिकॉमच्या संचालक मंडळाला आहेत असे अभिप्राय दिले आहेत.

या प्रकरणी श्री.दीपक दांडेकर यांनी सिकॉम लि. यांच्याविरूध्द नुकसानभरपाईबाबत न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(३) कळमेश्वर-गोंडखैरी या रस्त्याच्या कामावर प्रत्यक्षात किती खर्च झाला आहे याचा अहवाल सादर करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग व सिकॉम लि. यांच्या संयुक्त पाहणी पथकाने दिनांक ११.५.२००५ रोजी केलेल्या प्रकल्पस्थळाच्या प्रत्यक्ष पाहणीबाबतच्या स्वतंत्र अहवालामध्ये एकवाक्यता आढळून न आल्यामुळे त्याबाबत पुन्हा तपासणी करुन अहवाल सादर करण्याविषयी तत्कालीन विकास आयुक्त (उद्योग) यांना सूचना देण्यात आल्या होत्या.

वरील कारणास्तव शासनाचे भागभांडवलापोटी काहीही आर्थिक नुकसान झालेले नाही.

यानंतर श्री. जुन्नरे

अस्धारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 38686** .......

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी "होय" असे उत्तर दिले आहे. दुस-या प्रश्नाला उत्तर देतांना "संचालक मंडळाला या संबंधीचे अधिकार दिले आहेत", तिस-या प्रश्नात "तपासणी सुरु असून नुकसान झालेले नाही" असे म्हटले आहे त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, श्री. दीपक दांडेकरांनी कोर्टात केस केलेली आहे. उद्या सिकॉमच्या विरोधात निर्णय लागला तर त्याची नुकसान भरपाई शासनाला द्यावी लागणार आहे काय? या प्रकरणाच्या संदर्भात शासन केवळ 3 वर्षापासून अहवाल मागवत आहे त्यामुळे हे प्रकरण फायनल कधी होणार आहे ?

श्री. राणा जगजितसिंह-पाटील : सभापती महोदय, सिकॉममध्ये शासनाने शेअर होल्डींग 49 टक्के असून आपले पाच डायरेक्टर बोर्डावर आहेत. युटीआय आणि इतर जे प्रायव्हेट इनव्हेस्टर आहेत त्या सर्वांचे मिळून या बोर्डावर सहा डायरेक्टर आहेत. लॉ अॅड ज्यूडीशिअरीकडे यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी ओपिनियन दिले होते व फायनल ओपिनियन ए.जी. कडून आले होते. ए.जी. चे मत असे आहे की, " बोर्डानेच यासंदर्भात निर्णय घेणे अपेक्षित आहे, पूर्ण अॅथोरिटी बोर्डाला आहे." त्यामुळे शासनाचे आदेश मानण्याचे बोर्डावर बंधन नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभाग व सिकॉम यांच्या संयुक्त पाहणी पथकाने प्रत्यक्ष स्थळी जाऊन पाहणी केली. त्यांनी संयुक्तपणे पाहणी केली व अहवाल मात्र स्वततंत्र दिला त्यामुळे स्वतंत्रपणे अहवाल देण्याचे कारण काय तसेच दोन्ही अहवालाचे स्वरुप काय आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदय देतील काय?

श्री. राणा जगजितसिंह-पाटील : सभापती महोदय, संयुक्त पाहणी करण्याचे कारण असे होते की, लोन फॉरर्वड करतांना ज्या अटी दिल्या होत्या त्यामध्ये पीडब्ल्यूडीचे सर्टीफिकेशन घेण्यात यावे अशी एक अट होती. परंतु सिकॉमचे मत असे आहे की, पीडब्ल्यूडीचे सर्टीफिकेशन घ्यावयाचे की,एखाद्या फॉरवर्ड इंजिनिअरींग फर्मचे घ्यावयाचे हे आमचे स्वत:चे डिसीजन आहे. त्यामुळे शासनाने असे ठरवले होते की, सिकॉमचे इंजिनिअर, आर्किटेक किंवा सी.ए. आणि पीडब्ल्यूडीच्या इंजिनिअरने एकत्रित पाहणी करावी. पीडब्ल्यूडीच्या अहवालात अनियमितता आहे असे आढळून आले होते परंतु सिकॉमचे म्हणणे असे आहे की, आमच्या नियमाप्रमाणे अनियमितता कुठलीच झाली नाही, जे काही झालेले आहे ते नियमानुसार झालेले आहे.

---------------

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात विक्रीकरांसाठी इंटीग्रेटेड चेकपोस्ट सुरू करण्याबाबत**

**(९) * ३७५५६ श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दिपक सावंत :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रीकर वसूल करण्यासाठी राज्यात सध्या विक्रीकर विभागाचे चेकपोस्ट नसल्याने अशा वाहनांवर नियंत्रण ठेवणे कठीण जात आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आता महाराष्ट्रात इंटिग्रेटेड चेकपोस्ट उभारण्याचा निर्णय विक्रीकर विभागाने घेतला आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रथम किती इंटिग्रेटेड चेक पोस्ट उभारण्यात येणार आहेत,

(४) तसेच, विक्रीकर विभागाच्या संगणीकरणाची सद्य:स्थिती काय आहे ?

**डॉ. सुनील देशमुख,श्री.जयंत पाटील यांच्याकरिता** : (१) अंशत: खरे आहे.

(२) होय.

(३) राज्यातील मुख्य बंदरे, विमानतळांवरील वाहतूक संकुले व महामार्ग येथे ३० आंतरराज्य तपासणीनाके (चेकपोस्ट) उभारण्यात येत आहेत.

(४) विक्रीकर विभागाच्या संपूर्ण संगणकीकरणाकरीता संगणक आज्ञावली विकासाचे काम बहूतांशी पूर्ण झाले असून राज्यातील ३८/ जिल्हा / विभागीय कार्यालयात पुरविण्यात आलेले संगणक नेटवर्कींगद्वारे मुंबई मुख्यालयाशी जोडण्यात आले आहेत. तपासणी नाक्यांचे संगणकीकरण करण्याचे व सदर संगणकीकरण विक्रीकर विभागाच्या महाविकास या संगणक प्रणालीशी जोडण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विक्री कर वसुलीसाठी राज्यात चेकपोस्ट नसल्याने अशा वाहनांवर नियंत्रण ठेवणे कठीण जात आहे या प्रश्नाला "अंशत: खरे आहे" असे उत्तर देण्यात आलेले आहे त्यामुळे यासंदर्भात नक्की काय स्थिती आहे? चेकपोस्टची संख्या कधी वाढविण्यात येणार आहे?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मुल्यवर्धितकर प्रणाली कायदा सन 2005 मध्ये लागू झालेला आहे. मुल्यवर्धितकर कायद्यामध्ये राज्यात सीमा तपासणी नाक्याची तरतूद करण्यात आली. त्यामुळे यासंदर्भात मंत्रीमंडळाने 31.5.2006 रोजी बॉर्डर चेकपोस्ट तयार करण्याचा निर्णय घेतला .यासंदर्भातील जी.आर. 20.6.2006 रोजी निर्गमित झाला. त्यानंतर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सलटन्सी अपॉईंटमेंटसाठी एमएसआरडीसीला नोडल एजन्सी म्हणून मान्यता दिली. त्यांनी परिवहन खाते, एक्साईज डिपार्टमेंट यांच्या कोऑर्डीनेशनने बॉर्डर चेकपोस्ट तयार करण्याचा निर्णय झाला. आजच्या घडीला लास्ट डेट फॉर फायलींग दि टेंडर 19.5.2008 ही लास्ट डेट आहे. 30 सप्टेंबर पर्यंत बीओटी ऑपरेटर निश्चित केले जाणार आहेत.

....3



SGJ/ KGS/ KTG/ MMP/ प्रथम श्री. खर्चे...... 13:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37556 .......

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, चेक पोस्टमुळे महाराष्ट्राचे आर्थिक उत्पन्न दीड पट होऊ शकते. सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. जयंत पाटील यांनी मला 5 वर्षापूर्वी सभागृहात आश्वासन दिले होते की, शासन ताबडतोब चेकपोस्ट तयार करेल. मी नाफत्याचा घोटाळा बाहेर काढला होता. या लोकांनी बंदरातून नाफत्‌ा उचलला आणि सरळ ऑक्ट्रॉय पोस्टवरुन बाहेर निघून गेले आणि ठिकठिकाणी पेट्रोलमध्ये नाफत्‌ा मिक्स केला. नाफत्यामध्ये 4000 कोटी रुपयांचा घोटाळा झाला होता. तसेच मुंबईहून इम्पोर्ट होणा-या लाकडावरील टॅक्स न भरता चालला गेला. नाशिक - गुजरातच्या सीमेवर फार गंभीर परिस्थिती आहे. गुजरातचे उत्पन्न 125 कोटी रुपये आहे आणि महाराष्ट्राचे उत्पन्न 36 कोटी रुपये आहे. तेथील आर.टी.ओ. पोस्टींगवाल्यांनी एका आमदाराला बदली करण्यासाठी एक एअर कंडीशन गाडी आणि 25 लाख रुपये ॲडव्हान्स सुध्दा दिले होते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37556...श्री.नितीन गडकरी..

या कर्मचाऱ्यांच्या बदलीसाठी मोठया प्रमाणावर पैसे दिले जातात. त्या नंतर मोठ मोठे लोक बदलीसाठी शिफारशी करीत असतात. तेव्हा हे सगळे चेक पोस्टस होऊ नयेत या दृष्टीने देखील प्रयत्न होत असतात. सगळे चेक पोस्टस ताबडतोब सुरु करण्यात आले पाहिजेत. टेन्डर काढून किती दिवसाच्या आत सगळया ठिकाणी चेक पोस्टस कार्यान्वित होतील ? मी मध्यंतरी एक प्रेझेन्टेशन पाहिले होते त्यात असे दाखविण्यात आले होते की, संपूर्ण ट्रकचे एक्सरेमुळे स्कॅनिग केले जाते आणि आतमध्ये काय ठेवलेले आहे हे समजू शकते. सिक्युरिटीच्या दृष्टीने आणि टॅक्स वसूल करण्याच्या दृष्टीने अद्ययावत यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. युरोपमध्ये अशा प्रकारची अत्याधुनिक यंत्रणा बसविलेली आहे. अशी यंत्रणा जर आपण बी.ओ.टी.तत्वावर बसवली तर त्याचा उपयोग होईल. त्यामुळे महानगरपालिकेच्या ऑक्ट्राय नाक्यावर ट्रक्सच्या ज्या रांगा लागतात त्या लागणार नाहीत आणि महानगरपालिकेचे उत्पन्नसुध्दा वाढेल. या चेक पोस्टवर अशा प्रकारची अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात येणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : दिनांक 13.3.2008 ला या विषयाच्या संदर्भात मी एक्साईज विभाग,एम.एस.आर.डी.सी आणि वाहतूक विभाग यांचे को ऑर्डिनेशन केले होते आणि त्या विभागाच्या अधिका-यांना एक टाईम बाऊन्ड प्रोग्राम आखून दिला होता . त्या नुसार दिनांक 19 मे 2008 पर्यंत या कामाचे टेन्डर सादर येणार आहे. त्यानतर तीन महिन्याच्या आत बी.ओ.टी. ऑपरेटर निश्चित करण्यात येणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आता ज्या अत्याधुनिक यंत्रेचा उल्लेख केला होता त्या संबंधी टेन्डरमध्ये स्पेसिफिकेशन करण्यात आले आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : इलेक्क्ट्रॉनिक वे ब्रीज, व्हिडिओ कॅमेरा,कॉम्प्युटर, लोकल एरिया नेटवर्क, राज्य स्तरीय नेटवर्क, वाहन तपासणी करणारी यंत्रणा व वायू प्रदूषण तपासणारी यंत्रणा, स्कॅनर्स इत्यादी त्या ठिकाणी बसविण्यात येणार आहेत.ट्रक्सच्या आतमध्ये कोणता माल आहे हे पाहण्यासाठी परदेशामध्ये जी अत्याधुनिक यंत्रे वापरली जाते ते आपण वापरणार आहोत.

श्री दिवाकर रावते : इलेक्ट्रॉनिक स्कॅनर्स आहे ना ?

डॉ.सुनील देशमुख : होय



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37556...

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, अनेक ठिकाणी चेक पोस्टस उभे करण्यात आलेले आहेत. त्यापैकी सगळी इक्युपमेन्टस बसवलेली चेक पोस्टस किती आहेत ? आणि ज्या ठिकाणी ही इक्युपमेन्टस बसवावयाची राहिली आहेत तेथे इक्युपमेन्ट बसविण्याचे काम किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सध्या अशा प्रकारचे एकही चेक पोस्ट सुरु झालेले नाही. दिनांक 30 सप्टेंबर 2008 पर्यत बी.ओ.टी. ऑपरेटर नेमण्यात येणार आहेत. या संदर्भात एम.एस.आर.डी.सी. को ऑर्डिनेट करणार आहे. आजच्या घडीला इंटीग्रेटेड चेक पोस्ट महाराष्ट्रात कोठेही अस्तित्वात नाही .30 सप्टेबर 2008 पर्यंत बी.ओ.टी.ऑपरेटर नेमण्यात येणार आहे त्यांना आपण .18 महिन्याचा कालावधी देणार असून त्या कालावधीमध्ये त्यांनी 30 चेक पोस्टस उभे करुन आपल्याकडे हस्तांतरित करावयाची आहे.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुळगाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या वीज उपकेंद्रासाठी घेतलेल्या जमिनीचा मोबदला न दिल्याबाबत**

**(१०) * ३८४०३ श्री.भास्कर जाधव , श्री.अरुण गुजराथी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , डॉ. वसंत पवार :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मूळ गाव (ता.खेड, जि.रत्नागिरी) येथील ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या वीज उपकेंद्रासाठी घेतलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापी संबंधित शेतकऱ्यांना देण्यात आला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमिनी केव्हा घेण्यात आल्या व त्यांना जमिनीचा मोबदला अद्यापही न देण्याची कारणे काय आहेत,

(३) संबंधित शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री.दिलीप वळसे पाटील** : (१) हे खरे आहे.

(२) जमिनीचा आगाऊ ताबा दि. ०९.०९.२००४ रोजी घेण्यात आला. सदर जमिनीची भूसंपादनाची प्रक्रिया विशेष भूसंपादन अधिकारी (१) महाराष्ट्र शासन रत्नागिरी यांचे कार्यालयामार्फत चालू आहे. परंतू अजुनही अंतिम निवाडा सदर कार्यालयाकडून जाहिर झाला नसल्यामुळे व जमिनीची अंतिम किंमत न कळविल्यामुळे शेतकऱ्यांना जमिनीचा मोबदला देण्यात आलेला नाही. तथापि सदर जमिनीची अंदाजित २/३ रक्कम रुपये ७०,०००/- (रुपये सत्तर हजार मात्र) विशेष भूसंपादन अधिकारी (१) रत्नागिरी यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांच्या कार्यालयात दि. ०८.०८.२००५ रोजी जमा करण्यात आली आहे.

(३) विशेष भूसंपादन अधिकारी (१) रत्नागिरी यांचेकडून सदर जमिनीचे भूसंपादन प्रकरण जिल्हा नगर रचनाकार रत्नागिरी यांचेकडे प्रारुप निवाडा मंजूर होण्यासाठी दि. ०१.०३.२००८ अन्वये पाठविण्यात आले आहे. प्रारुप निवाडा मंजूर झाल्यावर मा.जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांचेकडे ज्ञापन सादर करुन अंतिम निवाडा जाहिर करण्यात येईल व त्यानंतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात येईल.

श्री.अरुण गुजराथी सभापती महोदय, या वीज उपकेन्द्राच्या कामासाठी जमिनीचा अगाऊ ताबा दिनांक 9.9.2004 रोजी घेण्यात आला होता. त्यानंतर ज्यांची जमीन घेण्यात आली होती त्यांना दिनांक 8 ऑगस्ट 2005 रोजी 2/3 रक्कम त्यांना देण्यात आली होती. 1/3 रक्कम अजून द्यावयाची आहे. हा प्रश्न विचारल्यानंतर प्रारुप निवाडा मंजूर करण्यासाठी नगर रचनाकारांकडे पाठविण्यात आलेला आहे . पैसे देण्याच्या बाबतीत बराच विलंब झा्लेला आहे तेव्हा संबंधितांना त्वरित रक्कम अदा करण्यात येईल काय आणि यासाठी कालावधी निश्चित करणे आवश्यक आहे तेव्हा हा कालावधी निश्चित करण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4..

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, या प्रकरणात जमिनीचा मोबदला देण्यामध्ये निश्चितपणे विलंब झालेला आहे. या जमिनीचा अगाऊ ताबा घेण्यात आला होता आणि जमिनीचा ताबा घेतल्यानंतर तेथे सब स्टेशनचे काम पूर्ण झाले होते आणि दिनांक 8 सप्टेंबर 2005 ला ते सुरु झाले होते. कॉस्टींग फायनल करण्याच्या संदर्भात महसूल विभागाकडून कार्यवाही करणे अभिप्रेत आहे . त्यासाठी महावितरण कंपनीने 70 हजार रुपये डिपॉझिट म्हणून भरले होते परंतु या सबंधी नगर रचनाकारांकडून अंतिम निर्णय घेण्यास विलंब झालेला आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वळसे-पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 38403 ....

आता या संदर्भात त्यांनी प्रारूप निवाडा होण्यासाठी पाठविले आहे. तेव्हा या प्रकरणी ताबडतोबीने म्हणजे 3 ते 6 महिन्यांच्या आत या संबंधित खातेदारांना जी काही रक्कम आहे ती देण्यासाठी पुढाकार घेऊन कारवाई केली जाईल.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या ठिकाणी या प्रकरणी 3 ते 6 महिन्यांच्या आत कारवाई करणार म्हणून मंत्री महोदयांनी सांगितले आहे. तेव्हा मी या ठिकाणी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखांप्रमाणे नेमका प्रश्न विचारतो की, ही कारवाई एका महिन्यात आपण पूर्ण करणार का ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, ही कार्यवाही महसूल विभागाच्या वतीने करावयाची आहे. त्यामुळेच मी जास्तीत जास्त कालावधी येथे सांगितला आहे. परंतु कमीत कमी कालावधीत हे काम करण्यासाठी महावितरण अधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील आणि संबंधितांना ही रक्कम मिळण्याच्यादृष्टीने प्रयत्न केले जातील.

***

...... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उस्मानाबाद जिल्ह्यात 0 ते 18 वयोगटात बालकांना अपंगत्व आल्याबाबत**

**(11) * 37826 श्री.विक्रम काळे, श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती उषाताई दराडे** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) उस्मानाबाद जिल्ह्यात 0 ते 18 वयोगटातील बालकांच्या प्राथमिक आरोग्य तपासणीत 2159 बालकांना विविध प्रकारचे अपंगत्व असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, शासनाने याबाबत काही उपाययोजना केल्या आहेत काय,
(3) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे ?

**श्री. रणजित कांबळे, डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.
एकूण 5880 मुलांपैकी 2851 मुलांमध्ये आरोग्य चिकित्साची गरज आढळून आलेली आहे. त्यापैकी 358 मुलांना औषधोपचार करण्यात आले. उर्वरित 2493 मुलांना संदर्भसेवेसाठी पाठविण्यात आले आहे.
(2) होय.
(3) जिल्हा रुग्णालय उस्मानाबाद येथे संदर्भीत केलेल्या या 2493 मुलांची तपासणी केल्यानंतर आजारानुसार उपचार करण्यात येईल.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या सगळ्या बालकांची जी तपासणी केलेली आहे ती सर्वशिक्षा अभियाना अंतर्गत केलेली आहे काय ? तसेच उर्वरित 2493 मुलांची तपासणी आता पूर्ण झालेली आहे काय आणि त्यांच्यावर उपचार केले आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : होय.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, या ठिकाणी लेखी उत्तरात शेवटी म्हटले आहे की, मुलांची तपासणी केल्यानंतर आजारानुसार त्यांच्यावर उपचार करण्यात येतील. आणि आता येथे उपप्रश्नाला उत्तर देताना माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, उर्वरित 2493 मुलांची तपासणी पूर्ण झालेली आहे, तर यामध्ये त्यांना नेमके काय म्हणावयाचे आहे ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले होते की, 358 विद्यार्थ्यांची तपासणी होऊन त्यांच्यावर उपचार झाले काय ? त्याला मी 'होय' असे उत्तर दिले. कारण एकूण 5880 मुलांपैकी 2851 मुलांमध्ये आरोग्य तपासणीची गरज आढळून आली होती त्यापैकी 358 मुलांना औषधोपचार करण्यात येऊन त्यांना घरी पाठविले आहे. उरलेल्या 2493 विद्यार्थी असे आहेत की त्यांना गंभीर आजार आहेत. त्या सगळ्यांना एकत्रित करून जुलै ते

...... एसएस 3 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 37826 ....

ऑक्टोबर पर्यंतच्या कालावधीत त्यांच्यावर उपचार चालू करणार असून प्रा.आ.केंद्राच्या पातळीवर या मुलांच्या तपासण्या होऊन उपचार सुरू केले आहेत, आवश्यक तेथे जिल्हा हॉस्पिटलमध्येही त्यांचे उपचार होणार आहेत.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा मूळ प्रश्न उस्मानाबाद जिल्ह्यातील 0 ते 18 वयोगटातील बालकांना अपंगत्व आल्याबद्दल विचारण्यात आलेला आहे. तेथील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी केली असता 2159 बालकांना विविध प्रकारचे अपंगत्व असल्याचे निदर्शनास आले आहे काय असा प्रश्न विचारला असता त्याला 'हे खरे नाही' असे उत्तर दिलेले आहे. तर मग त्या ठिकाणी अपंगत्व आलेली बालके आपणास आढळूनच आली नाहीत का ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, एकूण 5880 विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी झाली त्यात 2493 बालकांमध्ये अपंगत्व आढळून आले आणि त्यांना पुढील संदर्भसेवेसाठी प्रा.आ.केंद्राच्या पातळीवर उपचार करण्यासाठी पाठविले आहेत. बाकी ज्यांना किरकोळ स्वरूपाचे अपंगत्व असल्याचे आढळून आले, उदा. ऑर्थोपेडिक, स्पीच प्रॉब्लेम, रातांधळेपणा वगैरे आजार आहेत त्यात काही मल्टीपल अपंगत्व आहे. अशा मुलांना जिल्हा हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार घेण्यासाठी पाठविले आहे.

( यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37826..

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, सन 2007-08 च्या एकॉनॉमिक सर्व्हेमध्ये आरोग्य चिकित्सेकरिता ज्या गंभीर आजारांचा समावेश करण्यात आला होता. त्यावर पूर्ण खर्च करण्यात आला काय? दुसरी विनंती अशी आहे की, जे विद्यार्थी गंभीर स्वरुपामध्ये आजारी आहेत. त्या प्रत्येक विद्यार्थीनिहाय आजाराचे स्वरुप काय आहे, आणि त्याकरिता कोणती उपाय योजना करण्यात आली आहे याबाबतची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, होय.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**वासाडी (जि.बुलढाणा) व आनंदनगर (जि.पुणे) येथील विजेच्या तारांचा धक्का लागून विद्यार्थी मृत्यूमुखी पडल्याबाबत**

**(१२) * ४०९२५ श्री. सदाशिवराव पोळ , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री.अरुण गुजराथी :** सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यातील वासाडी गावांत जानेवारी, २००८ मध्ये वीजेच्या तारांचा धक्का लागून दोन मुले मृत्यूमुखी पडली व एक मुलगा गंभीर जखमी झाला, तसेच आनंद नगर (जि.पुणे) येथे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा वीजेच्या तारांना चिकटल्याने होरपळून मृत्यू झाल्याची घटना दिनांक ३ फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्याअनुषंगाने पुढे काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उपरोक्त घटनांमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या मृतांच्या नातेवाईकांना व गंभीर जखमी झालेल्यांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच आनंद नगर (जि.पुणे) येथे वीजेच्या तारा भूमिगत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) उपरोक्त प्रकरणी, अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे पाटील :** (१) होय, हे खरे आहे. दिनांक १२.०१.२००८ रोजी मौजे वसाडी ता.संग्रामपूर जि.बुलढाणा येथे उच्च दाब ११ केव्ही टुनकी वाहिनीच्या तुटलेल्या विजेच्या तारांच्या संपर्कात येऊन चि.रोशन प्यारासिंग झामरा, वय ६ वर्ष व कु. अनिता प्यारासिंग झामरा, वय - ४ वर्षे हे गंभीररित्या जखमी झाले व उपचारादरम्यान सामान्य रुग्णालय, अकोला येथे त्यांचा मृत्यू झाला व कु. झिंगली उर्फ सुनिता कैलास गडरिया, वय ५ वर्षे ही मुलगी गंभीररित्या जखमी झाली. दिनांक ०३.०२.२००८ रोजी श्री.विशाल सिताराम शिंदे या विद्यार्थ्यास रा.आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे येथे २२ केव्ही पानशेत फिडरवर विद्युत प्राणांतिक अपघात झाला आहे.

(२) होय, या प्रकरणी बुलढाणा येथे सक्षम चौकशी अधिकाऱ्याने चौकशी केली असून चौकशी अंती श्री.एस.एस.शेळके, सहाय्यक तारमार्गतंत्री / तंत्रज्ञ प्रथमदर्शनी जबाबदार आढळून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. ४०९२५....**

आल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही महावितरण कंपनीचे नियमानुसार सुरु करण्यात आलेली आहे. आनंदनगर, पुणे येथील अपघात संदर्भात विद्युत निरीक्षक, पुणे यांचेकडून दिनांक ०४/०२/२००८ रोजी प्रत्यक्ष घटनेची चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी अंती महावितरण कंपनीचे कोणीही अधिकारी व कर्मचारी या अपघातास जबाबदार नसल्याचे आढळून आले.

(३) महावितरण कंपनीचे नियमानुसार बुलढाणा येथील घटनेमध्ये मृत्यूमुखी पडलेल्या मृतांचे नातेवाईकांना प्रत्येकी रुपये १ लाख रुपयांची मदत दिनांक १४.०१.२००८ रोजी धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे आणि जखमी झालेली कुमारी सुनिता कैलास गडरिया हीस तातडीची मदत म्हणून रुपये २ हजार अदा करण्यात आले आहेत, व अपंगत्वाचे बाबतीत आवश्यक कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात येईल. आनंदनगर, पुणे येथील अपघातात मृत्यूमुखी पडलेले श्री.विशाल सिताराम शिंदे यांच्या वारसदारास तातडीची मदत म्हणून प्रथम रुपये १० हजार देण्यात आले होते व वारसासंदर्भातील कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाईची रक्कम रुपये ९०,०००/- दिनांक ०५.०३.२००८ रोजी धनादेशाद्वारे अदा करण्यात आली. आनंदनगर भागामध्ये ज्या ठिकाणी अपघात झाला त्या परिसरात २२ के.व्ही. पानशेत वाहिनी मुख्य रस्त्यापासून सुमारे ७०० मिटर अंतरावर आहे, तसेच सदर वाहिनी जेथून जाते तेथे रहदारीचा अथवा वहिवाटीचा रस्ता नसल्यामुळे या ठिकाणाची वाहिनी भुमिगत करण्याची सध्या आवश्यकता भासत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये म्हटले आहे की, "कु. झिंगली ऊर्फ सुनिता कैलास गडरिया, वय वर्षे ५ ही मुलगी गंभीररित्या जखमी झाली, तिला तातडीची मदत म्हणून रुपये २ हजार अदा करण्यात आले". परंतु या मुलीला थोडे जास्त पैसे दिले असते तर या मुलीवर अधिक चांगल्या प्रकारे वैद्यकीय उपचार होऊ शकले असते. ही घटना होऊन तीन महिने झाले तरी अजूनपर्यंत त्यांना पैसे दिले नाहीत. ते केव्हां देण्यात येतील?

श्री. दिलीप वळसे पाटील :सभापती महोदय, नियमाप्रमाणे तातडीची मदत म्हणून जेवढे पैसे देऊ शकतो तेवढे दिले आहेत. आणि कागदपत्रांची प्रतिपूर्ती झाल्यानंतर उर्वरित रक्कम देण्यात येईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे. आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील १२ प्रश्न आणि एक राखून ठेवलेला प्रश्न मिळून १३ तारांकित प्रश्नांवर एक तासामध्ये चर्चा झालेली आहे. याबद्दल सर्व माननीय सदस्यांना धन्यवाद देतो. हीच परंपरा राखण्याचा आपण प्रयत्न करु या.

श्री. दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांचा पहिला प्रश्न आज जास्त वेळ न चालल्यामुळे पुढील प्रश्न झाले.

श्री. दिवाकर रावते : माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांच्या पहिल्याच प्रश्नाला आपण "होय" असे म्हटले.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी नीट उत्तर दिल्यामुळे तो प्रश्न जास्त वेळ चालला नाही हे खरे आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.:** शोक प्रस्ताव

**मु.शी.:** श्री. भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी, माजी विधान परिषद सदस्य यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री. भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते"

(प्रेस : याठिकाणी सोबत जोडलेला परिचय छापण्यात यावा.)

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:50

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटीलसाहेब यांनी कै.भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी, माजी विधान परिषद सदस्य यांच्या दु:खद निधनाबद्दल त्यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यासाठी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्याला समर्थन देण्यासाठी, अनुमोदन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, 1958 मधील काळ असा होता की, तो अगदी सुरवाती-सुरुवातीचा काळ होता आणि त्यावेळी कै.सुर्यवंशी हे विधानसभा सदस्यांव्दारा विधान परिषदेवर निवडून आले होते. कदाचित त्या काळामध्ये आम्ही शिक्षण घेत असणार. त्यामुळे कै.सुर्यवंशी यांच्याबद्दल माझ्याकडे फारशी माहिती नसली तरी सुध्दा सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी माहिती दिल्याप्रमाणे 1942 च्या आंदोलनात क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील प्रतिसरकारमध्ये ते सामील झाले होते. गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ व महाराष्ट्र-कर्नाटक सीमा लढयातही त्यांचा सक्रीय सहभाग होता. अशा प्रकारे विविध लढयामध्ये, आंदोलनामध्ये भाग घेणारे एक कार्यकर्ते होते हे लक्षात येते. अशा प्रकारे विविध चळवळीमध्ये भाग घेणाऱ्या कार्यकत्याचे दु:खद निधन झाले आहे. त्याबद्दल सभागृहाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी जी शोकसंवेदना व्यक्त केली आहे, त्याला मी पाठिंबा देतो आणि माझ्यावतीने तसेच भारतीय जनता पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-----

. . . .2 यु-2

श्री.मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी कै.भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी, माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, ते ज्या कालखंडातील होते, तो जर पाहिला तर तो संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळचा होता. 1955-56 पासून संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरु झाली आणि 1960 मध्ये महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. ते दिवस हे संपूर्णपणे चळवळीच्या वातावरणाने मंतरलेले होते. अर्थात स्व.सुर्यवंशी यांच्याशी आमचा फारसा परिचय नव्हता, त्यामुळे मला त्यांच्याविषयी जास्त माहिती नाही. परंतु सदनाचे नेते सन्माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी सदनाला जी काही माहिती दिली आहे, त्या आधारावरुन एकच दिसून येते की, अशी एक व्यक्ती जी स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी झाली होती. संयुक्त महाराष्ट्राच्या लढयामध्ये, बेळगाव-कारवारच्या लढया मध्ये देखील ज्यांचा सहभाग होता अशी व्यक्ती दिवंगत झाली आहे. त्यांना याठिकाणी जी श्रध्दांजली वाहण्यात आली आहे, त्यामध्ये आम्ही आणि आमचा पक्ष सहभागी आहोत. मी त्यांना विनम्रपणे श्रध्दांजली अर्पण करतो आणि याठिकाणी मांडण्यात आलेल्या शोक प्रस्तावाला पाठिंबा देतो.

-----

. . . .2 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी कै.भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्या बद्दल सहभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, 1950 ते 1960 या दशकामध्ये शेतकरी कामगार पक्षाची एक मोठी टीम आक्रमकपणाने या राज्याच्या सामाजिक आणि राजकीय जीवनामध्ये काम करीत होती. कै.केशवराव जेधे, शंकरराव मोरे यांच्यापासून ते दाभाडी प्रबंधांनंतर साधारणपणे 1950 ते 1960 या कालखंडा मध्ये कै.भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी हे शेतकरी कामगार पक्षामध्ये अतिशय आक्रमक नेते म्हणून कार्यरत होते. स्वाभाविकपणे त्या पक्षाच्या धोरणप्रमाणेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये, गोवा मुक्ती आंदोलनामध्ये त्यांनी आक्रमक अशा प्रकारचा सहभाग सुध्दा घेतलेला होता. मी मनापासून त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

-----

. . . .2 यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, या सभागृहाच्या नेत्यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याबाबत माझ्या संवेदना व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यातील डाव्या चळवळीतील आणि शेतकरी कामगार पक्षाच्या चळवळीतील ज्या धुरिणांनी यामध्ये मोठे योगदान दिले, त्यामध्ये कै.सुर्यवंशी हे एक होते. ही सगळी मंडळी राजकारणामध्ये असूनही सत्तेच्या लाभापासून सातत्याने दूर राहिली. पण वेगवेगळया चळवळीमध्ये त्याग करण्यासाठी मात्र सतत पुढे राहिली. म्हणून त्यांचा येथे आवर्जून उल्लेख केला पाहिजे. मी त्यांच्याबद्दल लोकभारती पक्षातर्फे संवेदना व्यक्त करतो. त्याचबरोबर काल देखील आम्ही मांडले होते की, आदरणीय बाबूराव बागुल यांच्या दुःखद निधनाबद्दल देखील सदनामध्ये शोक प्रस्ताव येणे आवश्यक होते. त्याबाबतीत सुध्दा शासनाने विचार करावा एवढेच मी सांगू इच्छितो. धन्यवाद.

----

. . . .2 यु-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे नेते माननीय श्री.आर.आर.पाटील यांनी या सभागृहाचे सन्माननीय सदस्य दिवंगत कै.भगवानराव ज्ञानदेव सुर्यवंशी यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे, त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे 1950 ते 1960 या दरम्यान या राज्यात शेतकरी कामगार पक्ष आणि शेतकरी संघटना अतिशय मजबूत होती. याठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे अशी कितीतरी मंडळी नंतर शेतकरी कामगार पक्षामध्ये काम करीत होती. या राज्यामध्ये असे कितीतरी जिल्हे होते की, जे शेतकरी संघटनेच्या प्राबल्याखाली राजकारणामध्ये कार्यरत होते. मग नगर असेल, उस्मानाबाद असेल, नांदेड असेल, असे बरेच जिल्हे होते. जे शेतकरी संघटनेच्या प्राबल्याखाली सक्षमपणे राजकारणात काम करीत होते. त्या नंतरच्या कालावधीमध्ये या राज्याचे पहिले मुख्यमंत्री माननीय कै.यशवंतराव चव्हाण यांच्या कार्यपध्दतीमुळे कित्येक मंडळी काँग्रेस पक्षामध्ये काम करु लागली.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.बरवड . . . .

श्री. गुरुनाथ कुलकर्णी .....

त्यामध्ये काही दलित नेते तसेच शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते सुध्दा होते. त्या चळवळीतील कै. भगवानराव ज्ञानदेव सूर्यवंशी हे एक व्यक्तिमत्व होते. त्यांनी या सदनामध्ये काम केले. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते श्री. आर. आर. पाटील यांनी जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याबद्दल मी माझ्या सहवेदना व्यक्त करतो. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी एक सूचना केलेली आहे. मी सभागृहाला आणि सभागृहाच्या नेत्यांना विनंती करतो की, दलित साहित्य चळवळीचे प्रणेते श्री. बाबुराव बागुल यांचेही दु:खद निधन झालेले आहे. त्यांच्या संदर्भात असाच दुखवट्याचा प्रस्ताव जर सभागृहामध्ये आणला आणि त्याला सभागृहाने मान्यता दिली तर या सभागृहात उचित काम केल्यासारखे होईल. सभागृहाच्या नेत्यांनी सभागृहासमोर जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याबद्दल मी माझ्या सहवेदना व्यक्त करतो.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

**सभापती** : सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील यांनी कै. भगवानराव ज्ञानदेव सूर्यवंशी यांच्या दु:खद निधनाबद्दल जो दुखवटयाचा प्रस्ताव मांडलेला आहे त्या प्रस्तावाला माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सहमती दिलेली आहे तसेच गट नेत्यांनी सुध्दा आपापल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत.

स्व. भगवानराव ज्ञानदेव सूर्यवंशी यांचा आणि माझा व्यक्तिगत जवळजवळ 40 वर्षाचा परिचय होता. एक अत्यंत प्रखर विचाराचे, शेतकरी आणि कष्टकरी यांच्याकरिता संपूर्ण आयुष्य वेचणारे, कामगार क्षेत्रामध्ये सातत्याने कामगारांची बाजू कणखरपणे मांडण्याचा प्रयत्न करण्याच्या दृष्टीने सातत्याने संघर्ष करणारे आणि शेतकरी कामगार पक्षाची जी स्थापना झाली त्या स्थापनेमध्ये प्रथमपासून सहभाग घेणारे ते नेते होते. मघाशी सांगितल्याप्रमाणे त्यांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये अत्यंत कणखरतेने आणि जबरदस्त धेयवादाने प्रेरित होऊन संयुक्त महाराष्ट्र कसा होईल यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्याचे 20 मार्च, 2008 रोजी निधन झालेले आहे. कामगार क्षेत्रामध्ये काम करणारा, कष्टकऱ्यांची बाजू सातत्याने कणखरपणे उचलून धरणारा फार मोठा विचार समाजातून गेलेला आहे. ते या सदनाचे सदस्य होते. 1958 पासून सहा वर्षाकरिता त्यांनी या ठिकाणी काम केलेले आहे. अशा या नेत्याला मी श्रध्दांजली वाहतो. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल. मी सभागृहाची बैठक पंधरा मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 1.59 ते 2.14 वाजेपर्यंत स्थगित झाली )

----

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**सभापती** : शुक्रवारी औचित्याचे मुद्दे घेतले जातात. त्यानुसार आज काही सन्माननीय सदस्यांना औचित्याचे मुद्दे मांडावयाचे आहेत. माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने माझा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात हत्तींचा धुमाकूळ चालू आहे. त्यामध्ये 8 जणांचा बळी गेलेला आहे. हत्तीच्या हल्ल्यात अनेकजण जखमी झालेले आहेत. या हल्ल्यामुळे बागायतदारांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहे. सभापती महोदय, हत्तीने माणसाला मारले तर शासन त्यासाठी 2 लाख रुपयांची मदत करते. विधानसभेमध्ये वाघाने एखाद्याला मारले तर 10 लाख रुपये देण्याचे शासनाने जाहीर केलेले आहे. 2 लाख आणि 10 लाख या रकमेमध्ये तफावत असली तरी दोन्ही ठिकाणी मनुष्यहानीच होते. मनुष्यहानीला समान न्याय मिळण्यासाठी हत्तीने असो वा वाघाने मारले तरी 10 लाखाची मदत देण्याची शासनाने तरतूद करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

नंतर श्री.शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MMP/ SBT/ पूर्वी श्री. खंदारे 14:15

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याला मला समर्थन द्यावयाचे आहे. वाघाले मारले तर 10 लाख रु. देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. मुंबईतील आरे कॉलनी आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान या परिसरामध्ये राहाणा-या अनेक आदिवासींचे वाघाच्या हल्ल्यात बळी गेलेले आहेत. त्याबाबतीत किती आर्थिक मदत करण्यात आली याची माहिती सभागृहासमोर येणे आवश्यक आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा दुसरा मुद्दा असा आहे की, सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक भागामध्ये पंतप्रधान ग्राम सडक योजनेअंतर्गत जी कामे झालेली आहेत ती कामे अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाची झालेली आहेत. अशा प्रकारची अपूर्ण आणि निकृष्ट दर्जाची कामे ज्या ठेकेदारांनी केलेली आहेत त्याच ठेकेदारांना पुन्हा या वर्षी कामे दिलेली आहेत. हा ठेका देत असताना जिल्हा परिषद अकौण्ट कोड प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. लखोटा क्रमांक 1 उघडल्यानंतर लखोटा क्रमांक 2 उघडावयास पाहिजे. हे दोन्ही एकत्रितपणे उघडवयास पाहिजेत. परंतु असे न होता काही लखोटे हे 15 दिवसानंतर उघडले गेलेले आहेत. या प्रक्रियेमध्ये अनियमितता झालेली आहे. तेव्हा ठेका देण्याच्या प्रक्रियेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी फेर निविदा काढल्या जाव्यात यादृष्टीने मी हा औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, वाढत्या शहरीकरणामुळे जी वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस वाढत आहे त्यासंदर्भात मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. ठाणे शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे, बांधकामे वाढत आहेत आणि वाहनांची ये-जा सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढत आहे. जकात नाक्यावरील नोंदी नुसार जवळ जवळ 20 हजार वाहनांची ठाणे शहरामध्ये ये-जा होत असते. ठाणे शहरातील रस्त्यांच्या महामार्गावर, आतील मार्गावर, सर्व्हिस रोडवर निरनिराळी वाहने, ट्रक उभे केलेले असतात. अशा वाहनांसाठी टर्मिनल उभारणे आवश्यक असून ट्रक टर्मिनल करण्याचा ठराव ठाणे महानगरपालिकेने शासनाकडे दिलेला आहे. परंतु शासनाने तो ठराव मंजूर केलेला नाही. या ट्रक टर्मिनल मुळे ठाणे शहराच्या विकास योजनेला कोणतीही बाधा पोहोचणार नाही अशा प्रकारे ठाणे महानगरपालिकेने ठराव दिलेला आहे. तेव्हा हे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर...)

ट्रक टर्मिनल करण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

सभापती महोदय, याच अनुषंगाने माझा दुसरा औचित्याचा मुद्दा असा आहे की, वाढत्या लोकसंख्येबरोबर ठाणे शहरामध्ये अधिकृत तसेच अनधिकृत बांधकामे होत आहेत. त्या संदर्भात समित्या नेमलेल्या आहेत. त्या समितीमध्ये हिअरिंग होते. या ठाणे शहरामध्ये अवैध नळजोडण्या फार मोठ्या प्रमाणावर आहेत. या अवैध नळजोडण्या आणि पाणी टंचाई यामुळे ठाणे शहरातील लोकांना पाण्याच्या बाबतीत फार त्रास सहन करावा लागत आहे. त्याचप्रमाणे ठाणे शहरामध्ये बांधकाम करण्यास परवानगी देत असताना त्या बांधकामासाठी लागणारे पाणी कोठून आणणार हे सुध्दा संबंधिताला विचारले जात नाही. त्यामुळे ठाणे महानगरपालिकेच्या पाण्याचा वापर हा या बांधकामासाठी केला जातो. बांधकामासाठी टँकरने पाणी आणले जाते. ठाणे शहरातील लोकांना पुरेसे पाणी मिळत नसताना ठाणे महानगरपालिकेच्या पाण्याचा वापर हा टँकरद्वारे बांधकामास होत आहे, त्यास आळा बसावा म्हणून मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधित आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, या सदनामध्ये 6-7 महिन्यापूर्वी लक्षवेधीच्या माध्यमातून विमुक्त जाती, भटक्या जमातीच्या अधिका-यांच्या बढतीचा मुद्दा मी उपसिथत केला होता. त्यांच्या पदोन्नतीला हायकोर्टाच्या निर्णयामुळे स्थगिती दिलेली होती आणि त्यामुळे 30 हजार अधिका-यांच्या बदल्या वर्षभर थांबलेल्या होत्या. आता सुप्रीम कोर्टाने ही स्थगिती उठविलेली आहे. सुप्रिम कोर्टामध्ये श्री. फली नरीमन, इंदिरा जयसिंग यांनी आमच्या बाजूने चांगल्याप्रकारे युक्तिवाद केला. सभागृहामध्ये मी या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला होता आणि त्याबाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. ही माहिती या सदनाला व्हावी म्हणून मी औचित्याच्या माध्यमातून हा विषय सदनापुढे मांडलेला आहे.

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

...नंतर श्री. गिते...

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई आणि मुंबईतील दक्षिण विभागात जुन्या उपकर प्राप्त 100 वर्षाच्या वारसा असलेल्या अनेक इमारती आहेत. आज या इमारती धारातीर्थी पडण्या सारख्या आहेत. अनेक उपकर प्राप्त इमारती दुरुस्तींच्या प्रतिक्षेत आहेत. या उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या संदर्भात शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करुन दिला जात नसल्यामुळे त्या इमारतींच्या दुरुस्तीची कामे आमदार निधीतून केली जातात. बऱ्याचशा इमारतीतील रहिवाशी वर्गणी गोळा करुन आपापल्या इमारती दुरुस्त करुन घेण्याचा प्रयत्न करतात. सदर उपकर प्राप्त इमारती गिरगाव ते लालबाग या विभागात मोठया प्रमाणात आहेत. पावसाळयात एक-दोन इमारती कोसळून मोठया प्रमाणात मनुष्यहानी आणि वित्तहानी होते. तरी देखील अशा इमारतींच्या दुरुस्तीच्या बाबतीत शासन विशेष निधी का उपलब्ध करुन देत नाही ? येणाऱ्या पावसाळयात जुन्या उपकर प्राप्त इमारती कोसळू नये, त्यात वित्तहानी व मनुष्यहानी होऊ नये यादृष्टीने त्या इमारतींची दुरुस्ती तात्काळ व्हावी म्हणून शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशा प्रकारची विनंती मी औचित्याच्या मुद्याव्दारे करीत आहे.

सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याव्दारे दुसरी एक महत्वाची बाब मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मुंबई शहराच्या विकासाच्या संदर्भात शासकीय बैठका घेतल्या जातात. काल देखील मुंबई शहराच्या विकासाच्या अनुषंगाने बैठक घेतली गेली. धारावीच्या विकासासंदर्भात बैठक घेतली गेली. परंतु या बैठकींना विधान परिषद सदस्यांना बोलाविले गेले नाही. विधान परिषद सदस्यांना सापत्न वागणूक दिली जाते. मुंबई शहरात एम.एम.आर.डी.ए.चे कार्यक्रम होतात, त्या कार्यक्रमांना देखील मुंबईतील विधान परिषद सदस्यांना बोलविले जात नाही. नुकताच एम.एम.आर.डी.ए.चा एक कार्यक्रम झाला त्याचे निमंत्रण मला दुसऱ्या दिवशी सायंकाळी मिळाले. यासंदर्भात मी आयुक्तांकडे विचारणा केली. परंतु त्यांनी दिलगिरी व्यक्त करण्याची कृतज्ञता दाखविली नाही. विधान परिषदेच्या सदस्यांना अशा प्रकारची वागणूक देणे हे बरोबर नाही. याबाबतीत आपण संबंधितांना आदेश द्यावेत अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय महत्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. अशाच प्रकारचा मुद्दा श्री. गोविंदरावजी आदिक मंत्री असताना देखील उपस्थित झाला होता. त्यावेळी त्यांनी या सभागृहात अतिशय

...2...

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ SBT/ MMP/

श्री. पांडुरंग फुंडकर .....

स्पष्टपणे आश्वासन दिले होते. प्रत्येक डी.पी.डी.सी.च्या क्षेत्रात जे विधान परिषद सदस्य असतील त्या क्षेत्रात शासकीय कार्यक्रम असेल तर त्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये विधान परिषद सदस्यांची नावे टाकली गेली पाहिजेत. यासंबंधी तत्कालीन पीठासीन अधिकारी आणि संबंधित मंत्र्यांनी सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश सुध्दा दिले आहेत. परंतु त्या आदेशाची अंमलबजावणी होत नाही. डी.पी.डी.सी.च्या क्षेत्रात असलेल्या विधान परिषद सदस्यांना शासकीय कार्यक्रमात निमंत्रित केले जात नाही, त्या सदस्यांची नावे निमंत्रण पत्रिकेमध्ये टाकली जात नाहीत. या बाबतीत मी विशेषाधिकारभंगाची सूचना आपणास सादर केलेली आहे. ती सूचना अजून सभागृहाच्या पटलावर आलेली नाही. विधान परिषद सदस्यांना अशा पध्दतीने वागणूक देणे योग्य नाही. म्हणून यासंबंधी आपण शासनाला स्पष्टपणे आदेश दिले पाहिजेत. विधान परिषद सदस्यांना शासकीय कामकाजात बोलाविले जात नाही, त्यांचे नाव निमंत्रणपत्रिकेत टाकले जात नाही, त्यांना अपमानित केले जाते ही गंभीर गोष्ट आहे. हा प्रकार जाणीवपूर्वक चाललेला आहे असे माझे स्पष्ट मत झाले आहे. विधान परिषद सदस्यांना कशा प्रकारे अपमानित केले जाते यासंबंधीची मी अनेक उदाहरणे आपणास सांगू शकतो. यापुढे असे प्रकार होऊ नयेत म्हणून आपण शासनास तातडीने निर्देश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मुंबईत शासकीय कार्यक्रम होतात तसेच शासनाच्या बैठका होतात त्यावेळी विधान परिषद सदस्यांना बोलावले जात नाही अशा प्रकारचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला आहे. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत आणि मी मुंबई शहराचे प्रतिनिधित्व करीत आहे. परंतु आम्हा दोघांना मुंबईतील शासकीय कार्यक्रमांना बोलावले जात नाही, तसेच शासकीय बैठकांना देखील बोलावले जात नाही, हा आमचा अवमान नसून तो या सभागृहाचा देखील अवमान होतो. तसेच आमच्या मतदार संघाचा अवमान होतो. मुंबईत रेल्वेचा कार्यक्रम झाला, एम.एम.आर.डी.ए.चा कार्यक्रम झाला, त्याचे निमंत्रण मला दिले गेले नाही. ही गंभीर गोष्ट आहे. याबाबतीत आपण शासनाला निर्देश द्यावेत अशी माझी देखील आपणास विनंती आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ SBT/ 14:25

**सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे जो विषय उपस्थित केला आहे तसेच त्या मुद्याशी संबंधित घटनेचे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जे वर्णन केले आहे ती बाब मी अत्यंत गांभीर्याने घेतलेली आहे. याबाबतीत कोणत्या पध्दतीने मी निर्णय घेणार आहे हे नंतर सांगेन. परंतु हा विषय मी गांभीर्याने घेतलेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी याबाबतीत ज्या सूचना केलेल्या आहेत त्याअनुषंगाने माननीय विरोधी पक्षनेते, गटनेते, संसदीय कामकाज मंत्री तसेच सभागृहाचे नेते यांची एक संयुक्त बैठक सोमवारी 4.30 ते 5.00 च्या दरम्यान मी घेईन. सन्माननीय सदस्यांची प्रतिष्ठा राखणे हे शासनाचे काम आहे. शासनाच्या डोळयासमोर लोकप्रतिनिधी एवढाच विषय असला पाहिजे. तो खालच्या सभागृहाचा आहे किंवा वरच्या सभागृहाचा आहे असा फरक होता कामा नये. एखाद्या शासकीय कार्यक्रमाला जर सन्माननीय विधानपरिषद सदस्यांना योग्य पध्दतीने बोलाविले जात नसेल तर तो या सदनाचा अवमान आहे असे मी जरुर मानेन. मी यापूर्वीच सांगितल्याप्रमाणे सोमवारी दुपारी 4.30 ते 5.00 च्या दरम्यान यासंदर्भात बैठक बोलाविणार आहे. त्याचप्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांना देखील मी पत्र लिहिणार आहे. लोकप्रतिनिधींची प्रतिष्ठा चांगल्या पध्दतीने राखली जाईल यासाठी मी जरुर प्रयत्न करीन.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांनी एक औचित्याचा मुद्दा मांडण्यास परवानगी मागितली आहे. त्यांनी तो मांडावा.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा असा हा विषय आहे. महाराष्ट्रात आरोग्य सेवेत 72000 वैद्यकीय अधिकारी काम करीत आहेत. त्यापैकी 3500 वैद्यकीय अधिकारी अस्थायी स्वरुपात काम करीत आहेत. मागील 7 वर्षापासून या अस्थायी स्वरुपातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सेवेत नियमित प्रयत्न सुरु आहेत. याबाबतीत 24 ऑगस्ट 2007 रोजी आरोग्यमंत्र्याबरोबर झालेल्या बैठकीत प्रशासनाकडून अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना 4 महिन्यात स्थायी करण्याबाबत लेखी आश्वासन देण्यात आले होते. परंतु या आश्वासनाची पूर्तता अद्यापपर्यंत झालेली नाही. त्यामुळे 27 मार्च 2008 पासून वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आंदोलनाची भूमिका घेतलेली आहे. अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्थायी करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय करणे आवश्यक आहे. या आंदोलनामध्ये खऱ्या अर्थाने रुग्णांचे हाल होणार आहेत. महाराष्ट्रातील आरोग्य सेवेशी निगडीत असलेल्या या प्रश्नाकडे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांनी एक औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी मागितलेली आहे. त्यांनी तो मांडावा.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. राज्यातील शासकीय आणि निमशासकीय शाळांमधून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाते. राज्यामध्ये जेवढया काही शाळा/महाविद्यालये आहेत त्यातील 90 टक्के शाळा खाजगी संस्थेमार्फत चालविल्या जातात. त्यामध्ये इयत्ता पहिली ते 10वी आणि 12 वी पर्यंत तसेच कनिष्ठ महाविद्यालयातून महाविद्यालयीन शिक्षणदिले जाते. राज्यामध्ये मोठया प्रमाणात 11 वी आणि 12 चे वर्ग कनिष्ठ महाविद्यालयाला जोडले आहेत. राज्यातील शिक्षकांना चौथा आणि पाचवा वेतनआयोग लागू करण्यात आला. सहावा वेतन आयोग येत आहे. परंतु कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना अनेक वर्षांची मागणी असतानाही पाचवा वेतन आयोग 1.1.96 पासूनच्या फरकाने लागू करण्यात आला नाही. शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापकांना पाचव्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी 1.1.96 पासून देऊन न्याय द्यावा अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

1857 च्या स्वातंत्र्य संग्रामाला 150 वर्षे पूर्ण झाली आहेत. त्यापासून प्रेरणा घेऊन अनेक क्रांतीकारक पुढे निर्माण झाले. भगतसिंग, हुतात्मा राजगुरु, सुखदेव यांनी सशस्त्र उठाव करुन क्रांती केली आणि ब्रिटिश साम्राज्याला हादरा दिला. त्यापैकी हुतात्मा राजगुरु यांच्यावरील चित्रपटाच्या अनुदानासंबंधी आजच्या 'महाराष्ट्र टाईम्स' या वृत्तपत्रामध्ये देखील बातमी छापून आली आहे. श्री.मिलिंद मोहाडीकर यांनी स्वत:चे पैसे खर्च करुन हुतात्मा राजगुरु यांच्यावरील चित्रपटाची निर्मिती केली. हुतात्मा राजगुरु हे महाराष्ट्रातील क्रांतीकारक होते. या चित्रपटाचे अनुदान परस्पर वेगळ्याच निर्मात्याने लाटण्याचा प्रकार झाला, त्याबद्दल कोणतीही कारवाई झाली नाही. 'सॅल्यूट टू 7.33 हुतात्मा राजगुरु' हा चित्रपट श्री.मोहाडीकर यांनी स्वखर्चाने तयार केला. पण तो डीजी बिटावर चित्रीत केल्याने तो ब्लोअप करुन प्रदर्शित करण्यासाठी 25 लाख रुपयांचा खर्च येणार आहे. शासनाने श्री.सुभाष घई यांना चित्रपट व रंगभूमी विकास महामंडळाची फिल्म सिटीतील 30 कोटी रुपयांची जमीन 3 कोटी रुपयांना दिली. परंतु तरुणांना प्रेरणा देणाऱ्या आणि स्वातंत्र्याची लढाई करताना हौतात्म्य पत्करलेल्या, महाराष्ट्राचे भूषण असलेल्या राजगुरुंच्या जीवनावर चित्रपट काढणाऱ्याला 25 लाख रुपये मिळण्यासाठी आझाद मैदानावर उपोषण करावे लागते ही गोष्ट लांछनास्पद आहे. मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो की, श्री.मिलिंद मोहाडीकर यांना 25 लाख रुपये शासनाकडून त्वरित देण्यात यावेत.

**सभापती** : सन्माननीय शालेय शिक्षणमंत्री महोदयांनी या मुद्याची नोंद घ्यावी. हुतात्मा राजगुरु हे महाराष्ट्राचे क्रांतीकारक होते. त्या अनुषंगाने जे काही शक्य आहे ते शासनाने करावे अशी अपवाद म्हणून मी सूचना करीत आहे.

प्रा.वसंत पुरके : नोंद घेण्यात आली आहे.

---------------

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, या सदनामध्ये झुणका भाकर केंद्रांविषयी औचित्याच्या मुद्याद्वारे 2-3 वेळा विषय मांडला गेला होता. त्यावेळी पीठासीन अधिकारी म्हणून आपण स्वत: तर इतर वेळी माननीय उपसभापती आसनस्थ होते. आपणही या संदर्भात निदेश दिले होते. असे ठरले होते की, माननीय मुख्यमंत्री आणि इतर संबंधितांशी बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. अद्यापपर्यंत निर्णय झालेला नाही. मला अशी माहिती मिळाली आहे की, येत्या 9 एप्रिल रोजी मुंबईमध्ये अशी जी झुणका भाकर केंद्रे आहेत ती तोडण्याचे आदेश निर्गमित झाले आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, या संदर्भात आपण आपल्या दालनामध्ये संबंधितांची बैठक आयोजित करुन निर्णय घेतला तर योग्य होईल. झुणका भाकर केंद्र चालविणाऱ्या गरीब लोकांना संरक्षण देणे हे या सदनाचे काम आहे. त्यासाठी आपण सहानुभूतीने या विषयाकडे पहावे अशी माझी विनंती आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेले वर्षभर हा प्रश्न या सभागृहात वारंवार उपस्थित झालेला आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये सुध्दा या प्रश्नावर चर्चा झाली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले होते की, हा विषय कॅबिनेटपुढे आणून ताबडतोब निर्णय केला जाईल. मागील नागपूर अधिवेशनाच्या काळात कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये हा विषय चर्चेला आला असता माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की, ताबडतोब हा विषय कॅबिनेटपुढे आणून निर्णय करु.

सभापती महोदय, आज अवस्था अशी आहे की, काही जिल्हयातील झुणका भाकर केंद्रे तोडली गेली तर काही जिल्हयातील केंद्रे सुरु आहेत. माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्या जिल्हयात अजूनही झुणका भाकर केंद्रे ज्यांच्या ताब्यात होती त्यांच्याच ताब्यात आहेत आणि ती सुरु आहेत. मात्र विदर्भातील अनेक झुणका भाकर केंद्रे बंद करण्यात आली. मी या संदर्भात अर्ध्यातासाची सूचना दिली होती, परंतु काही कारणामुळे त्यावर चर्चा होऊ शकली नाही. हा प्रश्न सुटला पाहिजे. या महाराष्ट्रातील अनेक गोरगरीब लोकांचे कुटुंब या केंद्रापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर चालते. आपणही या संदर्भात निदेश दिले होते. माननीय उपसभापतींनी देखील निदेश दिले होते. तरी देखील वर्ष-दीड वर्ष या प्रश्नासंबंधी निर्णय होत नाही. म्हणून माझी नम्र विनंती

..3..



SGB/ SBT/ MMP/ 14:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

आहे की, पुढील आठवड्यात या प्रश्नासंबंधी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री, माननीय गटनेते यांची आपल्या दालनात बैठक आयोजित करुन निर्णय घेण्यात यावा. संबंधित जिल्हाधिकारी कोणाचेही ऐकावयास तयार नसतात. मनात येईल त्यांचे केंद्र तोडतात, मनात येईल त्यांचे केंद्र तसेच ठेवतात अशी परिस्थिती आहे. म्हणून आपण या प्रश्नाबाबत पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील गोरगरिबांच्या दृष्टीने एक चांगला निर्णय घ्यावा अशी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : माननीय सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी हा प्रश्न सातत्याने सभागृहात मांडला होता म्हणून मी त्यांना औचित्याच्या मुद्याद्वारे हा प्रश्न उपस्थित करण्याची विनंती केली होती. मला जे पत्र प्राप्त झाले आहे ते मी वाचून दाखवितो.

नामदार श्री.शिवाजीराव देशमुख यांनी गरिबांची जागा काढून घेऊ नये, या योजनेबद्दल फेरविचार करावा असे सांगितले. केंद्र चालकांना आपला किती आधार वाटतो हे या पत्रातून बोलत आहे. मंत्रीमहोदयांचे असे म्हणणे आहे की, जिल्हाधिकाऱ्यांना अशा जागा जप्त करण्याचे कोणतेही आदेश दिलेले नाहीत.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ......

हिवाळी अधिवेशनात या प्रश्नासंबंधी चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे आपल्या निदेशाच्या अनुषंगाने येथे सांगण्यात आले होते. परंतु त्यासंबंधीचा शासन निर्णय अद्यापही होत नाही. अशी झुणका भाकर केंद्रे ताब्यात घेऊ नये असे असताना जिल्हाधिकाऱ्यांनी मात्र राज्यात ठिकठिकाणी कराड, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, मुंबई, पुणे, बीड अशा अनेक ठिकाणच्या झुणका भाकर केंद्रांना सील लावले. महाराष्ट्रातील काही केंद्रचालकांनी त्यासाठी न्यायालयात धाव घेण्याचा प्रयत्न केला. परंतु जी केंद्रे सील करण्यात आली आहेत, त्यांचे दरवाजे, खिडक्या, पाईपलाईन तोडून पळविण्याचे प्रकार होत आहेत, अशी सर्व परिस्थिती राज्यात निर्माण झालेली आहे. आपल्या दालनात एक बैठक झाली होती. म्हणून यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांशी यासंबधी चर्चा करुन निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करतो. मागील अधिवेशनात माननीय अन्न व नागरी पुरवठा मंत्री श्री. सुनील तटकरे यांनी सांगितले की, काहीही झाले तरी एक महिन्याच्या आत झुणका भाकर केंद्रांसंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करतो. तसेच माननीय मुख्यमंत्री यांनी देखील सभागृहात हजर असताना याबाबत सहानुभूतीने विचार करु असे सांगितले होते. फक्त या योजनेत काही बदल करण्याची गरज आहे काय हे पहावे आणि त्यानुसार बदल करण्याची त्यांची तयारी आहे. यासाठी ज्यांनी हे पत्र मला पाठविले आहे त्यांना सभापती म्हणून आपला आधार वाटतो आणि तो आधार सार्थकी ठरावा व तात्काळ निर्णय घेण्यासाठी आपण आपली सर्व प्रतिष्ठा वापरावी अशी या गोरगरीब व छोटया उद्योजकांच्या वतीने मी विनंती करतो.

**सभापती** : आपणा सर्वांची ही सातत्याची आणि आग्रहाची मागणी आहे. कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये माननीय विरोधी पक्षनेते, माननीय श्री. मधुकर सरपोतदार आणि अन्य सर्वांनीच माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर याबाबत चर्चा केली आणि तातडीने ही बैठक व्हावी असा प्रयत्न केला. जसा आपला आग्रह आहे तसाच माझाही आग्रह आहे. म्हणून पुढच्या आठवड्यात सोमवार, मंगळवार अथवा बुधवार या तीन दिवसात मी माननीय मुख्यमंत्र्यांची वेळ मागवून घेतो आणि या प्रश्नाच्या बाबतीत अंतिम टप्प्यात निर्णय कसा होईल यादृष्टीने आपण चर्चा करु.

......2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, मला आपल्या परवानगीने औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. तो म्हणजे काल मी अर्थसंकल्पावर मालवणीतून भाषण केले आणि त्यात एक महत्वाचा मुद्दा राहून गेला. तो मुद्दा असा आहे की, आपली मालवणी भाषा साता-समुद्रापलिकडे नेणारे कै.मच्छिंद्र कांबळी यांनी मालवणी भाषेक भरपूर योगदान दिलेला आसा. मालवणी लोकांची असलेली संस्कृती ही लोकांपर्यंत मांडण्यासाठी नाटकांतून प्रयत्न केलेले आसा, त्यांचो गाव रेवंडी, ता. मालवण असा. त्या ठिकाणी शासनान त्यांच्या नावान एक सांस्कृतिक भवन उभारण्याचे प्रयत्न करावेत म्हणजे कोकणी माणसाचा सन्मान केल्यासारखा आमका वाटात, अशा प्रकारचा मुद्दा मी या माध्यमातून मांडून शासनाला विनंती करतो.

श्री. अनिल देशमुख : महोदय, यासंबंधीची नोंद घेण्यात येईल.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला मुद्दा मांडावा.

श्री. जितेंद्र आव्हाड : महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनच्या वतीने अनेक वर्षांपासून आपल्या राज्यात वेगवेगळया स्पर्धा आयोजित केल्या जातात. त्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध खेळाडू सहभागी होतात. शासनाचे धोरण आहे की, आंतरराष्ट्रीय स्तरावर आणि राज्य स्तरावर इंडियन ऑलिम्पिक असोशिएशनने मान्यता दिलेल्या काही खेळांमधील खेळाडुंना शैक्षणिक सवलती सुध्दा देण्यात येतात आणि काही विशिष्ट गुण त्यासाठी देण्यात येतात. मी स्वत: क्रीडा संचालक श्री. लक्ष्मीकांत देशमुख यांच्याशी संपर्क साधन त्यांना विनंती केली की, इंडियन ऑलिम्पिक असोशिएशनच्या मान्यतेप्रमाणे बेस बॉल या खेळाला सुध्दा आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता आहे. परंतु ज्याप्रमाणे इतर मान्यताप्राप्त खेळांमध्ये भाग घेणाऱ्या खेळाडुंना शैक्षणिक सवलती मिळतात त्याच धर्तीवर बेस बॉलच्या खेळाडुंना मात्र अशा शैक्षणिक सवलती न देता त्यांना वंचित ठेवण्यात येत आहे. महोदय, आपल्यामार्फत मला शासनाला विनंती करावयाची आहे की, आपण शैक्षणिक धोरणात क्रीडा प्रेमींना सहाय्यभूत ठरणारी भूमिका घेतो, त्यांना प्रोत्साहन देण्याची भूमिका घेतो परंतु बेस बॉलच्या खेळाडूंना मात्र अशा सवलतींपासून वंचित ठेवण्यात येते. म्हणून इतर खेळाडुंना जेवढया सोई-सवलती राज्य स्तरावर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपण देतो त्याप्रमाणेच बेस बॉलच्या खेळाडुंना सुध्दा दहावी, बारावी आणि सीईटीच्या परीक्षेच्या गुणांमध्ये सवलत द्यावी, जेणेकरुन त्यांना ह्या परीक्षा चांगल्या प्रकारे उत्तीर्ण होण्यास मदत होईल. तसेच हे शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी शासनाने यासंबंधीचे आदेश ताबडतोब दिले तर बेस बॉलच्या खेळाडुंना सुध्दा त्या निर्णयाचा फायदा होईल. कारण आपण खो-खो, कबड्डी आणि क्रिकेटसाठी राज्यस्तर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळणाऱ्या खेळाडुंना अशा सवलती देतो. म्हणून बेसबॉलच्या खेळाडुंना सुध्दा शैक्षणिक सवलती देण्याबाबत विचार करावा, अशी माझी विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : महोदय, यासंबंधीची दखल घेण्यात येईल.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांच्या मुद्याला अनुसरुनच माझा औचित्याचा मुद्दा आहे. देशामध्ये कबड्डीला निम्न दर्जा दिला जात असतांना सुध्दा महाराष्ट्रात कबड्डीला चांगले स्थान आहे. महाराष्ट्रामध्ये कबड्डीच्या अनेक ठिकाणी स्पर्धा भरवल्या जात असतात. आमदार कोटयातून सुध्दा कबड्डीच्या स्पर्धेचे आयोजन केले जात असते. त्यामुळे विदर्भातील कबड्डी प्लेअर पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, खानदेश तसेच इतर ठिकाणीही चषक खेळण्यासाठी जात असतात. तसेच इतर भागातील कबड्डी प्लेअर विदर्भामध्ये चषक खेळण्यासाठी येत असतात परंतु ज्यावेळेस विदर्भातील कबड्डी प्लेअर इतर ठिकाणी चषक खेळण्यासाठी जातात तेव्हा त्यांना एस.टी.च्या प्रवासात सवलत मिळत नाही परंतु इतर ठिकाणच्या म्हणजे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण या ठिकाणचे प्लेअर इतरत्र चषक खेळण्यासाठी जातात तेव्हा त्यांना एस.टी. च्या प्रवासात सवलत मिळत असते परंतु एस.टी. प्रवासाची सवलत विदर्भातील कबड्डी प्लेअर्संना मिळत नाही त्यामुळे इतर भागाला जशी एस.टी.प्रवासात सवलत मिळते तशीच सवलत विदर्भातील कबड्डी प्लेअर्संना मिळावी यासाठी माननीय मंत्रीमहोदयांनी यासंदर्भात घोषणा करावी अशी माझी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती आहे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या प्रश्नांची गांभीर्याने दखल घेतली जाईल. भेदाभेद होणार नाही याची काळजी घेतली जाईल. सर्वांना समान वागणूक देण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

...2

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आज सकाळी मी टी.व्ही. वरील बातम्या पाहत असतांना मला असे दिसून आले की, मुंबईतील गिरगाव येथे "गितांजली" इमारत आहे या इमारतीच्या बाजूला जो टॉवर उभा आहे त्याची भिंत खचली आहे त्या भितीला तडे गेले आहेत त्यामुळे या इमारतीमध्ये राहणा-या रहिवाश्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. ही इमारत केव्हाही कोसळेल अशी स्थिती आहे. ही इमारत कोसळली तर फार मोठी जीवित हानी होऊ शकेल. आज शुक्रवार असल्यामुळे सभागृहाचे कामकाज लवकर संपणार आहेत त्यामुळे माननीय मंत्रीमहोदयांना आपण या ठिकाणी भेट देण्यास पाठविले तर या लोकांना त्याचा आधार मिळेल व त्यासंदर्भात तातडीने निर्णय घेता येईल. त्यामुळेच मी हा विषय औचित्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे.

**सभापती** :या ठिकाणच्या इमारतीला सन्माननीय राज्यमंत्र्यांनी जरुर भेट द्यावी.

ॲड. प्रितमकुमार शेगावकर : होय.

----------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : यानंतर सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. परळी वैजनाथ औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील 250 मेगावॅट क्षमतेच्या संचात जनरेटजवळील बुशिंग लिक होऊन दिनांक 25 मार्च, 2008 रोजी हायड्रोजन वायुची गळती होणे, तेथे काम करणारे अभियंते व कामगार यांनी तत्परता दाखवून संच बंद केल्याने होणारी मोठी वित्तीय व मनुष्यहानी टळणे, औष्णिक केंद्राच्या इतिहासात पहिल्यांदाच घडलेली घटना, दरम्यानच्या काळात अशा प्रकारच्या घटनेमुळे संच अनेक दिवस बंद ठेवावा लागण्याची शक्यता, त्यामुळे वीज निर्मितीवर होणारा परिणाम तसेच वीज केंद्रातील अधिका-यांच्या भ्रष्ट कारभारामुळे व निकृष्ट दर्जाच्या कामामुळे हा प्रकार घडण्याचा कामगारांकडून होत असलेले आरोप, याबाबत चौकशी करुन सदर प्रकारास जबाबदार असलेल्या अधिका-यांवर केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 14.45

श्रीमती उषा दराडे ..

मागच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मी हा मुद्दा उपस्थित केला होता. परळी येथील औष्णिक विद्युत केन्द्रातून जी राख निर्माण होते त्यामुळे त्या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत असतो. माननीय उर्जा मंत्री श्री.दिलीप वळसे - पाटील यांनी परळीला भेट देऊन सबंधित अधिकाऱ्यांची एक बैठकसुध्दा मध्यंतरी घेतली आणि या कामाची चौकशी केली होती. ते गेल्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा हा संच बंद पडला होता. या औष्णिक विद्युत केन्द्रात हायड्रोजन वायूची गळती सुरु झाली होती या ठिकाणी काम करणारे जे कर्मचारी आणि अधिकारी होते त्यांनी तत्परता दाखवून ही वायूगळती थांबवली नसती तर हा संच उद्ध्वस्त झाला असता, तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे निवासस्थान उद्ध्वस्त झाले असते. इतकेच नव्हे तर दोन किलोमिटर्स अंतरापर्यंतचा संपूर्ण परिसर उद्ध्वस्त झाला असता. या ठिकाणी असलेल्या संचाची दुरुस्ती आणि देखभालीचे काम टेन्डर काढून कशा पध्दतीने केले जाते याकडे राज्य शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे एवढेच मला या सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे.

सभापती महोदय, उद्‌गीर येथे दूध भुकटी कारखाना बंद असून हा कारखाना सुरु करण्यासाठी शासनाने दोन कोटी रुपये मंजूर केले होते, परंतु मंजूर झालेला निधी कार्यालयीन दिरंगाईमुळे व्यपगत झाला असून अजूनही तो निधी या कारखान्याला मिळालेला नाही. त्या मुळे या कारखान्यातील कामगार तसेच बसून आहेत, या कर्मचाऱ्यांच्या पगारावर 28 कोटी रुपये खर्च होत आहे. या कारखान्यासाठी शासनाने दोन कोटी रुपये मंजूर केलेले आहेत परंतु मार्च महिना संपत असल्यामुळे हा निधी मिळणार नाही अशी शक्यता निर्माण झालेली झालेली आहे. हा निधी लवकर मिळावा याकडे शासनाने लक्ष् दिले पाहिजे. त्या भागातील सन्माननीय आमदार श्री.चंद्रशेखर भोसले यांनी दिनांक 26.3.2008 पासून आमरण उपोषण सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. उदगीर येथील .दूध भुकटी कारखान्यासाठी याच वर्षी 2 कोटी रुपये मंजूर करावेत अशी माझी शासनाला विनंती आहे.

**सभागृहाच्या कामकाजासंबंधी**

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, आज सकाळी अर्थसंकल्पावरील चर्चेसाठी एक तासाची वेळ वाढवून देण्यात आली होती. त्यामुळे आजच्या कामकाजाच्या वेळापत्रकामध्ये फरक करावा लागणार आहे. त्यामुळे मी असे ठरविले आहे की, नियम 93 च्या सूचनावरील जी निवेदने आलेली आहेत ती आज न घेता सोमवारी घेण्यात यावीत. त्याप्रमाणे ही निवेदने मी सोमवारी घेईन.

श्री.पांडुरंग फुंडकर : कालच्या नियम 93 च्या सूचनांची काही निवेदने राहिलेली आहेत.

**सभापती** : नियम 93 ची जी निवेदने राहिलेली आहेत ती सगळी निवेदने मी सोमवारी घेईन. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये ज्या चार लक्षवेधी सूचना दाखविण्यात आलेल्या आहेत त्या सुध्दा सोमवारी घेण्यात येतील. त्यामुळे अशासकीय कामकाजाला पुरेसा वेळ मिळू शकेल. आता मी नियम 93 च्या सूचना वाचून दाखवितो.



**पृ.शी. मु.शी** : नियम 93 अन्वये सूचना

**सभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, मधुकर चव्हाण यांनी " नागपूर जिल्हयाच्या प्रादेशिक विकास योजनेची अंमलबजावणी दिनांक 15 जुलै 2007 पासून करण्यात आली असून सदर प्रादेशिक योजना मराठी अहवालाच्या पृष्ठ क्रमांक 291,292 मध्ये 60 मीटर रुंदीच्या प्रस्तावित रिंग रोडच्या बाहय सीमेपासून 5 किलोमिटरच्या अंतर्गत असलेल्या गावाच्या गावठाणापासून 750 मीटर सीमेपर्यंत रहिवाशांचा विकास होण्याकरिता परवानगी देण्यात येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी " मौजे उमरी अटाळी, ता.खामगाव,जि.बुलढाणा येथील कोल्हापूर बंधा-याचे काम सुरु असून त्यात वापरले जाणारे साहित्य अत्यंत निकृष्ट दर्जाचे असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,सागर मेघे यांनी " जून - जुलै 2007 या कालावधीत राज्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी होऊन उद्‌भवलेल्या पूर परिस्थितीमुळे मोठया प्रमाणावर नुकसान होणे, अमरावती जिल्हयात शासनाकडून पूरग्रस्त भागातील डागडुजीची कामे करण्यासाठी देण्यात आलेल्या सहा कोटी रुपयांच्या निधीवाटपात प्रचंड प्रमाणात भेदभाव होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी " पुणे शहरातील फर्ग्युसन रस्त्यावरील "झाय व्हीजन" या आय क्लिनीकचे डॉ.दरक यांच्यावर दिनांक 19 मार्च,2008 रोजीच्या सुमारास त्यांचे चुलत मामा डॉ.मोहन झंवर व इतर नातेवाईकांनी हत्यारासह दवाखान्यात घुसून केलेली मारहाण, पोलिसांनी गुन्हा नोंदवून घेण्यास केलेली टाळाटाळ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे मात्र या विषयावर माननीय मत्र्यांनी निवेदन करावे. ( नंतर श्री.सुंबरे



**सभापती** .....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी "सिद्धबेट,आळंदी, जिल्हा पुणे येथे संत ज्ञानेश्वरांचे भव्य स्मारक बांधून संरक्षित राज्य स्मारक घोषित करणे." या विषयावर नियम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "मुंबईतील भारतमाता चित्रपटगृह पाडले जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "इयत्ता 1ली ते 7वी पर्यंतच्या मुलांना मोफत शिक्षण दिले जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "पुणे-मुंबई जलद मार्गावरील वाहनांवर 18 टक्के कर लावल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्य शासनाचे तांत्रिकपूर्व व्यावसायिक अभ्यासक्रम तसेच + 2 किमान कौशल्यावर बंद करण्याचे धोरण." या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

<u>**विशेष उल्लेखा संबंधात ....**</u>

**सभापती** : मी आज उपस्थित करावयाचे 'विशेष उल्लेख' सोमवारी घेण्याचे ठरविले आहे. आजचे आणि सोमवारचे विशेष उल्लेख एकाच दिवशी घेण्यात येतील.

यानंतर सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी 3.30 वाजेपर्यंत स्थगित होत आहे.

( दुपारी 2.53 ते 3.30 मध्यंतर )

( यानंतर श्री.सरफरे ...3एफ 1 ..



**(मध्यंतरा नंतर)**

<u>**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**</u>

<u>**अशासकीय कामकाज - विधेयके**</u>

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: हिंदू विवाह (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO. I OF 2008

A BILL FURTHER TO AMEND THE HINDU MARRIAGE ACT, 1955 IN ITS APPLICATION TO THE STATE OF MAHARASHTRA.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 1 हिंदू विवाह अधिनियम, 1955 हा महाराष्ट्र राज्यास लागू करताना त्यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 1 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: रस्त्यांवर राहणाऱ्या मुलांना सोयी व सुविधा पुरविणे आणि महाराष्ट्र शासनाने त्यांची जबाबदारी स्वीकारणे विधेयक

L.C. BILL NO. II OF 2008

A BILL TO PROVIDE FOR CERTAIN FACILITIES AND AMENITIES TO AND ACCEPTANCE OF RESPONSIBILITY BY GOVERNMENT OF THE CHILDREN LIVING ON THE STREETS OF CITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 2 महाराष्ट्र राज्यातील शहरांमधील रस्त्यांवर राहणा:या मुलांना विवक्षित सोयी व सुविधा पुरविण्याची आणि त्या मुलांची जबाबदारी शासनाने स्वीकारण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2008 चे वि.प.वि. क्रमांक 2 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

-----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: हिंसाचार व लैंगिक गुन्ह्यांना प्रवृत्त करणाऱ्या जाहिराती व जाहिरात-फलक लावण्यास प्रतिबंध करण्याबाबत विधेयक

L.A. BILL NO. III OF 2008.

A BILL TO PROVIDE FOR PROHIBITION OF ADVERTISEMENTS AND HOARDINGS WHICH TEND TO INSTIGATE VIOLENCE OR SEXUAL OFFENCES IN THE STATE OF MAHARASHTRA.

(सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील अनुपस्थित)

----

. . . .3 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 च्या निवेदनाबाबत

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी मागच्या वेळेला नियम 93 अन्वये एक सूचना दिली होती आणि तेव्हा सदरहू निवेदन राखून ठेवण्यात आलेले आहे. माझी अशी विनंती आहे की, हे निवेदन सोमवारी चर्चेसाठी घेतले तर बरे होईल.

**उपसभापती** : ठीक आहे.

----

## अशासकीय विधेयकांबाबत

**उपसभापती** : यानंतर चार अशासकीय विधेयके विचारार्थ घ्यावयाची आहेत. सन्माननीय सदस्यांना आज ही विधेयके चर्चेसाठी घ्यावयाची आहेत काय ?

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझी विधेयके नंतर घेण्यात यावीत.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझे विधेयक देखील नंतर घेण्यात यावे.

**उपसभापती** : ठीक आहे. आज सदनासमोर विचारार्थ असलेली अशासकीय विधेयके पुढे ढकलण्यात येत आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार,दिनांक 31-3-2008 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 3 वाजून 37 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 31-3-2008 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही